अकोला । शुक्रवार
दि. २५ एप्रिल २०२५
वर्ष : १९ अंक : ५५
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

# आतंकीयों की बचीखुची जमीन मिट्टी मे मिलाने का समय आ गया - नरेंद्र मोदी

मधुबनी, दि. २४ वृत्तसंस्था

**पहलगाम येथे पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवू, त्यांना शोधून काढू आणि त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना देऊ, असा वज्रनिर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलून दाखवला.बिहारमधील मधुबनी येथे राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त गुरूवारी झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.**



पहलगाम येथील बैसरण येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सार्वजनिकरित्या या हल्ल्याबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली. या हल्ल्यात किमान २६ जणांचा मृत्यू झाला होता.मोदी म्हणाले, ''देशाच्या शत्रुंनी केवळ केवळ निष्पाप पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या आत्म्यावरच हल्ला करण्याचे धाडस केले आहे. दहशतवाद्यांच्या हाती उरलेली थोडीफार जमीनसुद्धा आता हिरावून घेण्याची वेळ आली आहे

आज बिहारच्या भूमीवरून मी संपूर्ण जगाला सांगतो की भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवेल, त्यांना शोधून काढेल आणि शिक्षा देईल. आपण त्यांचा पृथ्वीच्या टोकापर्यंत पाठलाग करू.आपण त्यांचा शेवटपर्यंत पाठलाग करू. दहशतवादामुळे भारतीयत्वाचे स्पिरीट कधीही कमी होणार नाही. दहशतवादाला माफ केले जाणार नाही. दहशतवाद्यांना शिक्षा न देता कदापि (पान २ वर)

» ''दहशतवाद भारताच्या आत्म्याला तोडू शकत नाही. दहशतवाद्यांचे उरलेले अड्डे नष्ट करण्याची वेळ आली आहे. १४० कोटी भारतीयांची इच्छाशक्ती दहशतवाद्यांचे कंबरडे मोडेल.'' पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या कटातील सर्वांना कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल असा इशारा देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भाषणाद्वारे दिला आहे.

## घोडेवाला अन् ड्रायव्हर ठरले देवदूत!




नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

कधी नव्हे इतका सुंदर प्रवास करायला निघालेल्या एका कुटुंबाच्या आयुष्याला क्षणार्धात हादरा बसला. काश्मीरच्या निसर्गरम्य पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पुण्यातील दोन पर्यटकांचा मृत्यू झाला.

संतोष जगदाळे आणि त्यांचे मित्र कौस्तुभ गनबोटे हे त्या भयावह हल्ल्यात मृत्युमुखी पडले. त्यांच्यासोबत असलेल्या त्यांच्या कुटुंबीयांवर मात्र केवळ आभाळ कोसळलं नाही, तर रक्ताच्या थारोळ्यातून जीव वाचवण्याचा संघर्षही करावा लागला. संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी, आई आणि नातेवाईक त्या हल्ल्यातून सुदैवाने बचावले. पण त्यांच्या मदतीला आलेली माणसं, त्या प्रसंगी दाखवलेली माणुसकी, ही त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने देवदूत ठरली. ''आम्हाला वाचवायला आलेल्या घोडेवाल्याचं नाव मला आठवत नाही, पण त्याने आमच्यासोबत जे केलं, ते मी कधीच विसरू शकणार नाही,'' असं आसावरी सांगते. ती पुढे म्हणते, ''त्या घोडेवाल्याला समजलं की आमच्या कुटुंबातले दोघं पुरुष गेले, आणि फक्त आम्ही तिघी स्त्रिया उरलोय. पण तो पळून गेला नाही. उलट म्हणाला, 'मैडम, आप हमारी सवारी हैं, हम आपको लेकर जाएंगे।' माझी आई जखमी होती, पडलेली होती (पान २ वर)




### आजचा सामना

चेन्नई
विरुद्ध
हैद्राबाद

स्थळ : एम. ए. चिदंबरम स्टेडियम, चेन्नई
वेळ : सायं. ७.३० वाजता.



### तापमान °C
विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 45.2 | 27.5 |
| चंद्रपूर | 45.0 | 00.0 |
| ब्रम्हपूरी | 45.9 | 26.4 |
| अमरावती | 44.2 | 23.7 |
| वर्धा | 44.0 | 23.9 |
| नागपूर | 44.4 | 22.0 |
| यवतमाळ | 44.4 | 24.4 |
| गडचिरोली | 44.0 | 23.8 |
| वाशिम | 43.2 | 00.0 |
| भंडारा | 42.4 | 25.0 |
| गोंदिया | 42.6 | 23.2 |
| बुलढाणा | 40.6 | 27.6 |

## थोडक्यात

### पंच विनोद सेशनच्या निर्णयांवर चाहते संतप्त



**मुंबई :** आयपीएल २०२५ चा अर्धा हंगाम नुकताच संपला आहे. दरम्यान, अचानक मॅच फिक्सिंगसारखे गंभीर आरोप होऊ लागले आहेत. मुंबई इंडियन्स यांच्यातील सामन्यात इशान किशनला बाद देण्यावरुन बराच गोंधळ उडाला आहे. कारण त्याला कोणतेही अपील केले नसताना पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले. यानंतर स्निको मीटरने दाखवले की चेंडू त्याच्या बॅटला स्पर्श करत नव्हता आणि तो वाइड होता. सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे मुख्य पंच विनोद सेशन यांनीही त्याला थांबवले नाही. ज्यामुळे त्यांच्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून फिक्सिंगचे आरोप होत आहेत. या सामन्यातील पंच विनोद सेशनही निर्णय देण्याआधी काही सेकंद गोंधळलेले दिसले. कारण झेलबादची अपील केले नसतानाही डावखुरा फलंदाज इशान किशन हा बाद झालाय असं समजून क्रीझ सोडण्याचा विचार करत होता. त्यावेळी त्याचे हावभाव पंच विनोद सेशन यांनी बाद घोषित केले. आता चाहते विनोद सेशनवर गंभीर आरोप करत आहेत. इशान किशन वादानंतर, अनेक चाहत्यांनी सोशल मीडियावर विनोद सेशनच्या पंचगिरीबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत.

## पर्यटकांची जम्मू-काश्मीरकडे पाठ; पर्यटन उद्योगाला मोठा फटका

नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा पर्यटन उद्योगावर खोलवर परिणाम झाला आहे. हल्ल्यानंतर लगेचच पर्यटकांनी त्यांचे ९० टक्के बुकिंग रद्द केल्याचे राजधानीतील बहुतेक टूर आणि ट्रॅव्हल एजन्सींचे म्हणणे आहे. हीच पद्धत अशीच सुरू राहील अशी भीती आहे. येत्या काही दिवसांत आणखी बुकिंग रद्द होऊ शकतात.

नवीन बुकिंगसाठीही कोणतीही चौकशी नाही. त्याचबरोबर, दहशतवादी हल्ला हा परदेशी पर्यटकांसाठीही चिंतेचा विषय बनला आहे. परदेशी पर्यटक टूर ऑपरेटर्सकडे सतत चौकशी करत असतात. अनेक परदेशी पर्यटकांनी काश्मीरमध्ये त्यांचे बुकिंग रद्द केले आहे.




कॅनॉट प्लेसच्या शंकर मार्केटमधील स्वान ट्रॅव्हलर्सचे मालक गौरव राठी म्हणाले की, सुमारे २५ लोकांनी जम्मू आणि काश्मीरसाठी त्यांचे बुकिंग रद्द केले आहे. बहुतेक पर्यटक पुढच्या महिन्यात काश्मीरला भेट देण्याची योजना आखत होते. येथे, कुशा ट्रॅव्हल्सचे मालक देव म्हणाले की आमच्याकडे काही कुटुंबांकडून बुकिंग होते.

बस आणि विमान तिकिटांपासून ते हॉटेलपर्यंत सर्व काही आधीच बुक केले होते, पण दहशतवादी हल्ल्याची बातमी येताच. बुकिंग रद्द करण्यासाठी फोन येऊ लागले. गुलमर्ग, हजान व्हॅली आणि ट्यूलिप गार्डन सारखी लोकप्रिय पर्यटन स्थळे सर्वाधिक बुकिंग झालेल्या ठिकाणांपैकी होती. पर्यटक म्हणाले की, आपण आपल्या कुटुंबियांना अशा ठिकाणी कसे घेऊन जाऊ शकतो जिथून परतण्याची कसलीच हमी नाही. गुड गाईड टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे एजंट कार्तिक वर्मा म्हणाले की, या महिन्यात आणि पुढील महिन्यात काश्मीरसाठी २० हून अधिक बुकिंग होते जे रद्द करण्यात आले आहेत.

लोक परतफेड मागत आहेत. ते म्हणत आहेत की ते त्यांच्या प्रियजनांना अशा ठिकाणी घेऊन जाण्याचा धोका पत्करू शकत नाहीत जिथे त्यांच्या परत येण्याची हमी नाही. काही फ्लाइट आणि हॉटेल बुकिंगचे पैसे परत मिळत नाहीत, ज्यामुळे टूर एजन्सींना खूप समस्या येत आहेत.

## मला ३ वर्षांचा मुलगा आहे...
### विनंती करुनही दहशतवाद्यांनी ऐकले नाही

नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण भारताला हादरवून सोडलं आहे. पहलगामच्या बैसरन व्हॅलीमध्ये दहशतवाद्यांनी निर्घृणपणे २६ जणांची गोळ्या झाडून हत्या केली. पर्यटनासाठी आलेल्या लोकांवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. दहशतवाद्यांनी पर्यटकांना धर्माच्या आधारावर वेगळं केलं आणि हिंदू पर्यटकांवर गोळ्या चालवल्या. या भयानक हल्ल्यानंतर अनेकांच्या दुर्दैवी कहाण्या समोर आल्या आहेत. बंगळुरुतील भरत भूषण यांचीही दहशतवाद्यांनी पत्नी आणि मुलासमोरच हत्या केली. दहशतवाद्यांना आम्ही खूप विनवणी केली पण त्यांनी ऐकले नाही आणि भरतवर गोळी झाडली असे पत्नी रेणुका भूषण यांनी सांगितले.



मंगळवारी बैसरन व्हॅलीमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा बळी गेला. मृतांमध्ये बंगळुरूचे सॉफ्टवेअर इंजिनियर भरत भूषण यांचाही समावेश होता. दहशतवाद्यांनी भरत भूषण यांना पत्नी रेणुका भूषण आणि तीन वर्षांच्या मुलासमोर संपवले. भरत यांनी आपल्याला तीन वर्षांचा मुलगा आहे असं सांगून सोडून देण्याची याचना केली होती. तरीही दहशतवाद्यांनी त्याच्या डोक्यात गोळी झाडली. मी विनंती करत असतानाही त्यांनी माझ्या पतीवर गोळ्या झाडल्या असे रेणुका भूषण यांनी सांगितले. ''आम्ही १८ एप्रिल रोजी काश्मीरला गेलो होतो. आमच्या तिथल्या शेवटच्या दिवशी आम्ही पहलगाममधील बैसरन व्हॅलीमध्ये गेलो होता. आम्ही ते सुंदर ठिकाणी पोहोचण्यासाठी (पान २ वर)

## डव्वा ग्रामपंचायतीला हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार जाहीर



नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त देशातील विविध ग्रामपंचायतींना व तसेच संस्थांना केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांमध्ये गोंदिया जिल्ह्यातील डव्वा ग्रामपंचायतीला हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार वर्ष २०२३-२४ साठी सन्मानित करण्यात आले. राष्ट्रीय पंचायत राज दिन-२०२५ निमित्त मधुबनी, बिहार येथे पंचायती राज मंत्रालयाकडून हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या पुरस्कार सोहळ्यात प्रथमच हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार, आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार आणि पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था पुरस्कार या श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात (पान २ वर)

## आधी बाता मारल्या, आता सरकार आश्वासनांपासून पळ काढतेय - बच्चू कडू

छत्रपती संभाजीनगर, दि. २४

निवडून येण्यापूर्वी खूप बाता मारल्या; पण आता निवडून आल्यानंतर महायुती सरकार दिलेल्या आश्वासनांपासून पळ काढतेय, अशी टीका बुधवारी प्रहार जनशक्ती पार्टीचे सर्वेसर्वा, माजी आमदार बच्चू कडू यांनी केली. पक्षाच्या वतीने संत एकनाथ रंगमंदिरात आयोजित संताजी- धनाजी सन्मान पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.

ते म्हणाले, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, लाडक्या बहिणीचे मानधन २,१०० रुपये करू आणि दिव्यांगांच्या मानधनात वाढ करू, असे वचननाम्यात जाहीर केले होते; परंतु सत्ता मिळताच सरकार वचननामा पाळण्यास तयार नाही.



त्यामुळे जून महिन्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील बंगल्याला घेराव घालण्यात येईल. यावेळी राज्य अभियानप्रमुख महेश बडे, विभागीय निरीक्षक घनश्याम पेठे, प्रहारचे जिल्हाध्यक्ष सुधाकर शिंदे, दिव्यांग क्रांतीचे जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे मंचावर उपस्थित होते. शेतकरी संघटनेचे अनिल पालोदे, बीड जिल्हाध्यक्ष विलास काळुंखे, दिव्यांग जिल्हाध्यक्ष रघुनाथ तोंडे, जालना जिल्हाप्रमुख श्रीमंत राऊत, मोहन मुंडे, अहिल्यानगरचे जिल्हाप्रमुख विनोद परदेशी, लक्ष्मण पोकळे, मधुकर घाडगे, लक्ष्मी देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यास सरकार तयार नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. दिव्यांगांचे मानधन पंधराशे रुपयांवर करण्यास सरकार तयार नाही, किमान वचननाम्याची तरी पूर्तता करा, असे बच्चू कडू यांनी बजावले आहे. यावेळी बच्चू कडू यांच्या हस्ते पक्षाचे कार्य सक्रियपणे करणाऱ्या कार्यकर्त्यांना संताजी धनाजी सन्मान पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष कुणाल राऊत यांनी केले, तर शिवाजी गाडे यांनी आभार मानले.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; आरोपीस आजन्म कारावास

केज, दि. २४ वृत्तसंस्था

अंगणात सायकल खेळत असलेल्या अल्पवयीन मुलीस मोबाईलचे अमिष दाखवून घरामागे शेतात देऊ तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीस आजन्म कारावास आणि ५० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. सत्र न्यायाधीश कुणाल जाधव यांनी हा महत्वपूर्ण निकाल दिला.

या घटनेची माहिती अशी की, दि. २२ मार्च २०२३ रोजी दुपारी ३:०० च्या सुमारास केज तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलगी अंगणात खेळत असताना नागनाथ शहाजी शिंदे याने तिला मोबाईल दाखवतो असे म्हणून घराच्या मागे असलेल्या शेतात नेवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आणि जिवे मारण्याची धमकी दिली.



पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादी वरून केज पोलीस ठाण्यात येथे आरोपी नागनाथ शहाजी शिंदे यांच्या विरूध्द गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्या फिर्यादी वरुन तात्कालीन पोलीस उपनिरीक्षक एस. के. कोळी यांनी या प्रकरणाचा तपास करून सत्र न्यायालय केज येथे दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावनी मा. सत्र न्यायाधीश कुणाल जाधव यांच्यासमोर झाली. आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे (पान २ वर)

## पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकार 'ॲक्शन मोड'वर!
### पाकिस्तानी कलाकारांवर बंदीचा इशारा

नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

**मंगळवारी २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममधील बैसारन मेदानावर दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकासह २६ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर काश्मीर खोऱ्यातील हा सर्वात भीषण हल्ला मानला जात आहे.**

या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या सीमापार दहशतवादाला पाठिंबा देण्याच्या भूमिकेविरुद्ध कठोर पावले उचलली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीच्या बैठकीत, गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत,




पाकिस्तानने सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे पूर्णपणे थांबवत नाही तोपर्यंत १९६० चा सिंधू जल करार निलंबित ठेवण्याचा आणि अटारी चेक पोस्ट बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अशातच आता पाकिस्तानी सेलिब्रिटींना केंद्र सरकारनं जोरदार झटका दिला आहे. पाकिस्तानी अभिनेता 'फव्वाद खान' याचा आगामी चित्रपट 'अबीर गुलाल' सिनेमावर भारतात बंदी घातल्याची माहिती मिळत आहे. माहिती-प्रसारण मंत्रालयातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी अभिनेता फवाद खानचा अबीर गुलाल रोखल्याची माहिती समोर येत आहे. हा सिनेमा येत्या ९ मे रोजी रिलीज केला जाणार होता. या सिनेमात फवाद खानसोबत बॉलिवूड अभिनेत्री वाणी कपूर स्क्रिन शेअर करणार होती. पण, आता सिनेमावरच बंदी घालण्यात आल्यामुळे फवाद खानसोबतच इतरही पाकिस्तानी सेलिब्रिटींसाठी हा मोठा धक्का असल्याचं बोललं जात आहे. बॉलिवूड डेब्यू केलेला पाकिस्तानी अभिनेता फवाद खाननं लिहिलंय की, ''पहलगाममधील भयानक हल्ल्याच्या बातमीनं दुःख झालं. या भयानक घटनेतील बळींसोबत आमचे विचार आणि प्रार्थना आहेत. या कठीण काळात आम्ही त्यांच्या कुटुंबाला शक्ती आणि आरोग्यासाठी प्रार्थना करतो.'' अशी पोस्ट अभिनेत्याने केली आहे.

### पर्यटकांसाठी चिंतेचा विषय!

» पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा पर्यटन उद्योगावर खोलवर परिणाम झाला आहे. हल्ल्यानंतर लगेचच पर्यटकांनी त्यांचे ९० टक्के बुकिंग रद्द केल्याचे राजधानीतील बहुतेक टूर आणि ट्रॅव्हल एजन्सींचे म्हणणे आहे. हीच पद्धत अशीच सुरू राहील अशी भीती आहे. येत्या काही दिवसांत आणखी बुकिंग रद्द होऊ शकतात. नवीन बुकिंगसाठीही कोणतीही चौकशी नाही. त्याचबरोबर, दहशतवादी हल्ला हा परदेशी पर्यटकांसाठीही चिंतेचा विषय बनला आहे. परदेशी पर्यटक टूर ऑपरेटर्सकडे सतत चौकशी करत असतात. अनेक परदेशी पर्यटकांनी काश्मीरमध्ये त्यांचे बुकिंग रद्द केले आहे.

## सिंधू जल कराराला स्थगिती हे युद्धच!
### प्रत्येक थेंबावर आमचा अधिकार; पाकिस्तानचा कांगावा

इस्लामाबाद, दि. २४ वृत्तसंस्था

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार स्थगित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानने भारताच्या या निर्णयाला ''जलयुद्ध'' आणि बेकायदेशीर पाऊल असे घोषित केले आहे.

या निर्णयास कायदेशीर आव्हान देण्याचा इशारा देत भारत वर्ल्ड बँकेचा सहभाग असलेल्या करारातून एकतर्फी माघार घेऊ शकत नाही, असे पाकिस्तानने म्हटले आहे. पहलगाम येथील दहशतवादी हलल्यात २६ लोकांचा बळी गेल्यानंतर भारताच्या निर्णयांचे मूल्यांकन करण्यासाठी पाकिस्तानच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीने बैठक घेतली. त्यानंतर पाकिस्तानचा याबाबत वक्तव्य केले आहे. पाकिस्तानचे उर्जा मंत्री अवैस लेघारी यांनी ट्विटरवर म्हटले आहे की, ''भारताने सिंधू जल कराराला



दिलेली स्थगिती ही जलयुद्धाची कृती आहे; ही एक भ्याड व बेकायदेशीर हालचाल आहे. प्रत्येक थेंबावर आमचा हक्क आहे आणि आम्ही तो कायदेशीर, राजकीय पूर्ण ताकदीनिशी आंतरराष्ट्रीय पातळीवर जपण्यासाठी लढू. पाकिस्तानी प्रसारमाध्यमांनुसार, परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी भारताचे आरोप फेटाळले आहेत. भारताकडे हल्ल्याचा काही पुरावा असेल, तर तो सादर करावा. नरेंद्र मोदी सरकारच्या निर्णयाला पाकिस्तान वर्ड टू वर्ड प्रत्युत्तर देईल. ही केवळ एक राजकीय खेळी आहे. भारत आपल्या अपयशासाठी पाकिस्तानला दोष देत आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ म्हणाले, पाकिस्तान भारताच्या कोणत्याही दबावाच्या धोरणाला झुकणार नाही आणि ''तीव्र व प्रभावी'' उत्तर दिले जाईल, असा इशारा दिला आहे. १९६० मध्ये जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेल्या करारानुसार, भारत सिंधू प्रणालीतील ८० टक्के जलप्रवाह पाकिस्तानला पुरवतो. या कराराला स्थगिती पाकिस्तानच्या कृषी क्षेत्रावर गंभीर परिणाम करू शकते. हा हल्ला पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबाची एक शाखा असलेल्या द रेसिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेने केला आहे. भारत सरकारने पाकिस्तान उच्चायोगातील मुत्सद्दी व संरक्षण अधिकाऱ्यांना हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला असून, वाघा-अटारी भूप्रवेशबिंदू बंद करण्यासह सार्क व्हिसा सवलत योजना रद्द करण्याचेही जाहीर केले आहे.

# पान 1 वरून...

## दहशतवाद्यांनी कल्पनाही केली ...

सोडले जाणार नाही. दहशतवादाचा बळी ठरलेल्यांना न्याय मिळावा यासाठी हर एक प्रयत्न केला जाईल. संपूर्ण देश या निर्धारात एकदिलाने उभा आहे. जे कोणी मानवतेवर विश्वास ठेवतात ते सर्व आपल्यासोबत आहेत. या कठीण काळात आमच्यासोबत उभे राहिलेल्या विविध देशांच्या नागरिकांचे आणि नेत्यांचे मी आभार मानतो.मानवतेवर विश्वास ठेवणारे सर्व लोक आपल्यासोबत आहेत. या कठिण प्रसंगी आमच्यासोबत उभे राहिलेल्या विविध देशांच्या लोकांचे आणि नेत्यांचे मी आभार मानतो. मोदी यांनी ठामपणे सांगितले की हल्ला करणारे दहशतवादी आणि याचा कट रचणारे त्यांच्या कल्पनेपलीकडे जाऊन शिक्षा भोगतील. देशाच्या शत्रूंनी भारतीयत्वाच्या स्पिरिटवर हल्ला करण्याचे धाडस केले आहे. तत्पूर्वी, पंचायती राज दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी आणि उपस्थित जमावाने जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मृत्यूंच्या सन्मानार्थ काही क्षण मौन पाळले. भाषण सुरू करण्यापूर्वी मोदी यांनी उपस्थित जनतेला आवाहन केले की, ''आपल्या कुटुंबातील सदस्यांचे'' स्मरण करून मौन पाळावे.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार म्हणाले, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध करताना पंतप्रधानांना सांगितले की संपूर्ण देश दहशतवादाच्या विरोधात एकत्र उभा आहे. पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंह म्हणाले, संपूर्ण देश मोदी यांच्या ताकदीवर विश्वास ठेवतो आणि खात्री आहे की ते योग्य वेळी दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर देतील.देशातील पंचायती राज संकल्पनेमागील हीच भावना आहे. गेल्या दशकात, पंचायतींना सक्षम करण्यासाठी एकामागून एक पावले उचलली गेली आहेत. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पंचायतींनाही बळकटी मिळाली आहे. पंतप्रधान मोदींनी डिजिटल होण्याचे फायदेही यावेळी सांगितलेजमिनीच्या कागदपत्रांचे डिजिटायझेशन हे वाद सोडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. स्वातंत्र्यानंतर देशाला नवीन संसद भवन मिळाले आणि ३० हजार नवीन पंचायत इमारतीही बांधल्या गेल्या, असे ते म्हणाले. सरकारचे प्राधान्य ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून देणे होते, ज्यामुळे गावांचा विकास झाला.पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये बोलताना म्हणाले की, २२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला. दहशतवाद्यांनी ज्या क्रूरतेने निष्पाप लोकांना मारले त्यामुळे संपूर्ण देश दु:खी आहे. संपूर्ण राष्ट्र सर्व पीडित कुटुंबांच्या दु:खात त्यांच्यासोबत आहे. या हल्ल्यात कोणीतरी आपला मुलगा, भाऊ किंवा पती गमावला आहे. देशाच्या शत्रूंनी भारताच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे धाडस केले आहे.

## घोडेवाला अन् ड्रायव्हर ठरले देवदूत!

उठता येत नव्हतं. त्याने स्वतः तिला उचललं, घोड्यावर बसवलं.'' त्या भीषण अवस्थेतही त्या माणसाने त्यांच्याकडून एकही रुपया घेतला नाही. ''आम्ही त्याला सांगितलं की वडिलांनी पैसे दिले की नाही माहित नाही, पण तुमचं काही राहिलं असेल तर नक्की सांगा. तेव्हा तो म्हणाला, 'सोचिए मत'। ते शब्द ऐकून मला भरून आलं,'' असा भावनिक क्षणही आसावरी सांगते. या हल्ल्यात एकूणच माणुसकीची अनेक रूपं अनुभवायला मिळाली. त्यांच्या सोबतचा ड्रायव्हर जो फक्त प्रवासासाठी ठरवलेला होता तो माणूस त्यांचं कुटुंबच होऊन गेला. ''पहिल्याच दिवशीपासून आमच्यासोबत असलेला ड्रायव्हर, माझा हात पकडून रडत होता. 'सिस्टर, क्या हो गया आपके साथ?' तो स्वतः आजारी होता, पण एक क्षणासाठीही आमच्यापासून दूर गेला नाही,'' असं सांगताना आसावरीचा कंठ दाटून येतो. ती पुढे म्हणते, ''मी त्याला सांगितलं होतं की गाडी घेऊन तयार रहा, आणि तो अक्षरशः रात्रभर जागा होता. आमची पहाटेची फ्लाइट होती आणि तो एकटाच झोपला नव्हता, कारण त्याला काळजी होती आम्ही सुखरूप पोहोचतोय ना.'' हल्ल्यानंतर त्यांना लष्कर आणि स्थानिक प्रशासनाचा आधारही मिळाला. पण आसावरीला आठवत राहतात त्या दोन अनोळखी लोकांच्या मदतीच्या आठवणी एक घोडेवाला आणि एक ड्रायव्हर ज्यांनी कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता, केवळ माणुसकीपोटी त्यांना वाचवलं. ''आज आम्ही इथपर्यंत पोहोचलोय, ते या दोन माणसांमुळे आणि लष्कराच्या मदतीमुळे. पण या प्रसंगात मी माणुसकीचं खरं रूप पाहिलं जे संकटाच्या काळातही निस्वार्थपणे तुमच्यासोबत उभं राहतं,'' असं म्हणत आसावरीच्या डोळ्यांत अश्रू दाटतात. दहशतवादाच्या अंधारातही ही माणुसकीची झुळूक आशेचा किरण घेऊन येते. अशा काळात, हेच अनुभव सांगून जातात की माणसातली माणुसकी हीच खरी देवता असते.

## मला ३ वर्षांचा मुलगा आहे...

उत्सुक होतो. बैसरनला पोहोचण्यासाठी आम्ही सुमारे तीन ते चार किलोमीटरचा प्रवास घोड्यावरून केला होता. आम्ही एका मोठ्या गवताळ मैदानात बसलो होतो आणि आमच्या लहान मुलासोबत खेळत होतो. तिथे तंबू होते जिथे पर्यटक पारंपारिक काश्मिरी पोशाख घालू शकत फोटो काढत होते. फोटोशूटनंतर, आम्ही दुपारच्या जेवणासाठी तिथून निघण्याची तयारी करत होतो. दुपारी १.४५ च्या सुमारास आम्हाला गोळीबाराचा आवाज ऐकू आले. सुरुवातीला आम्हाला वाटले की कोणीतरी प्राण्यांना घाबरवण्यासाठी गोळीबार करत असेल. पण गोळीबाराचा आवाज जवळजवळ येऊ लागल्याने आम्हाला कळले की हा हल्ला आहे. मी आणि माझे पती आमच्या मुलासह एका तंबूच्या मागे लपलो,'' असे रेणुका यांनी सांगितले.

''एक दहशतवादी आमच्यापासून १०० फूट अंतरावर असलेल्या तंबूत गेला आणि त्याने एका माणसाला बाहेर काढले. त्याच्याशी तो बोलू लागला आणि त्याच्या डोक्यात गोळी झाडली. त्याने दोन वेळा तसेच केले. त्यानंतर दहशतवाद्याने एका वृद्ध माणसाला बाहेर काढलं आणि त्याला आमची मुले तिथे मरत असताना तुम्ही इथे इतके आनंदात कसे राहू शकता? तुम्ही तुमच्या मुलांसोबत वेळ कसा घालवू शकता आणि आनंदी कसे राहू शकता? असं म्हटलं. त्यावर त्या वृद्ध माणसाने मी काय करु शकतो असं विचारलं. त्यावर उत्तर न देता त्याने त्या वृद्धाला गोळी मारली आणि त्याचे शरीर बाजूला ढकलले. त्यानंतर त्याने आणखी चार-पाच गोळ्या झाडल्या,'' असेही रेणुका भूषण यांनी म्हटलं.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक ...

एकुण ९ साक्षीदार तपासण्यात आले. या प्रकरणात पिडीता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष तसेच सरकार पक्षाचे दाखल केलेले सक्षम पुराव्याचे व कागदोपत्रांचे अवलोकन करुन व सहायक सरकारी वकील ॲड. राम बिरंगळ यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. सत्रन्यायाधीश कुणाल डी. जाधव साहेब यांनी आरोपी नागनाथ शहाजी शिंदे याला बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे कलम ४ व ६ प्रमाणे आजन्म कारावास व एकुण ५० हजार रु दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहाय्यक सरकारी वकिल ॲड. राम बी. बिरंगळ यांनी काम पाहिले व त्यांना सहायतक सरकारी वकिल ॲड. आर.पी. उदार यांनी सहकार्य केले. तसेच त्यांना पैरवी महिला अधिकारी तथा पोलीस हेडकॉन्स्टेबल श्रीमती बनसोडे यांनी सहकार्य केले.

## डव्वा ग्रामपंचायतीला ...

आले. हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार श्रेणीत गोंदिया जिल्ह्यातील डव्वा ग्रामपंचायतीने उत्कृष्ट कामगिरी केली असून, सर्वोत्तम स्थान मिळवले आहे. हा पुरस्कार ग्रामपंचायतच्या सरपंच योगेश्वरी चौधरी यांनी प्रधानमंत्री याच्या हस्ते स्वीकारला. पुरस्काराचे स्वरुप एक कोटी रुपये रोख पारितोषिक, मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा ग्रामपंचायतीने हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार मध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने प्रभावी पावले उचलत हवामान बदल विरुद्ध त्यांनी प्रभावीरित्या राबवलेल्या उपाययोजना राष्ट्रीय पातळीवर आदर्श ठरल्या आहेत.

# भाजप कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण घेणार पश्चिम विदर्भाचा आढावा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला: दि. २४ :** भारतीय जनता पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेशाचे माजी मंत्री व आमदार रवींद्र चव्हाण यांचे राज राजेश्वर नगरी अकोला येथे प्रथमच आगमन होत असून, त्यांच्या स्वागतासाठी भव्य तयारी करण्यात आली आहे. येत्या २७ एप्रिल, रविवार रोजी अकोल्यात होणाऱ्या महत्वपूर्ण बैठकीच्या पार्श्वभूमीवर हे आयोजन अधिक वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे.

या बैठकीत अकोला ग्रामीण, अकोला शहर, अमरावती शहर, अमरावती ग्रामीण, खामगाव, बुलढाणा, पुसद, यवतमाळ व



वाशिम या नऊ जिल्ह्यांतील भाजप पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते एकत्र येणार असून, रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी राजकीय दिशा ठरविण्यात येणार आहे.

या बैठकीच्या नियोजनाची जबाबदारी भाजप प्रदेश सरचिटणीस आणि आमदार रणधीर सावरकर तसेच अकोल्याचे पालकमंत्री नामदार ॲड. आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वाखाली केली जात आहे. त्यांच्या मार्गदर्शनात खासदार अनुप धोत्रे, आमदार हरीश पिंपळे, प्रकाश भारसाकळे, वसंत खंडेलवाल, किशोर पाटील, जयंत मसने, विजय अग्रवाल, माधव मानकर, ॲड. देवाशिष काकड, संजय गोटफोडे, रमेश अलकरी, सुहासिनी ताई धोत्रे, चंदाताई शर्मा, सुमनताई गावंडे, वैशालीताई निकम, वैशालीताई शेळके, वसंत बाचोका, गीतांजलीताई शेगोकार, डॉ. अमित कावरे, गिरीश जोशी, डॉ. अभय जैन, सिद्धार्थ शर्मा, संजय जोशी, अंबादास उमाळे आदी मान्यवर सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सुनिश्चित करण्यासाठी तुषार भिरड, गोपाल मुळे, रंजीत खेडकर, दिलीप गावंडे, नितीन राऊत, अमोल गीते, नितीन नितेश पाली, गणेश लोड, किशोर कुचके, रमेश दुतोडे, हरीश तावरे, संजय कोरडे, विठ्ठल वाकोडे, प्रशांत ठाकरे, हर्षद साबळे आदी कार्यकर्ते अखंड मेहनत घेत आहेत. या बैठकीत पक्षाच्या आगामी कार्ययोजनेबरोबरच, पश्चिम विदर्भातील संघटनात्मक मजबुतीवरही चर्चा होणार असल्याने हा राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम ठरणार आहे.

# भारतीय गुणवत्ता परिषदेच्या पथकाने केली तपासणी

### १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमाची अंमलबजावणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला: दि. २४ :** राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत कामाचे मूल्यांकन करण्यासाठी नवी दिल्ली येथील क्वालिटी काउंसिल ऑफ इंडियाच्या (भारतीय गुणवत्ता परिषद) त्रीसदस्यीय पथकाने बुधवारी (ता .२३) अकोला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कामांची तपासणी केली.

राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत राज्यातील सहा जिल्ह्यांतील कामांचे मूल्यांकन करण्यासाठी केंद्र शासनाच्या नवी दिल्ली येथील भारतीय गुणवत्ता परिषदेच्या त्रीसदस्यीय पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकाचे प्रमुख भारतीय गुणवत्ता परिषदेचे संचालक डॉ. हरिप्रकाश, संचालक डॉ. मनिष पांडे आदींचा समावेश असलेल्या पथकाने २३ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट देऊन राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यालयाने केलेल्या विविध कामांची तपासणी केली. यावेळी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या कामांसह राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती भारतीय गुणवत्ता परिषदेच्या पथकाला दिली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

# डॉ. दीपक कोचे यांना उत्कृष्ट सेवागौरव पुरस्कार जाहीर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला: दि. २४ :**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा उत्कृष्ठ सेवा गौरव पुरस्कार शिक्षक सवर्गातून श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील वनस्पती विभागाचे प्रमुख प्रा.डॉ दीपक कोचे यांना जाहीर करण्यात आले आहे.

डॉ दीपक कोचे यांनी शैक्षणिक संशोधन, सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण संरक्षण क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केले आहे सोबत त्यांना अनेक पेटंट सुद्धा प्राप्त झाले आहे या सर्व कार्याची दखल घेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारे महाराष्ट्र दिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ठ सेवा गौरव पुरस्कार २०२५ शिक्षक सवर्गातून नुकताच जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र दिन १ मे रोजी आयोजित कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मिलींद बाराहाते यांच्या हस्ते दिला जाणार आहे सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रा दीपक कोचे यांचे अभिनंदन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख, महाविद्यालयात विकास समितीचे सदस्य श्री प्रशांत देशमुख, प्रा सुरेश राऊत,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे,प्रबंधक श्री राजेश गीते आय क्यू ए सी समनव्यक डॉ आशिष राऊत,डॉ अंजली कावरे,डॉ संजय तिडके डॉ नितीन मोहोड,डॉ नाना वानखडे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले

# निवडणुका घ्या! राजीव गांधी पंचायती राज संघटनेचे राष्ट्रपतींकडे निवेदन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला: दि. २४ :** महाराष्ट्रात गेल्या तीन ते पाच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घेण्यात याव्यात, तसेच ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्याय्य पद्धतीने निकाली काढण्यात यावा, या मागण्यांसाठी राजीव गांधी पंचायती राज संघटनेच्या वतीने महामहिम राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले आहे. हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले.

राजीव गांधी पंचायती राज संघटनेचे अकोला जिल्हाध्यक्ष अशोक आमानकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने



हे निवेदन सादर केले. यामध्ये म्हटले आहे की, राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, नगरपंचायतींच्या निवडणुका अनेक वर्षांपासून रखडलेल्या आहेत. या निवडणुकांमुळे स्थानिक प्रतिनिधित्व, सामाजिक समतोल आणि लोकशाही प्रक्रियेला खीळ बसली असून, नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आली आहे.सुप्रीम कोर्टात प्रलंबित असलेल्या जनहित याचिकांमुळे ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. संविधानाच्या तरतुदींनुसार स्थानिक संस्थांचा कार्यकाळ संपल्यानंतर निवडणुका घेणे बंधनकारक असून, प्रशासक नेमणे ही गोष्ट अलोकशाही आणि असंविधानिक आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देताना अशोक अमानकर,कॉंग्रेस प्रवक्ते डॉ. सुधीर ढोणे,ॲड सुरेश ढोकोलकर अतुल अमानकर,आलमगीर खान, खान अझहर इक्बाल, नाम मोहम्मद ऐजाज, अविनाश राठोड, अमला राठोड, बंटी पटेल यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अक्षयतृतीयेला बालविवाह होणार नाही, याची दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला: दि. २४ :**राज्यामध्ये बालविवाह प्रतिबंध अधिनीयम २००६ कार्यान्वीत असून महाराष्ट्र शासनाने बालविवाह प्रतिबंध नियम २०२२ तयार केले आहेत. राज्यात मागील ६ वर्षात ५४२१ बालविवाह थांबवण्यात आले असुन ४०१ एफ. आय.आर दाखल करण्यात आले आहे.अक्षय तृतीया हा दिवस दि.३० एप्रिल २०२५ रोजी आहे या दिवशी महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात सामुहीक विवाह सोहळे तसेच वैयक्तीक विवाह सोहळे आयोतीत केले जातात. यामध्ये बालविवाह सुध्दा मोठया प्रमाणात होण्याची शक्यता असते बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ संपुर्ण राज्यात लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार बालविवाह आयोजीत करणे अजामीनपात्र गुन्हा आहे.



बालविकास प्रकल्प अधिकारी नागरी हे शहरी भागाकरीता बालविवाह प्रतिबंधक अधिकारी असुन ग्रामसेवक हे ग्रामीण भागाकरीता बालविवाह प्रतिबंधक अधिकारी असुन त्यांना सहायक म्हणूनअंगणवाडी सेवीका आहेत. गावांमध्ये ग्राम बाल संरक्षण समित्या गठीत असुन सरपंच हे ग्राम बालसंरक्षण समितीचे अध्यक्ष असून पोलीस पाटील, आशा सेवीका हे त्या समितीचे सदस्य आहेत वअंगणवाडी सेवीका सदस्य सचिव आहेत त्यामुळे गावात बालविवाह तसेच बालकांच्या संबंधीतकोणतीही अघटीत घटना होणार नाही या बाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे. बालविवाह झाल्यास विवाह लावणारे भटजी, मौलवी, पादरी, भंतेजी तसेच मंडपवाले, वाजंत्री, विवाह सोहळ्यात सहभागी होणारी वराडी मंडळी, मंगल कार्यालय मालक, वर वधुचे आई वडील यांना शिक्षा होवु शकते. गावात बालविवाह झाल्यास सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, अंगणवाडी सेवीका यांच्या वर कार्यवाही प्रस्तावीत केल्या जावु शकते दि.११ एप्रिल २०२५ रोजी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी ग्रामसेवकयांच्या जिल्हा स्तरीय बालविवाह प्रतिबंधक कार्यशाळेमध्ये सर्व ग्रामसेवक यांना गावात बालविवाह होवु नये यासाठी जागरूक राहण्याच्या सुचना जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी दिलेल्या आहे.

# भनकपुरी येथे अखंड दत्तनाम सप्ताह सोहळा

### साप्ताहिक सोळस पूजेचे आयोजन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला: दि. २४ :** आनंद साप्रदायिक मंडळ यांच्या पुढाकाराने भनकपुरी (झुरळ बु.) येथे १ मेपासून अखंड दत्तनाम सप्ताह सोहळ्यास प्रारंभ होत आहे. सप्ताहात १ ते ६ मे दरम्यान परिसरातील आनंद सांप्रदायिक मंडळतर्पे तीर्थ स्थापना, सोळस पूजा होणार आहे. ७ मे रोजी १२८ महापूजेस आरंभ होणार आहे. या महापूजेचे आचार्य पद गुरूवर्य वासुदेव भारती महाराज अध्यक्ष दशनाम दत्त आखाडा सुरक्षा न्याय व मुख्य पुजारी दत्त संस्थान शिखर माहुरगड यांच्या उपस्थितीत होणार आहे.

सोळस पूजा सप्ताहात १ मे रोजी आनंद सांप्रदायिक मंडळ डाबकी रोड, अकोला, २ मे रोजी आनंद



सांप्रदायिक मंडळ मांजरी,३ मे रोजी आनंद सांप्रदायिक मंडळ कळंबा, ४ मे रोजी आनंद सांप्रदायिक मंडळ खंडाळा, टाकळी निमकर्दा, ५ मे रोजी आनंद सांप्रदायिक मंडळ खांबोरा व ६ मे रोजी आनंद मंडळ सांप्रदायिक तरोळा, जवळा या आनंद सांप्रदायिक मंडळ यांच्या मार्गदर्शनात होईल. या सप्ताहात सांप्रदायिक मंडळांना गावातील अन्नदाते यांच्याकडून भोजनाची व्यवस्था केली जाईल. तसेच ७ मे रोजी रात्री ९ वाजता महापूजा आरंभ होईल व संध्याकाळी ६ वाजता महाप्रसादाचे आयोजन होणार आहे. तरी पंचक्रोतील दत्त सांप्रदायिक भक्तगणांनी या महापुजेस उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आनंद सांप्रदायिक मंडळ भनकपुरी यांनी केले आहे.

### तीर्थ स्थापनेने होईल सप्ताहास प्रारंभ

या सप्ताहाचा आरंभ वैशाख शुध्द ४ दिनांक १ मे रोजी तीर्थ स्थापना होईल व ७ मे रोजी रात्री ९ वाजता १२८ महापूजा आरंभ होईल नंतर काकडा आरतीने समाप्ती होईल, असे आयोजन समितीच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# वाडेगावात दिवसाढवळ्या अवैध रेतीचे ट्रॅक्टर सुसाट

» अवैध रेतीवाहतुकीवर कारवाई का होत नाही?

» अधिकाऱ्याची अवैध रेतीवाल्यासोबत मिलीभगत असल्याची चर्चा

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**वाडेगाव: दि. २४ :** वाडेगावात महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून दिवसा ढवळ्या अवैध रेतीचे उत्खणन करुन ट्रॅक्टर द्वारे वाहतुक सुरु असल्याचे पहावयास मिळत आहे. मात्र येथे रेतीवाहतुकीवर एकही कारवाई करण्यात आली नसल्याचे ऐकण्यात येत असल्यामुळे मंडळ अधिकारी व कर्मचारी मूग गिळून का बसले आहेत त्याची अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करण्याची हिंम्मत का होत नाही. त्यामुळे आता खुद वरीष्ठ अधिकाऱ्यानी याकडे लक्ष केंद्रित करून अवैध रेतीवाहतुकीवर ठोस कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.



वाडेगाव हे जवळपास ३० ते ४० हजार लोकवस्तीचे गाव आहे. या गावातील कोणत्याही रस्त्यावरुन फेरफटका मारला तर रस्त्यालगत एखादे तरी बांधकाम सुरु असल्याचे पहावयास मिळत आहे. मात्र वाडेगाव मंडळात एकाही रेतीघाटचा लिलाव झालेला नसतांना येथे रेती येते कोठुन असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. वाडेगाव मंडळात चिंचोली ( गणू ) वाडेगाव भाग १, वाडेगाव भाग २, वाडेगाव भाग ३ ,देगाव, नकाशी इत्यादी गावे येतात या गावातील येणाऱ्या नदीपात्रातून तसेच शासकिय जमिनीवरील रेती घाटाचा लिलाव झालेला नसतांना येथुन अनेक दिवसांपासुन दिवसा ढवळ्या अवैध रेतीचा उपसा करुन वाहतुक सुरु असल्याचे पहावयास मिळत असल्याने ही वाहतूक मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिसत नाही का ? येथील अधिकारी कर्मचारी हे अर्थकारणामुळे अवैध गौणखनिज वाहतुकीवर कारवाई करीत नसल्याचा आरोप होत आहे. वाडेगाव मंडळात येणाऱ्या नदीपत्रातून तसेच शासकीय जमिनीवरुन अवैध रेतीचे उत्खनन करुन वाहतुक करीत रेतीची कुत्रिम टंचाई भासवुन ज्यादा दराने रेतीची विक्री करणारी एक टोळीच वाडेगावात कार्यरत असल्याचे बोलल्या जात आहे त्यामुळे घाम न गाळता लाखोंची कमाई होत असल्यामुळे या व्यवसायात मोठ्या प्रमाणात तरुणवर्ग सहभागी होतांना दिसत आहेत एवढ्या मोठ्या प्रमाणात वाडेगावात अवैध रेतीची वाहतूक सुरु असतांना देखिल या अवैध रेतीवाहतुकीवर एकही कारवाई करण्यात येत नसल्याने येथील महसुल अधिकारी कर्मचाऱ्यानी जणुकाही अवैध गौण खनिज वाहतुकदारांना अवैध रेतीची वाहतूक करण्याची मूकसंमती दिली की काय ? असा विषय चर्चिला जात आहे. महसुल विभागातील वरिष्ठ अधिकारी यांनी याकडे गांभीर्याने लक्ष केंद्रित करुन रेतीवाहतुकीवर कारवाईचा बडगा तीव्र करण्याची गरज निर्माण झाली असल्याचे सुज्ञ नागरिक बोलुन दाखवित आहेत दरम्यान या बाबत संबंधित अधिकारी यांच्या सोबत संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

### मंडळ अधिकारी कार्यालयात दाखवा आणि बक्षीस मिळवा

वाडेगाव येथे मंडळ अधिकाऱ्याचे स्वतंत्र कार्यालय आहे. त्यामुळे मंडळ अधिकारी यांनी कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर राहणे गरजेचे आहे. मात्र मंडळ अधिकारी हे कधीच कार्यालयात हजर राहत नसल्यामुळे येथिल कार्यालयात येणाऱ्या शेतकऱ्यासह सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच अधिकारी कर्मचारी यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी राहणे बंधनकारक असतांना मंडळ अधिकारी कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने येथील शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### नागरिक अवैध रेती बाबत आंदोलात्मक पवित्रा घेण्याच्या तयारीत

वाडेगाव मंडळातील नदीसह इतर रेती घाटाचा लिलाव झालेला नाही. तरी देखील मोठ्या प्रमाणात अवैध रेतीचे उत्खनन सुरु असल्याचे पहावयास मिळत आहे. अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर दिवस रात्र रस्त्यावरून सुसाट वेगाने धावत असल्याचे दृष्टीस पडत असतांना देखिल अवैध रेतीची वाहतुक रोखण्यासाठी अधिकारी ठोस पावले उचलत नसल्याने संबंधित विभागाला जबाबदार पकडून काही नागरिकांनी आंदोलनात्मक पवित्रा घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे .

## थोडक्यात

### पक्ष फोडाफोडीत व्यस्त असलेल्या केंद्रीय गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

**ठाणे :** जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार केला. त्यामध्ये एकूण २६ पर्यटकांना मारण्यात आले, त्यापैकी २० जण जखमी झाले आहे. त्या मृतांपैकी सहा जण महाराष्ट्रातील डोंबिवली, पुणे व पनवेल मधील होती ही हत्या एवढी क्रूर होती की दहशतवाद्यांनी त्यांचा धर्म विचारून त्यांच्या कुटुंबांसमोर त्यांची हत्या केली या घटनेने संपूर्ण भारत देश हादरला आहे. या झालेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने जांभळी नाका येथील चिंतामणी चौकात पाकिस्तानी ध्वजाचे दहन करून पाकिस्तान मुर्दाबाद, केंद्रीय गृहमंत्री राजीनामा द्या या घोषणा करण्यात आल्या. तसेच केंद्रीय गुप्तचर यंत्रणा व केंद्र सरकार करतय काय ?, तसेच कलम ३७० रद्द केल्याचे हेच ते काय फायदे? या आशयाचे फलक दाखवण्यात आले. शिवसैनिकांनी या शहीद झालेल्या हिंदू पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यावेळी शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे, इतर शिवसेना पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंगळवार २२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीर पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा शिवसेना महाड तसेच राष्ट्रभक्त नागरिकांकडून बुधवार २३ एप्रिल २०२५ रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जाहीर निषेध करण्यात आला. या हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचा संशय बळावला असल्याने ''नक़्शे पर से नाम मिटा दो बाग़ी पाकिस्तान का'' अशा पाकिस्तान विरोधी घोषणा यावेळी देण्यात आल्या.या निषेध आंदोलन प्रसंगी शिवसेना दक्षिण रायगड जिल्हा प्रवक्ते नितीन पावले, तालुका प्रमुख बंधू तरडे,महाड शहर प्रमुख डॉक्टर चेतन सुर्वे व इत्यादी नागरिक उपस्थित होते.

### डॉ. वळसंगकर आत्महत्याप्रकरणी मनिषा मानेला पोलीस कोठडी

**सोलापूर :** सोलापुरातील ज्येष्ठ मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर (वय ७०) यांना असह्य त्रास देऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या त्यांच्याच रुग्णालयातील प्रशासकीय अधिकारी मनीषा महेश माने-मुसळे हिला आणखी दोन दिवसांची वाढीव पोलीस कोठडी मिळाली आहे. तिच्या कृत्यात आणखी कोणाची साथ होती ? रुग्णालयातील अन्य २७ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तिच्या विरुद्ध केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तपास करण्यासाठी तिला वाढीव पोलीस कोठडी मिळाली आहे.

गेल्या १८ एप्रिल रोजी डॉ. शिरीष पद्माकर वळसंगकर (वय ७०) यांनी रेल्वे लाईन-मोदी खाना परिसरातील निवासस्थानी स्वतःच्या मस्तकात रिव्हॉल्व्हरने गोळी झाडून आत्महत्या केली होती. त्यांच्याकडे सापडलेल्या चिठ्ठीत त्यांच्या एसपी इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्स रुग्णालयातील प्रशासकीय अधिकारी मनीषा माने-मुसळे हिने दिलेल्या त्रासामुळे व्यथित होऊन जीवन संपवत असल्याचा उल्लेख करण्यात आला होता. त्यानुसार त्यांचे पुत्र डॉ. अश्विन वळसंगकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलीस ठाण्यात मनीषा माने-मुसळे (वय ४५, रा. बसवराज नीलयनगर, जुळे सोलापूर) हिला पोलिसांनी अटक केली होती. तिला पुढील तपासासाठी तीन दिवस पोलीस कोठडी मिळाली होती. बुधवारी पोलीस कोठडी संपल्यानंतर आरोपी संशयित माने-मुसळे हिला पुन्हा न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. तीन दिवसांच्या पोलीस कोठडीदरम्यान आरोपी महिलेकडे विविध मुद्द्यांवर तपास करण्यात आला. परंतु तिने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत.

### जम्मू काश्मीरमध्ये नाशिक जिल्ह्यातील पर्यटक सुरक्षित

**नाशिक :** जम्मू काश्मिरच्या वेगवेगळ्या भागात नाशिक जिल्ह्यातील सुमारे ६० पर्यटक थांबले असून ते सर्व सुखरूप असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. पहेलगाममध्ये अडकलेले चार प्रवासी बुधवारी विमानाने मुंबईकडे मार्गस्थ झाल्याचे यात्रा कंपनीकडून सांगण्यात आले. श्रीनगरमध्ये बुधवारी दुकाने बंद असली तरी स्थिती सामान्य होती.नवीन पर्यटकही मोठ्या प्रमाणात येत असल्याचे आश्वासक चित्र पहायला मिळाल्याचे थांबलेल्या प्रवाशांकडून सांगण्यात आले. पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर प्रशासनाने अडकलेल्या पर्यटकांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. पर्यटन कंपन्यांच्या माध्यमातून सहलीला गेलेले ५० तर वैयक्तिकरित्या सहलीचे नियोजन करून गेलेले १० असे एकूण ६० नाशिककर जम्मू काश्मिरमध्ये असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.पाच नाशिकचे पर्यटक पहेलगाम, १२ गुलमर्ग येथे तर उर्वरित पर्यटक श्रीनगरमध्ये आहेत. यातील एक स्मिता गवई यांनी बुधवारी श्रीनगरमध्ये टेम्पोतून मोठ्या संख्येने पर्यटक आल्याचे आश्वासक चित्र पहायला मिळाल्याचे सांगितले. या दिवशी श्रीनगरमधील दुकाने बंद होती. परंतु, हॉटेल सुरू होती. पर्यटकांची आसपासच्या परिसरात भ्रमंती सुरू होती. सामान्य वातावरण होते.वृत्तवाहिन्यांवर जे चित्र रंगवले जाते, तशी स्थिती नसल्याचे गवई यांनी आवर्जून नमूद केले. दरम्यान, पहेलगाम येथे अडकलेले नाशिकचे चार प्रवासी या भागातून सुखरूपपणे बाहेर पडले. बुधवारी ते विमानाने मुंबईकडे निघाल्याचे चौधरी यात्रा कंपनीचे प्रमुख ब्रिजमोहन चौधरी यांनी सांगितले.

# पर्यटकांना आणण्यासाठी आणखी एका विशेष विमानाची व्यवस्था

## सरकारकडून १०० नावांची यादी जाहीर

**नुंबई : दि. २४** वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दोन दिवसांपूर्वी दहशतवादी हल्ला झाला होता. दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य करत केलेल्या या हल्ल्यात देशातील २५ आणि नेपाळमधील एका पर्यटकाचा मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्या पर्यटकांमध्ये राज्यातील सहा पर्यटकांचाही समावेश आहे. या हल्ल्यानंतर महाराष्ट्रातून जम्मू आणि काश्मीरला पर्यटनासाठी गेलेले शेकडो नागरिक अडकले आहेत. हल्ल्यामुळे त्यांच्यामध्ये भीतीचे वातावरण आहे.

अशात महाराष्ट्र सरकारने या पर्यटकांना परत आणण्यासाठी आणखी एका विशेष विमानाची व्यवस्था केली आहे. या विशेष विमानातून १०० पर्यटकांना परत राज्यात आणले जाणार आहे. या १०० पर्यटकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. याबाबत मुख्यमंत्री कार्यालयाच्या एक्स अकाउंटवरून माहिती देण्यात आली आहे. तत्पूर्वी, कालही सरकारने जम्मू आणि काश्मीरमधून परत आणल्या जाणाऱ्या ८३ पर्यटकांची यादी जाहीर केली होती.



**एअर इंडियाचे विमान १०० पर्यटकांना आणणार**

दरम्यान मुख्यमंत्री कार्यालयाच्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''काश्मिरातील महाराष्ट्राच्या नागरिकांना परत आणण्यासाठी आणखी एका विशेष विमानाची व्यवस्था झाली आहे. एअर इंडियाचे हे विमान महाराष्ट्रातील १०० पर्यटकांना घेऊन आज मुंबईला येईल. या विमानातील प्रवाशांची यादी सोबत जोडली आहे.''

**दोन्ही विमाने सायंकाळी मुंबईत येणार**

या पोस्टमध्ये पुढे असे म्हटले आहे की, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर आज २ विशेष विमाने मुंबईत येणार आहेत. इंडिगोचे विमान ८३ पर्यटकांना परत आणेल, तर एअर इंडियाच्या विमानाने १००, असे महाराष्ट्रातील एकूण १८३ पर्यटक आज मुंबईत परततील. ही दोन्ही विमाने सायंकाळच्या सुमारास मुंबईत येणार आहेत. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हे यासाठी संपूर्ण मदत करीत आहेत. या विशेष विमानांचा खर्च राज्य सरकार करणार आहे.''

## साताऱ्यातील सातही पर्यटक सुखरूप

**सातारा, दि. २४** वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटकांचे कुटुंबीय, नातेवाईक चिंतेत आहेत. सातारा जिल्ह्यातील ७ जण जम्मू काश्मीरला गेले आहेत. सुदैवाने घटनेवेळी ते पहलगामपासून १०० किलोमीटर अंतरावर असलेल्या गुलमर्गमध्ये होते. त्यामुळे सर्वजण सुरक्षित आहेत.

सातारा जिल्हा प्रशासन आणि आपल्या कुटुंबीयांच्या ते संपर्कात आहेत. दोन दिवसात आम्ही घरी पोहचू, असे त्यांनी कटुंबीयांना सांगितलं आहे. पर्यटनासाठी जम्मू-काश्मीरला गेलेल्यांमध्ये माधवी मिलींद कुलकर्णी, त्यांचा मुलगा महेश कुलकर्णी, त्यांचे नातेवाईक श्रीधर शामराव क्षीरसागर, वर्षा श्रीधर क्षीरसागर, सुखदा श्रीधर क्षीरसागर (सर्व रा. कराड), कौटुंबिक मित्र शरद हरिभाऊ पवार आणि त्यांच्या पत्नी विद्या शरद पवार (सातारा) यांचा समावेश आहे. महेश कुलकर्णी हे इंटेरियर डिझायनर आहेत, तर शरद पवार हे एसटी महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. सर्वजण सध्या श्रीनगरमध्ये सुखरूप असून सातारा जिल्हा प्रशासन त्यांच्या संपर्कात आहे.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यावेळी आम्ही सर्वजण गुलमर्ग होतो, अशी माहिती महेश कुलकर्णी यांनी दिली. गुलमर्गमध्ये असल्यामुळे आम्हाला काहीच माहीत नव्हतं. स्थानिक वृत्तवाहिनीवरील बातमीमुळं दहशतवादी हल्ला झाल्याचं कळलं. त्यानंतर कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळींचे फोन, मेसेज येऊ लागले. आम्ही कुठं आहोत? सुरक्षित आहोत का? याची त्यांनी विचारपूस केली. त्यामुळं दहशतवादी हल्ल्याचं गांभीर्य आमच्या लक्षात आलं, असे त्यांनी सांगितले.





**महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाला असून, यामध्ये पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांचा समावेश आहे. त्यांचे मृतदेह गुरुवारी सकाळी पुणे विमानतळावर आणण्यात आले आहेत. राष्ट्रवादीचे नेते खासदार शरद पवार हे कर्वेनगर येथे जगदाळे कुटुंबाला भेटण्यासाठी आले आहेत. त्यांनी त्यांच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. शरद पवार यांच्यासमोर जगदाळे कुटुंबियांना अश्रू अनावर झाले.**

## जम्मू-काश्मीरमध्ये अडकलेले सोलापुरातील ४७ पर्यटक सुरक्षित

### सोलापुरात पाकिस्तानचा ध्वज जाळून निषेध

**सोलापूर, दि.२४** वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील ६८ पर्यटक जम्मू-काश्मीरमध्ये अडकले आहेत. हे सर्व पर्यटक सुरक्षित असून श्रीनगर येथील एका हॉटेलमध्ये सुरक्षित आहेत. जिल्ह्यातील आणखी काही पर्यटक जम्मू-काश्मीरमध्ये आहेत किंवा कसे, याबाबतची माहिती घेण्यासाठी जिल्हा प्रशासन पर्यटन कंपन्यांशी संपर्कात आहे.

या भीषण दहशतवादी हल्ल्यात सोलापूर जिल्ह्यातील एकही पर्यटक मृत किंवा जखमी झाला नाही. मात्र तरीही जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांच्या नातेवाइकांनी जिल्हा प्रशासनाशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

या संदर्भात सकाळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दूरदृष्टी प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांची बैठक घेऊन गावनिहाय पर्यटकांच्या याद्या तयार करण्याच्या तसेच तालुकास्तरावरील पर्यटन चालकांच्या संपर्कात राहून पर्यटकांची नावे घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

माढा तालुक्यातील पिंपळनेर गावचे सरपंच राहुल पेटकर हे ४७ पर्यटकांसह श्रीनगर येथे एका हॉटेलमध्ये थांबले आहेत. याशिवाय आणखी दुसऱ्या हॉटेलमध्ये २१ पर्यटक थांबले आहेत. पिंपळनेरचे सरपंच पेटकर यांच्यासह इतरांशी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भ्रमणध्वनीद्वारे थेट संपर्क साधून त्यांच्या व सोबतच्या सर्व पर्यटकांच्या सुरक्षिततेची माहिती घेतली. तसेच त्यांना सोलापूरच्या जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवश्यक असलेले सर्व सहकार्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही दिले.

## पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध; सर्वपक्षीयांकडून डोंबिवली बंदची हाक

**डोंबिवली, दि.२४** वृत्तसंस्था

दहशतवाद्यांनी पहलगाम येथील हल्ल्यात निष्पाप २६ पर्यटकांचा बळी घेतला. यातील महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचा समावेश आहे. यात डोंबिवलीच्या तीन नागरिकांचा मृत्यू झाल्याने या हल्ल्याच्या निषेधार्थ आज डोंबिवली बंद पाळण्यात येत आहे. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या तीन डोंबिवलीकरांवर शोकाकुल अंत्यसंस्कार करण्यात आले.

दहशतवाद्यांच्या क्रूर कृत्याचा निषेध करण्यासाठी सर्व पक्षीयांनी गुरुवारी (ता.२४) डोंबिवली बंदची हाक दिली आहे. या बंदमध्ये शहरातील सर्व नागरिक, व्यापारी, व्यावसायिकांनी सहभागी होण्याचे आवाहन सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांनी केले आहे. त्यानुसार आज डोंबिवली बंदला चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. संजय लेले, अतुल मोने, हेमंत जोशी या तिन्ही पर्यटकांच्या पार्थिवावर डोंबिवलीतील शिव मंदिर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

**'पाकिस्तान मुर्दाबाद'च्या घोषणा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय लेले, हेमंत जोशी आणि अतुल मोने यांच्या पार्थिवाचे डोंबिवलीत अंत्यदर्शन घेतले. तिन्ही पार्थिव अंत्यसंस्कारासाठी नेले जात असताना नागरिकांना शोक अनावर झाला. यावेळी संतप्त नागरिक 'पाकिस्तान मुर्दाबाद'च्या घोषणा देत होते. नागरिकांची घोषणाबाजी सुरू असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित जनतेला जे हव आहे तेच होणार, अशा शब्दात भावना व्यक्त करून दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी सरकार कटिबध्द असल्याचे सांगितले.

**गणबोटे आणि जगदाळे यांचे पार्थिव पुण्यात दाखल**

दुसरीकडे, आज पुणे एअरपोर्टवर गुरुवारी पहाटे गणबोटे आणि जगदाळे यांचे पार्थिव दाखल झाले आहे. काही वेळात दोघांच्याही पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे हे दोघेही गेल्या अनेक वर्षांपासून मित्र होते. त्यामुळे हे दोन्ही कुटुंबीय एकत्रच काश्मीर फिरायला गेले होते. मात्र, या दोन्ही कुटुंबातील पुरुषांना दहशतवादी हल्ल्यात जीव गमावावा लागला आहे. त्यामुळे परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## सांगलीत राजकीय, सामाजिक संघटनांकडून हल्ल्याचा निषेध

**सांगली , दि.२४** वृत्तसंस्था

काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा सांगलीत राजकीय, सामाजिक संघटनांकडून मंगळवारी निषेध करण्यात आला. काँग्रेसच्यावतीने काँग्रेसभवन येथे, शिवसेना शिंदे गटाने स्टेशन चौक येथे अतिरेकी हल्ल्याचा तीव्र निषेध करत अतिरेकी कारवायांचा तीव्र धिक्कार केला, तर शिवप्रतिष्ठानच्यावतीने दुचाकी रॅली काढत जिल्हाधिकाऱ्यांना पश्चिम बंगालमधील ममता सरकार बरखास्त करण्याची मागणी करणारे निवेदन दिले.



शिवप्रतिष्ठानच्यावतीने शहरात दुचाकी रॅली काढत अतिरेकी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. मारुती चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून निघालेली रॅली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समाप्त झाली. शिवप्रतिष्ठानच्यावतीने संस्थापक संभाजी भिडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. यामध्ये पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. तसेच पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये अल्पसंख्याक हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराचाही निषेध करण्यात आला. संसदेने वक्फ विधेयक मंजूर केल्यानंतर अल्पसंख्याक हिंदूवर हे अत्याचार होत आहेत. हे रोखण्यास ममता सरकार कमी पडत असल्याने राज्य सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

जम्मू काश्मीर खोऱ्यात पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा भाजप मिरज विधानसभा क्षेत्राच्या वतीने बुधवारी सकाळी माजी पालकमंत्री आमदार डॉ. सुरेशभाऊ खाडे यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर जाहीर निषेध करण्यात आला. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच या हल्ल्यास चोख प्रत्युत्तर देण्याची मागणी करण्यात आली.

## जम्मू-काश्मीरमध्ये नागपुरातील २२० पर्यटक अडकून, मात्र सर्व सुरक्षित

### जिल्हा प्रशासनातर्फे संपर्क क्रमांक जाहीर

**नागपूर , दि.२४** प्रतिनिधी

नागपूर जिल्ह्यातील काश्मीर येथे गेलेले पर्यटक व नातेवाइकांसाठी जिल्हा नियंत्रण केंद्र व जिल्हाधिकारी कार्यालयाने मदत कक्ष स्थापन केले आहे. ०७१२ - २५६२६६८ / ८८६००१८८१७ हे संपर्क क्रमांक चोवीस तास उपलब्ध असेल. प्रशासनाकडून आतापर्यंत जवळपास २२० पर्यटकांशी संपर्क साधण्यात आला आहे. सर्वच पर्यटक सुखरूप असून यातील बहुतांश पर्यटक श्रीनगरमध्ये थांबलेले आहेत. जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी दहशतवादी हल्ल्यात २८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. दरम्यान नागपूर जिल्ह्यातून काश्मीरमध्ये तब्बल २२० पर्यटक फिरायला गेले होते. या घटनेमुळे ते पर्यटकही अडकून पडले आहेत. जिल्हा प्रशासन या पर्यटकांवर बारीक लक्ष ठेवून आहे.



प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी प्रवीण महीरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जरीपटका येथील एक महिला किरकोळ जखमी झाली असून इतर पर्यटक सुखरूप आहेत. जखमी महिलेसह काही पर्यटक नागपूरला येण्यासाठी निघाले आहेत. अडकलेले पर्यटक व त्यांचे मित्र, कुटुंब व नातेवाइकांसाठी संपर्क क्रमांकही प्रशासनाने जारी केले आहेत. अडकलेल्या पर्यटकाबाबत कुठलीही माहिती असल्यास यावर संपर्क साधण्यास सांगितले आहे.

नागपुरातून जवळपास २२५ पर्यटक काश्मीरला पर्यटनासाठी गेले आहेत. या कुटुंबांतील प्रत्येकाशी संपर्क साधला आहे. अनेक नागपूरकरांनी प्रशासनाशी संपर्क साधला. सर्वच सुरक्षित आहेत. नागपुरातील १२ जण पहलगाममध्ये होते, यातील एक महिला किरकोळ जखमी झाली होती, उर्वरित सर्व सुखरूप आहेत. पहलगाम येथे असणारे सर्वच श्रीनगरमध्ये सुखरूप पोचले.

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## पाकची नांगी ठेचा

पृथ्वीवरील स्वर्ग, अशी ओळख असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या सहा वर्षांतील सर्वात नृशंस हल्ला करून, पाकिस्तानने नीचपणाचा कळस गाठला. ३७० कलम हटवल्यानंतर जम्मू-काश्मिरात हळूहळू कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निवळू लागली होती. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांत मोठ्या प्रमाणावर मतदान झाले. ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील नवे सरकार स्थापित होऊन, लोकशाही प्रक्रिया सुरळीत होऊ लागली. यंदा प्रथमच देशी-विदेशी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. हे सर्व न पाहवणाऱ्या पाकिस्तानने पहलगाम शहरापासून ६ किलोमीटर अंतरावरील बैसरन या गवताळ पठारावर सुनियोजित हल्ला करून, २७ पर्यटकांना ठार मारले. हे पर्यटक निसर्गाचा आनंद लुटत असताना, त्यांना टिपून टिपून मारण्यात आले.

गोळ्या घालण्यापूर्वी प्रत्येकाला त्याचा धर्म कोणता, हे विचारण्यात आले किंवा काहीजणांना कलमा किंवा कुराणातील ओळी म्हणण्यास सांगण्यात आले. कलमा म्हणता येत नाही, म्हणून गोळ्या घालण्यात आल्या आणि हिंदू धर्मीयांना थेट लक्ष्य करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अपशब्द उच्चारत, या दहशतवाद्यांनी वाह्यात शेरेबाजी केली. पाकिस्तानस्थित बंदी घातलेल्या लष्कर-ए- तोयबाचा हस्तक असलेल्या 'टीआरएफ' किंवा 'द रेसिडंटस् फ्रंट' संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी मात्र पहलगाम घटनेशी आमचा काहीच संबंध नाही, असे म्हणून कानावर हात ठेवले आहेत.

२६-११ च्या मुंबईवरील हल्ल्याशी आमचा कोणताही संबंध नाही, असे पाकिस्तानने तेव्हाही म्हटले होते, पण खुद्द अजमल कसाबने आपण पाकिस्तानातूनच प्रशिक्षण घेऊन दहशतवादाच्या उद्देशाने आलो होतो, अशी कबुली दिली होती. त्याला फाशीही देण्यात आली, पण या हल्ल्याचे सर्व पुरावे पाकिस्तानला देऊनही, या कटाचा सूत्रधार आणि 'जमात-उद दावा' व 'तोयबा' या संघटनांचा संस्थापक असलेल्या हाफिज सईदवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. गेल्याच आठवड्यात पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी, पाकिस्तानी मुस्लिम हे प्रत्येक क्षेत्रात हिंदूंपेक्षा वेगळे आहेत. आमची संस्कृती व विचारसरणी निराळी असून, द्विराष्ट्र सिद्धांत हाच पाकिस्तानचा पाया आहे. काश्मीर ही आमची ठसठसणारी जखम आहे आणि काश्मीरवरील भारताच्या कब्जाविरुद्ध आम्ही लढणार आहोत, असे संतापजनक वक्तव्य केले होते. याचा अर्थ स्पष्ट आहे.

मुनीर हे उघड उघड प्रक्षोभक वक्तव्य करून दहशतवाद्यांना फूसच लावत आहेत. पहलगाममधील माताभगिनींचा सुरू असलेला आक्रोश पाहून कोणत्याही संवेदनशील माणसाचे काळीज हललेच असणार. या माणसांचा गुन्हा असा काय होता? शिवाय 'दहशतवादाला धर्म नसतो', अशी उपदेशवाणी नेहमी ऐकवली जाते, पण मग हे दहशतवादी लोकांना त्यांचा धर्म का विचारत होते? हिंदू म्हणून जन्माला येणे, हा काही गुन्हा आहे का? पाकिस्तानची आयएसआय व तेथील लष्करी अधिकारी तरुणांची माथी भडकावून त्यांच्याकडून अशी कृत्ये घडवून आणतात. त्यामुळे या दहशतवाद्यांचा खात्मा केला, तरी तेवढ्याने चालणार नाही. त्याला खतपाणी घालणाऱ्या, पाठबळ देणाऱ्या, त्यांच्या डोक्यात धर्म व भारतद्वेषाचे विष पेरणाऱ्या शक्तींचाच बंदोबस्त करण्याची वेळ आली आहे.

पहलगामचा हल्ला झाला, तेव्हा पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर होते तसेच अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हॅन्स हे सध्या भारत दौऱ्यावर आहेत. हल्ल्याची आखणी करणाऱ्यांनी ही वेळ जाणीवपूर्वक निवडली असावी. पंचवीस वर्षांपूर्वी, म्हणजे २० मार्च २००० रोजी जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील छत्तिसिंगपोरा या गावी ३६ शिखांचे शिरकाण करण्यात आले होते. त्याच्या दुसऱ्याच दिवशी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन भारत भेटीस येणार होते. त्यावेळी पंतप्रधान वाजपेयी यांनी, या हल्ल्यात पाकितानचा हात असल्याची माहिती क्लिंटन यांना दिली होती. त्यानंतर दोनच वर्षांनी अमेरिकेचे परराष्ट्र उपमंत्री बी. रोक्का भारताच्या दौऱ्यावर असतानाच, काश्मीरमधील कालुचक येथे लष्करी जवानांच्या निवासस्थानात शिरून दहशतवाद्यांनी २३ जणांची हत्या केली होती. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी अमरनाथ यात्रेकरूंना पुन्हा पुन्हा लक्ष्य केले असून, त्यांचा कुटिल डाव अनेकदा उघड झाला आहे. २००५ मध्ये एका सरकारी शाळेसमोर स्फोटकांनी भरलेली कार उडवून दिल्याने विद्यार्थी मृत्युमुखी पडले होते. पहलगाम हल्ल्यात विविध राज्यांतील व्यक्तींचा बळी गेला असून, त्यामध्ये आठजण महाराष्ट्रातील आहेत. तर दोन विदेशी नागरिकही यात बळी पडले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हल्ल्याच्या रात्रीच काश्मीरमध्ये गेले आणि पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून भारतात परतले. दहशतवाद्यांना माफी नाही आणि त्यांच्याविरोधातील लढ्याचा निर्धार अभेद्य आहे, असे मोदी यांनी ठणकावले आहे.

## अवकाळी





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

हाती आलेल पीक
असं मातीमोल होते
त्या हिरव्या स्वप्नांची
राखरांगोळी करते

हा कसा कोसळतो
पाऊस बघ अवकाळी
पुन्हा जखमा करतो
शेतकऱ्यांच्या भाळी

आता कुठे सरकार
कोणाची वाट पाहते
अवकाळी ग्रस्तांना
कधी मदत वाटते?

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



चांगले वाईट
कळले पाहिजे ।
इतकी पाहिजे
समज हो ।।

सहज सुचले
ते घ्यावे लिहून ।
ओढून ताणून
लिहू नये ।।



## दिन विशेष

स्वप्नील इंगळे
पोळा चौक पारस

# जलसंवर्धन काळाची गरज...

आता उन्हाळा सुरू झाला आहे त्यामूळे उष्णतेचा पारा हा वाढतांना दिसत आहे, रस्ता चौक , त्याच बरोबर लग्न समारंभ यांमध्ये आपलयाला ठंड पाण्यासाठी माठ फिलटर पाणी ची गरज ही जासत प्रमाणात पडणार आहे,पण हे झाले दरवर्षी प्रमाणे पण आपण कधी याचा गांभीर्याने विचार करतच नाही.पाणी ,पाणी म्हन्जे जिवन आणी जिवण चा आपण कधीच विचारपूर्वक निर्णय घेत नाही.सागणयाचे तात्पर्य असे की दिवसा दिवस होत चाललेली पाण्याची टंचाई उन्हाळ्यात पहील्याच आठवड्यापासूनच पाणयाची झळ ही लागणे सुरू होते.जास्त प्रमाणात पाणी टंचाई ही ग्रामीण भागात जाणवते, कारण पाण्याचे नियोजन ही फार मोठी गोष्ट पाहिजे तशी अमलात आणली जात नाही, पावसाळ्यात पाऊसाचे पाणी हे पुन्हा जमिनीत जावे यासाठी



(रेन हार्वेस्टिंग) स्तुत्य उपक्रम आहे. त्यामुळे पावसाळ्यात झालेला पाऊस हा कमी होवो की जास्त त्यांचे पुर्णपणे हे पाणी व्यवस्थापन होऊ शकते.व त्याच प्रमाणे असलेल्या पाण्याचे शुद्धीकरण तेवढेच महत्वाचे असते कारण, दुरषीत पाणी पिल्याने माणसाच्या आरोग्य हे खराब होते. त्यामुळे स्वछ पाणी हे पण आरोग्याच्या दृष्टीने तेवढेच महत्त्वाचे आहे. असो हे झाले स्वच्छ पाणया बाबत पण तसेच गावातील नाले, तलाव, नदी ,तसेच बंधारे याचे पावसाळ्यापूर्वी खोलीकरण करणे गरजेचे असते, त्यामुळे पावसाळ्यात झालेले पाणी हे साठवण्यासाठी त्यांचे फार मदत होते आणि उन्हाळ्यात गावातील प्राणी,पशु,पक्षी तसेच माणव तया पाणयाचा योग्य तसा वापर करु शकतो. आजही अनेक भागात भुगर्भात गोड्या पाण्याचे झरे कमी आणी खारे पाणी जास्त प्रमाणात आढळते.मात्र हे झाले नैसर्गिक परंतु कुत्रिम रित्या पाण्याची बचत केलयास आणखी उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवणार नाही, त्याच प्रमाणे शहरातील औद्योगिक कारखान्यात वापरण्यात येणाऱ्या पाण्याच्या शुध्दीकरण प्रकल्प निर्मिती झाली पाहिजे. जनेकरूण पर्यावरण रक्षन करणयास मदत होईल. प्रत्येक नागरिकाला आपण पाणी वाचविने व त्याच बरोबर पाणयाचे योग्य ते व्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे ,जर आज आपण पाणी वाचविले तर उदयाचे जिवण वाचेल.शेतात शेतीच्या कामासाठी शेत तळे ची निर्मिती जास्त प्रमाणात व्हायला हवी त्यामुळे शेतकरयास पाऊसाचा ऋतू संपल्यावर कोणतेही बागायती पिक घयावयाचे असलयास त्या शेततळ्यातील पाण्याचा वापर शेतकरी करू शकेल, आणि त्याला चागले पिक घेण्यासाठी मदत होईल.महनुन आज जलसंवर्धनाची काळाची गरज बनली आहे आपण पाण्याचा योग्य वापर हा नियमीत केला पाहिजे आणी पाणी वाचविण्यासाठी सदेव प्रयत्नशील असायलाच हवे तरच येणार्या भावी पिढी ला पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही.



## मागोवा

चैताली वरघट
९८३४५८३६८५

# ती काय करते..?



विचारांचा गोंधळ सतत सुरु असतो तिच्या मनात,प्रत्येक कामाची लिस्ट असते तिच्या हातात, एक काम झालं कीं दुसरं असते तिच्याजवळ, सतत स्वतः ला कामात झोकून देणारी ती, दुपारी थोडा वेळ जर मिळाला तिला तोही मग संध्याकाळी काय करायच आहे जेवणात, रात्री झोपतांना ही तेच मुलानं साठी बदाम पाण्यात भिजत ठेवणे. रात्रीलाच जेवणाचे उष्टे भाडे न चुकता घासून ठेवणे. सकाळी स्वयंपाकाच नियोजन रात्रीलाचं झालेलं असते. विचारा विचारात केव्हा झोप येते तिला तीच माहित. अशी म्हणजे ती. सकाळी झोप खुलली कीं सर्वात अगोदर किती वाजले? हा पहिला प्रश्न स्वतः नेच स्वतःला केलेला. उशीर तर झाला नाही ना, सकाळी उठल्या उठल्या सर्व आवरून संपूर्ण घर झाडून स्वच्छ पुसून सर्व वस्तू टॉप टीप ठेवलेल्या, हें सर्व करून नंतर मात्र तिच्या पोटात पाण्याचा घोट जाते. पाणी पितांनाही तिच्या मनात स्वतः शी बोलण सुरूच असते. उशीर तर झाला नाही न, भर भर स्वयंपाक उरकून घ्यावा लागेल. उशीर होता कामा नये. पुन्हा मग तीच तेच सुरुचं असते. चहा करायला भांड गॅसवर ठेवते. ऐकीकडे चहा बनणं सुरु असते तर दुसऱ्या शेगडीवर वरणं भाताचा कुकर ठेवलेला असतो.एका कोपरामध्ये कणिक घेतलेली असते,मळण्यासाठी.सोबत सोलण्या करिता लसूण ही, एका शेगडीवर चहा, दुसऱ्याशेगडीवर तपवण्यासाठी ठेवलेलं दूध, तिसऱ्या शेगळीवर कुकर, इतके काम तिचे सुरु असते. चहा गाळणीने चहा गाळत असताना थोडंसं स्मित हास्य मात्र तिच्या गाली असते. सर्वांना चहा दिल्यानंतर एका चेअरवर बसून किंवा खाली बसून वाफाळलेला गरमा गरम चहा शांततेत एक एक घोट चहाचे घेत असते. पण तेव्हा ती शांत असेल असं नाही त्यातही ती मनातल्या मनात चहाच्या आस्वाद घेत साखर, इलायची, अद्रक मस्त चव आठवत चव घेत चहा घेते. तिच्या अंगात चहाची स्फूर्ती नवी ऊर्जा तिला मिळते.शेवटचा घोट जेव्हा घेते तेव्हा पुन्हा तिच्या डोक्यात समोर बाकी राहिलेल्या कामाचे चित्र उमटलेले असते. ती मग भरभर ते सर्व चहाचे कप बेसिंगच्या एका बाजूला ठेवून किंवा लवकरात लवकर धुवून ती व्यवस्थित ठेवून देते. एकही कप फुटता कामा नये. मग ती पोळ्या लाटायला सुरुवात करते. पोळी लाटत असतांना सुरुवात करण्यापासून तर शेवटची पोळी होईपर्यंत कितीतरी कल्पना तिच्या मनातून निघून असंख्य गोंधळ घालतात,मध्येच ती मुलांना जेवण करायला ताट देते किंवा नवऱ्याला जेवायला आग्रह करते. मी गरमागरम पोळी बनवते तुम्ही एकीकडे जेवण करा बऱ्याचदा होतेही असं सर्वांना जेवणाला देऊन मुलांना शाळेला पाठवून नंतर संपूर्ण घर आवरून नंतर कोठे ती शांततेत जेवण करते. बऱ्याच स्त्रियांना नाश्ता करायची सवय नसते. तर बऱ्याच स्त्रिया सतत काही ना काही खात असतात, तशी प्रत्येकांची सवय जरा वेगळीच असते पण शेवटी ती स्त्रीच आहे.दुपारचा थोडा वेळ तिला मिळाला तर त्यातही तिला आराम करावा दुपारी थोडं झोपावं तर ती ते न करता नको ते उद्योग करत असते. साफसफाई,भांडे,कपडे धुतल्यानंतर ते व्यवस्थित प्रेस करून घड्या करून ठेवते. जेवण झाल्या झाल्या भांडे घासून ठेवते. स्वयंपाक झाल्यानंतर गॅसचा ओटा रोज दोन्ही टाइम्स पुसून नीटनेटका सुंदर दिसाव अगदी चमकदार पाहिजे इतपत ती काळजी घेत असते.तरी घरातील मंडळी म्हणतात की ती काय करते..?

उन्हाळा आला रे आला की तिची तयारी सुरू होऊन जाते. गव्हाच्या कुरड्या,पापड, शेवया, मुंगाच्या,मटकीच्या वड्या करण्याची. तिच नियोजन ही ठरलेलं असते.कोणत्या दिवशी काय करायचं. नोकरदार स्त्रिया असेल तर त्या दोन पैसे शिल्लक देऊन सर्व बनवून घेतात, कारण त्यांच्या कडे म्हणावं तेवढा वेळ नसते.मात्र गृहिणींना असं जमत नाही. गृहिणी म्हटल्यानंतर हे सर्व काम तिच्या वाट्याला आलेली. स्वतः जर घरी केले तर थोडे पैसे वाचतात असं त्या स्त्रियांना वाटत असते. घरी असणाऱ्या गृहिणी म्हटल्यानंतर थोडी काटकसर त्या करतातच. सर्व मात्र स्वतः प्रेमाने न कसलीही तक्रार करत सर्व काही करतात. या सर्व कामाची दखल मात्र कोणीही घेत नाही शेवटी तिच्या वाटेला एकच वाक्य येते की ती काय करते..? बऱ्याच स्त्रियांना लहान मुलं असतात. अगोदर सारखे आता एकत्र कुटुंब बघायला मिळत नाही त्यामुळे मुलांना सांभाळण्याची जबाबदारी संपूर्ण तिच्यावर असते आता मात्र मुलांना सांभाळतांना ती स्वतःच्या इच्छा लग्नाच्या अगोदर बघितलेली बरीच स्वप्ने अपूर्ण राहिलेली असतात. अशात तिच वाढणार वय. तिचे आरोग्याकडेही म्हणावं तेवढं लक्ष तिला देता येत नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांन जवळ मुलं सांभाळायला कोणीतरी असते. अशा मध्ये ती घराबाहेरच्या वातावरणात राहिल्याने तिला तितका मात्र ताण डोक्यावर येत नाही. मात्र गृहिणी म्हणून जीवन जगत असताना तिला काही कार्यक्रम किंवा सहज शेजारांशी कधी मधी तिचं बोलणं होते ती तिच्याच गुंताऱ्यात इतकी मग्न असते की तिला बऱ्याचदा वाटते की घर मुलं, नवरा घरातील मंडळी यातच तिच संपूर्ण जीवन निघून जाते. तिला आवडणाऱ्या गोष्टीसाठी तिला वेळच मिळत नाही.कधीतरी ती एकांतात बसून जर मोबाईल बघत असेल तर त्यावरही बरीच प्रश्न उभी केल्या जाते की ही तासंताच असं मोबाईल मध्ये काय बघते. खरंतर मोबाईल मध्ये ती कधी रांगोळी,मेहंदी, गाण्याचे रिल्स, मेकअप, नवनवीन कपडे ऍक्टरचे नवे लुक ती मोबाईल मध्ये मिळालेल्या वेळामध्ये बघत असते. कधीतरी एखादी मूव्ही तर कधी ती चालू घडामोडी, स्पर्धा परीक्षेचा अभ्यासही ती गृहिणी असताना करत असते. मात्र तिच्या बद्दल बोलल्या जाणारा एक प्रश्न असतो की ती काय करते..?



## राजकारण

डॉ. विनोद गायकवाड
राजकीय अभ्यासक, मो. ९८५०३२४२०२

# दोन्ही कुटुंबाचे मनोमिलन राजकीय हिताचे!

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या मोठ्या फुटीने महाराष्ट्राच्या राजकारणात उलथापालथ झाली. या दोन पक्षातील फुटीमुळे भाजपाला महाविजय संपादन करता आला. महाराष्ट्रातील पक्ष फुटीचा इतिहास हा जुनाच असला तरी सत्ताकारणांच्या दृष्टीने या दोन पक्षातील फूट ऐतिहासिक ठरली. पक्षफुटीने महाराष्ट्राच्या राजकीय आणि न्यायालयीन व्यवस्थेसमोर अनेक प्रश्न उपस्थित केलेत. यापूर्वी ठाकरे कुटुंबात पडलेली फुट तसेच दोन वर्षांपूर्वी पवार कुटुंबात पडलेल्या फ ुटीने अस्तित्वाची लढाई सुरू झाली. म्हणूनच सत्ताकारणाकरीता पडलेल्या पक्षातील फुटीतून महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्रिकरण्याची चर्चा सुरू झाली. राज ठाकरे यांची महेश मांजरेकरांनी घेतलेल्या मुलाखतीच्या निमित्ताने राज ठाकरेंनी साद दिल्याने त्याला उद्धव ठाकरेंकडून प्रतिसाद मिळाला.

१९६६ मध्ये बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेना पक्ष स्थापन केला, वाढविला आणि सत्तेपर्यंत पोहोचविला. मात्र त्यांच्या हयातीतच शिवसेनेला मोठे धक्के बसले. पहिला धक्का छगन भुजबळांनी (तत्कालीन आमदार) दिला, त्यानंतर गणेश नाईक (तत्कालीन मंत्री), नारायण राणे (तत्कालीन मुख्यमंत्री), राधाकृष्ण विखे पाटील (तत्कालीन मंत्री), विजय वेडेट्टीवार, राहुल नार्वेकर (तत्कालीन पक्षप्रवक्ते) आणि त्यानंतर राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली. या नेत्यांनी परिस्थितीनुसार कधी भाजपाची तर कधी काँग्रेसची कास धरून राजकारण केले. शिवसेनेच्या या पडझडीमुळे पंधरा वर्षे सत्तेपासून दूर राहिली. शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठी फूट म्हणजे एकनाथ शिंदेंचे बंड होय. त्यांनी उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडून शिवसेनेत मोठे खिंडार पाडले. इतकेच नव्हे तर शिवसेनेचे निवडणूक चिन्ह आणि पक्षाचे नावही बळकावले. परिणामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची वाताहत झाली. तिकडे राज ठाकरेंनी मनसे स्थापन करून उद्धव ठाकरेच्या शिवसेना विरोधात सतत भूमिका घेतली असली तरी त्यांच्या पदरात अपयशच आले. दोनही पक्षाची विचारधारा एकच, ती म्हणजे हिंदुत्व आणि मराठी माणसाचे हित होय. मात्र ठाकरे कुटुंबाच्या विभाजनामुळे मराठी माणूस विभागला. बाळासाहेबांच्या मृत्यूनंतर ठाकरे कुटुंबांनी एकत्र येण्याची अनेकदा चर्चा रंगली. ठाकरे प्रमाणेच पवार कुटुंबाचे कौटुंबिक व सामाजिक संबंध कायम आहेत, एकमेकांच्या सुखदुः खात दिसत असले तरी तरी राजकीय संबंध मात्र दुरावले. परिणामी त्यांच्या मनोमिलनाची चर्चा अनेकदा होते.

१९९९ मध्ये काँग्रेस पक्षात फ ूट पाडून शरद पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. पवार साहेब आणि अजितदादा एकत्रित राजकारण करीत असले तरी दोघांमध्ये भाजपसोबत जाण्यावरून २०१४ पासूनच मतभेद होते. परिणामी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड करून पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह बळकावून सरतेशेवटी दादा गटाने भाजपाची कास धरली. शिंदेंची शिवसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी फडणवीसांच्या नेतृत्वात सरकारमध्ये सहभागी असले तरी ते उपमुख्यमंत्री पदावर समाधानी नाहीत. शिंदे गटाकरिता उद्धव ठाकरेंची दारे बंद झाली असली तरी अजितदादांकरीता मात्र शरद पवारांनी दारे उघडे ठेवलीत. भाजपा



आणि शिंदेंच्या शिवसेनेची राजकीय कोंडी करायची असेल तर ठाकरे बंधू एकत्रित येणे हा मोठा पर्याय आहे. विधानसभा निवडणुकीतील अमित ठाकरे यांच्या पराभवास शिंदेंच्या शिवसेनेचा उमेदवार कारणीभूत ठरला. अमितचा पराभव राज ठाकरे कधीच विसरू शकत नाहीत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे सध्या राजकीय अस्तित्वाची लढाई लढत आहेत. या लढाईत दोघे एकत्र आल्यास निश्चितच ताकद वाढेल. महाराष्ट्राच्या हितासाठी दोघेही एकत्रित येण्याचे सूतोवाच करीत असले तरी पक्षाचे नाव आणि पक्ष नेतृत्व या बाबतीत दोनही ठाकरेंचे एकमत होणे गरजेचे आहे. त्याकरिता मनसेचे शिवसेनेत विलीनीकरण करावे लागेल. राज साहेबांकडे वक्तृत्व शैली असल्याने त्यांच्या सभांना मोठी गर्दी होते. मात्र पक्षाला मतदान होत नसल्याची खंत त्यांनी वारंवार बोलून दाखविली.

एकाच विचारधारेचे दोन पक्ष आणि त्यानंतर चार पक्ष झाल्याने नेत्यांसह कार्यकर्त्यांना अडचणी आल्यात. पक्ष फुटीमूळे पक्षाची हानी तर होतेच शिवाय कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम राहतो. आयाराम गयारामांची संख्याही वाढते. विकासाला खीळ बसते. मुंबईत मराठी भाषिकांचे प्रश्न ऐरणीवर असतात. मुंबईत इतर भाषिकांची वाढती संख्या तसेच उद्योगांचा मुंबईऐवजी गुजरातकडे वाढता कल महाराष्ट्रासाठी चिंताजनक आहे. ठाकरे कुटुंब एकत्रित आल्यास मुंबई महानगरपालिकेत सत्ता येऊ शकते. छोट्या राज्यांच्या तुलनेत मुंबई महानगरपालिकेचं बजेट मोठं असल्याने मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेला आर्थिक बळही मिळू शकते. महानगरपालिका निवडणुकांपासून पुन्हा पक्षाला जिवंत ठेवण्याची ताकदही मिळेल. म्हणूनच युतीसाठी उद्धव ठाकरे सकारात्मक असल्याचे वारंवार खासदार संजय राऊत खुलासा करीत आहेत. शिवसैनिक आणि मनसैनिकांच्या ह्याच अपेक्षा दिसतात.

तिकडे पवार कुटुंबाचा विचार केल्यास अजितदादांचा पक्ष भाजपा विचारसरणीत रुजत नसल्याचे वारंवार पुढे आले. भाजप नेत्यांच्या मुस्लिमविरोधी भूमिकेला दादा विरोध करीत असतात. मुळात अजितदादांची राष्ट्रवादी हिंदुत्वाचे राजकारण करू शकत नाही. मुख्यमंत्री पद हे दादांचे स्वप्न आहे. दुसरीकडे पवार साहेबांचे वाढते वय, सोबतच्या नेत्यांचे राजकीय भविष्य, विशेष म्हणजे रोहित आणि सुप्रिया ताईंची राजकीय वाटचाल तसेच राष्ट्रीय पक्ष असलेली राष्ट्रवादी महाराष्ट्रपुरती मर्यादित झाल्याने पक्षाच्या अस्तित्वासाठी दोन्ही गटाला एकत्रित येणे आवश्यक बनले. राष्ट्रवादीचे दोन्ही गट लवकरच एकत्रित येणार असल्याचे पक्षातील नेतेच खाजगीत बोलतात. केवळ ठाकरे कुटुंबानेच नव्हे तर सर्वच कुटुंबांनी महाराष्ट्र धर्म जपण्यासाठी एकत्र यायला हवे आणि यातच महाराष्ट्राचे हित आहे असे आमदार रोहित पवारांनाही वाटते. मात्र पवार साहेबांना सत्तेत सहभागी व्हायचे आहे, की दादांना सत्तेबाहेर पडून एकत्रित यायचे आहे हे ठरवावे लागेल. एकूणच ठाकरे परिवार आणि पवार परिवार एकत्रित आल्यास भाजपा आणि शिंदे गटाला थोडे अडचणीचे ठरू शकते. म्हणूनच ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यावरून शिंदे गटात अधिक अस्वस्थता दिसते. एकत्रीकरण झाल्यास महायुती आणि महाविकास आघाडीतील मित्रपक्षातही फेरबदल होऊ शकतात.
शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत बंडाळीने पुरोगामी महाराष्ट्राची राजकीय घडी विस्कटली. विधानसभा निवडणूक तिरंगी झाली असली तरी आरोप-प्रत्यारोप मात्र ठाकरे विरुद्ध ठाकरे आणि पवार विरुद्ध पवार असे कौटुंबिक रंगलेत. दोन्ही गट आपलीच बाजू खरी असल्याचे मतदारांना सभांमधून सांगत असले तरी त्यांच्यामध्येच विसंगती असल्याने मतदार संभ्रमात असतात. एकूणच सत्तापदांकरीता पक्षांतर्गत फूट पडत असली तरी त्याचे परिणाम राजकीय संस्कृतीवर झालेत. म्हणूनच दोनही पक्षातील कुटुंबात राजकीय मनोमिलन झाल्यास महाराष्ट्राची राजकीय संस्कृती जपण्यास थोडा हातभार लागेल हे मात्र खरे.

## लोकरंजन

# प्रेमाची सुंदर अनुभूती देणाऱ्या 'सजना' चित्रपटाचे टायटल साँग लाँच



सिनेरंग

भारतीय संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध करणारा ''सजना'' चित्रपटाचा टायटल साँग प्रदर्शित करण्यात आला आहे. प्रेमातील हळव्या भावनांना स्पर्श करत, या गीतामध्ये प्रेमातील गोडवा, आठवणी, आणि नात्यांमधील निखळपणा अगदी हृदयस्पर्शी पद्धतीने मांडण्यात आला आहे. गाण्याचं चित्रिकरण देखील अत्यंत नयनरम्य आहे. सुप्रसिद्ध गायक सोनू निगम आणि राजेश्वरी पवार यांच्या भावस्पर्शी आवाजात सजलेले हे गाणं प्रेमाची नाजूक आणि गहिरं भावना व्यक्त करते. या गाण्याला संगीत दिलं आहे ओंकारस्वरूप यांनी, तर गाण्याचे बोल लिहिले आहेत सुहास मुंडे यांनी. ''सजना'' हे गाणं केवळ एक संगीतकृती नसून, प्रेमाच्या भावना, आठवणी आणि नात्यांची गुंफण उलगडणारं एक सुंदर चित्रण आहे. गाण्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

सजना ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित एक प्रेमकथा आहे. या चित्रपटाची निर्मिती सुप्रसिद्ध चित्रकार शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत प्रेम, भावना आणि संगीत यांचं अनोखं मिश्रण घेऊन येणारा ''सजना'' हा नवा चित्रपट २३ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

# लव फिल्म्सच्या 'देवमाणूस'मध्ये सई ताम्हणकर थिरकणार लावणीवर !



मराठी चित्रपटसृष्टीत आता उत्साह आणि सौंदर्याची लाट उसळणार आहे, कारण सगळ्यांची लाडकी अभिनेत्री सई ताम्हणकर देवमाणूस या बहुप्रतिक्षित चित्रपटात आलेच मी म्हणत पहिल्यांदाच शानदार लावणीवर थिरकणार आहे. हा चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.लव फिल्म्सच्या लव रंजन आणि अंकुर गर्ग यांची निर्मिती असलेला आणि तेजस देऊस्कर दिग्दर्शित या चित्रपटात महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

विविधांगी भूमिका साकारून आपली छाप पाडणारी सई, आलेच मी या गाण्यातून एका वेगळ्याच अविष्कारात प्रेक्षकांसमोर येत आहे. पारंपरिक मराठी संगीतसृष्टीत आपली खास ओळख असणाऱ्या बेला शेंडे यांच्या दमदार आवाजात हे गीत साकारण्यात आले असून रोहन प्रधान यांनी त्यांना साथ दिली आहे. रोहन-रोहन यांचे संगीत लाभलेले हे गाणे तेजस देऊस्कर यांनी लिहिले असून रोहन गोखले यांनीही अतिरिक्त गीतलेखन केले आहे. सुप्रसिद्ध लावणी तज्ज्ञ आशीष पाटील यांनी या गाण्याची नृत्यरचना केली आहे, जी अत्यंत जोशपूर्ण आणि सुरेख आहे.आलेच मी हे गाणे त्याच्या भन्नाट बीट्स, आकर्षक सादरीकरण आणि सईच्या जबरदस्त उपस्थितीमुळे लवकरच टॉप लिस्टमध्ये झळकण्यास सज्ज आहे.लव फिल्म्स प्रस्तुत, तेजस प्रभा विजय देऊस्कर दिग्दर्शित आणि लव रंजन व अंकुर गर्ग निर्मित देवमाणूस २५ एप्रिल २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 22




### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेतशब्द:—**

**दोन अक्षरी**
काका, खर्च, गन, गाल, डक, जंत, तान, ताव, दर, दया, दादा, नळ, पग, पाद, रग, रज्जू, रव, रास, लक, लक्ष्य, वक्ष, सव, हाजी

**तीन अक्षरी**
आकस, आरसा, कळस, कासव, चकली, नजर, परीट, पळस, रजत, रतन, रपका, वानर, सत्कार, स्वस्तिक, स्थावर, क्षितिज

**चार अक्षरी**
एकमात्र, एकवीरा, घरदार, घरंदाज, चोपदार, जमदग्नि, तावदान, दानवता, धरातल, परवड, भातुकली, मेघनाद, सरकणे, साक्षात्कार, स्वयंपाक

**पाच अक्षरी**
अग्निपरीक्षा, घटस्थापना, भुरटा चोर, वरदक्षिणा, साखरभात, क्षमायाचना

**सहा अक्षरी**
दळणवळण, भुजंगप्रयात, रहाटगाडगे, सावळागोंधळ

**नऊ अक्षरी**
पराचा कावळा करणे

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बा | ळ | गं | गा | ध | र | टि | ळ | क | | क | द | र | |
| बा | | गा | | र्म | | पू | | वि | र | स | | स | दा |
| सा | ठ | व | ण | | अ | सु | र | | ण | | सो | पा | न |
| हे | | त | | | व | ल | या | का | र | | | न | |
| ब | ख | र | | वि | धा | ता | | म | ण | ग | ट | | अ |
| आं | ग | ण | | म | न | न | | ना | | म | क | ब | रा |
| बे | | | वा | ल | | | जी | | दा | न | | | ज |
| ड | म | ड | म | | अ | न | व | धा | न | | म | स्त | क |
| क | रा | र | | धे | नु | | ल | | व | सं | त | | ता |
| र | त | | सां | | रू | प | ग | र्वि | ता | | दा | | |
| | ब | लि | प्र | ति | प | दा | | | | आ | र | मा | र |
| पं | | पि | त | र | | व | | आ | रा | म | | हे | वा |
| च | र | क | | क | | न | फा | | ज | र | त | र | |
| म | म | | वा | स | | ती | | वे | स | ण | | | |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 402



**—: आडवे विधाने :—**

1) आपण जेथे जन्म घेतला ती जागा
4) मौंजीपासून लग्नापर्यंत स्त्री संबंधापासून दूर राहण्याचे व्रत
6) अवलक्षणी माणूस
8) नावलैकिक, प्रतिष्ठा
9) वाणी, बोलणे
10) पाणी
11) सापाला आपल्या पुंगीच्या नादावर डोलविणारा
12) मराठीतील पहिला चरित्रग्रंथ म्हणून ओळखला जाणारा महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामींच्या आख्यायिंकांचा संगह, सहज केलेला चमत्कार
15) पत्त्यांमधील एक महत्वाचा आकडा
16) निवास, आलय
17) हृदय, अंतःकरण
20) मदतनीस, हाताखालचा माणूस
21) पटाईत, निष्णात, हुशार
22) कावळ्याचा आवाज
24) दृष्ट काढण्याच्या वस्तू
25) चिन्ह, सूचक चिन्ह, गुण
26) दिवस आणि रात्रीच्या मीलनाची वेळ, सायंकाळ
27) बंड, चळवळ, हेलकावा
30) मनात काही न ठेवता परखडपणे स्पष्ट बोलणारा
33) करिता, साठी
34) ज्याला कुणी जिंकले नाही किंवा जो नेहमी जिंकतो असा
36) सद्‌गती
38) मुलगी, कन्या
39) वर्तुळ, कडे
40) चटणी वगैरे पाटयावर वाटण्यासाठी असलेला उभट दगड
41) थकवा, ग्लानी
42) दडपण, जरब
43) रस्ता, पथ
44) तुटणे, बिघाड, अपाय
46) वर्षाच्या सहा ऋतूपैकी एक ऋतू
47) खोडकर, व्रात्य
48) अर्जुनाचे एक नाव
49) द्राक्षे
50) गव्हाचे दाणेदार पीठ
51) उत्कृष्ट, छानदार, नामांकित
52) रुपेरी मुलामा
54) खोड, दुर्गुण
56) गानकोकिळा लता मंगेशकर यांना मिळालेली आणखी एक पदवी
58) कठीण, त्रासदायक
59) जमदग्नी आणि रेणूका मातेच्या पोटी जन्मलेला भगवान विष्णुंचा सहावा अवतार परशुरामांचे आणखी एक नाव
60) गणांचा नायक गणपती

**—: उभे विधाने :—**

1) जयघोष
2) नृप
3) मोजके बोलणारा
4) ब्राह्मणंच्या जानव्यास दिलेली गांठ
5) चुगली, लावालावी
6) पौराणिकालीन पांचाल देशाची राजकन्या, द्रौपदीचे एक नाव
7) जनावरांचे खाद्य
13) मन वेधून घेणारा, गोड—गोड बोलणारा
14) पादत्राण
15) महाभारतात गुरुदक्षिणा म्हणून आपला अंगठा कापून देणारा शिष्य
18) सर्वस्वी नाश झालेला, जमिनीस मिळालेला
19) मुक्ती, सुटका
20) एक जुना मराठी विनोदी चित्रपट
21) प्रेम
22) वडिलांचा भाऊ
23) वेढा, घेरा, फेरा
28) किंचित सुद्धा अंश
29) स्वतःचेच पोट भरेल असा स्वार्थ बघणारा
30) उघड, असंदिग्ध
31) उत्पादित केलेला माल साठवून ठेवण्याची जागा
32) सुपारी घेऊन हत्या करणारी एक पुरातनकालीन जमात
35) सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांची एक साहित्यकृती
37) क्षणभर टिकणारे
40) गणितात ज्या समीकरणात अव्यक्त पदांचा दुसरा घात असतो असे समीकरण
42) मूल्य
45) गरजू
46) एक औषधी वनस्पती
47) दूध आटवून घट्ट केलेला पदार्थ घोडयाच्या आचेला लावलेला अर्ध वर्तुळाकार लोंखंडी तुकडा
53) सार्वभौम राजा
55) पांचजन्य, लाक्षणिक अर्थाने एखाद्याच्या नावे केलेली बोंब
56) देव लोक
57) आंब्यातील बी

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्व | र्गा | ला | हा | त | पो | च | णे | | सु | त | | सं | धी | | क |
| र | | भ | र | | ह | र | | आ | ल | य | | प | र | का | या |
| स | र्व | दा | | क | रा | म | त | | क्ष | | अ | | | न | स |
| म्रा | | य | थे | च्छ | | री | | पा | णी | ग्र | ह | ण | | शी | |
| ज्ञी | | क | र | | वि | त | र | ण | | ह | म | | म | ल | म |
| | स्मृ | | डा | ह | ळी | | क | पो | ल | | ह | मा | ल | | |
| प्र | ती | क | | स्त | | स | म | ई | | अ | मि | त | | अ | |
| | चि | व | डा | | प | र | वा | | मे | न | का | | त | नु | जा |
| चि | न्ह | | व | सा | | स्व | र | | वा | व | | मं | | ज | |
| त्रा | | स | खो | ल | | ती | | आ | | धा | गा | दो | रा | | अं |
| व | | वा | रा | | स्वा | | वि | द्य | मा | न | | द | ग | द | ग |
| ती | र | | | दां | भि | क | | प्र | था | | द | री | | | र |
| | ख | | भ | डी | मा | र | | व | | क्षौ | र | | ग | वा | क्ष |
| प | र | व | ड | | न | | न | र्त | क | | डा | | जा | | क |
| रा | ख | | भुं | गा | | ल | व | क | र | | व | स | न | | |
| ग | | त्रि | ज्या | | ज | व | स | | डा | | णे | | न | व | रा |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आजचा दिवस चांगला जाईल. आज तुम्ही नवीन कामे आयोजित कराल. व्यावसायिक आणि व्यावसायिकांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृषभः** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. संपूर्ण दिवस प्रियजन, नातेवाईक आणि मित्रांसोबत सामाजिक कार्य करण्यात जाईल.

**मिथून :** आज तुमचा दिवस मध्यम फलदायी राहील. घरात आणि व्यवसायात सावधगिरी बाळगा. तुमचे आरोग्य चांगले राहील परंतु तुमच्या जोडीदाराच्या आरोग्याची काळजी तुम्हाला असेल.

**कर्क :** जर तुम्ही आज थंड मनाने काम केले तर तुमच्या सर्व समस्या सुटतील. तुमचे मन आणि वाणी गोड ठेवा. तुम्ही काही नवीन काम सुरू करू शकता. आज तुम्हाला आर्थिक फायदा होऊ शकतो.

**सिंह :** आज तुमच्या कामात प्रगती होईल, परंतु तरीही तुमच्या मनात अस्थिरता राहील. तुमच्या स्वतःच्या लोकांकडून तुम्हाला अपेक्षित पाठिंबा मिळणार नाही.

**कन्या :** आज स्वतःवर थोडे नियंत्रण ठेवा आणि वादविवाद आणि भांडणांपासून दूर रहा. आज खर्च जास्त होईल. आज वाहनात अडचण येण्याची शक्यता आहे.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी भाग्यशाली आहे. घरात आनंद आणि शांतीचे वातावरण असेल आणि मनही आनंदी राहील. आनंददायी घटना घडतील.

**वृश्चिक :** आज जर तुम्ही पैशांशी संबंधित कोणतीही योजना आखत असाल किंवा कोणत्याही योजनेत गुंतलेले असाल तर काळजीपूर्वक पुढे जा.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी मध्यम फलदायी आहे. अनावश्यक खर्चावर आळा घाला. तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवल्याने कुटुंबात आनंद आणि शांती राहील.

**मकर :** आजचा दिवस शुभ आहे. नोकरी किंवा व्यवसायात तुम्हाला यश मिळेल आणि वरिष्ठ अधिकारी आनंदी होतील. ज्यामुळे तुम्ही आनंदी व्हाल. व्यवसायात संग्रहातून पैसे मिळतील.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. तुम्हाला नफ्याच्या नवीन संधी मिळतील. नोकरी करणाऱ्या आणि व्यावसायिकांसाठी आजचा दिवस चांगला राहील.

**मीन :** आज तुमचे मन अस्वस्थ असेल. धार्मिक आणि सामाजिक कार्यात पैसे खर्च होण्याची शक्यता आहे. नातेवाईक आणि मित्रांसोबत मतभेद होऊ शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### पहलगाममधील हल्ल्यातून बालंबाल बचावले गडचिरोलीचे ४३ पर्यटक




**गडचिरोली :** काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. या दु:खद घटनेतून गडचिरोलीसह शेजारच्या जिल्ह्यातील ४३ पर्यटक बालंबाल बचावले. पहलगाममधील हल्ला झालेल्या ठिकाणाहून हे पर्यटक अर्धा तासापूर्वीच खाली उतरल्याने मोठा अनर्थ टळल्याचे सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथील सहल आयोजित करणाऱ्या एका एजंटच्या माध्यमातून ४३ जण जम्मू काश्मीर आणि उत्तर-पश्चिम भागातील अन्य ठिकाणांच्या सहलीकरिता ११ एप्रिलला निघाले. त्यात मूल येथील ५ आणि ३८ जण गडचिरोलीतील होते. यात कुरखेडा आणि पोर्ला येथील मोजक्या पर्यटकांचाही समावेश होता. गडचिरोली येथील सेवानिवृत्त नायब तहसीलदार गणपत सोरते हेदेखील या पर्यटकांमध्ये होते. सोरते यांनी पहलगामच्या हल्ल्याचा वृत्तांत पुढारीला सांगितला. सोरते यांनी सांगितले आम्ही मथुरा, आग्रा, कटरा, वैष्णोदेवी इत्यादी ठिकाणी भेट देत श्रीनगरला पोहोचलो. तेथून सोनमर्ग, गुलमर्गमार्गे मंगळवारी (ता.२२) पहलगामला पोहोचलो. तेथे बैसरन नावाची घाटी आहे. ही घाटी 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओळखली जाते. आमच्यातील एकूण पर्यटकांपैकी आम्ही ४ जण घोड्यावर बसून दुपारी दीड वाजता बैसरन घाटीत पोहोचलो. उर्वरित पर्यटक खाली होते. अडीच वाजण्याच्या सुमारास आम्ही खाली आलो आणि तेथून सर्वजण चंदनवेलीला गेलो. तेथेच घाटीत आतंकवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केल्याचे आम्हाला सांगण्यात आले.

### भारत एक क्रूर शत्रू-मास्टरमाइंड कसुरीचा पहिला व्हिडिओ समोर



**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर पावले उचलली आहेत. त्याचा परिणाम आता दिसून येत आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम याठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला. यामागे लष्कर-ए-तैयबाचा उपकमांडर सैफुल्लाह कसुरी असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, आता भारताच्या कारवाईनंतर, कसुरीचा एक व्हिडिओ समोर आला आहे. यामध्ये त्याने भारतावर गंभीर आरोप केले आहेत. तसेच स्वतः हल्ल्याचा निषेध केला आहे आणि त्यासाठी आपण जबाबदार नसल्याचे म्हटले आहे.पहलगाम हल्ल्यानंतर काल रात्री झालेल्या सीसीएस बैठकीत भारताने पाच मोठे निर्णय घेतले. यामध्ये सिंधू पाणी करार थांबवण्यासह अनेक कठोर पावले उचलण्यात आली. यानंतर, लष्कर-ए-तैयबाचा उपकमांडर सैफुल्लाह कसुरी याने एक निवेदन आणि एक व्हिडिओ जारी केला आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याशी आपला काहीही संबंध नसल्याचे त्याने सांगितले. तसेच हा हल्ला देखील भारतानेच घडवून आणल्याचे सांगत हे भारताचे षड्यंत्र आहे'' असा गंभीर आरोप केला आहे.

### अमेरिकन एम४ कार्बाइनचा हल्ल्यासाठी वापर



**श्रीनगर :** एनआयएच्या प्रारंभिक तपासात पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावे मिळू लागले आहेत. बैसरनमध्ये तपासादरम्यान सुरक्षा यंत्रणांना हल्ल्यात वापरण्यात आलेल्या ५०-७० काडतूसं मिळाली असून ती अमेरिकेत निर्मित एम४ कार्बाइन असॉल्ट रायफल आणि एके-४७ द्वारे चालविण्यात आली होती. एके-४७ च्या गोळ्या चीनमध्ये निर्मित होत्या. एम४ कार्बाइन देखील पाकिस्तानी दहशतवाद्यांनी अफगाणिस्तानच्या तालिबानकडुन प्राप्त केली आहेत. हल्ल्यात दोन विदेशी दहशतवाद्यांसमवेत ४ दहशतवादी होते, हे सर्व जण भारतीय सैन्याच्या गणवेशात आले होते. याचबरोबर दोन स्थानिक हस्तकांनी बैसरम येथील मैदानात उपस्थित राहत दहशतवाद्यांना सहाय्य केल्याचे तपासात आढळून आले आहे.पहलगामनजीक पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचे पाकिस्तानी कनेक्शन समोर आले आहे. प्रारंभिक तपासानुसार दोन दहशतवाद्यांकडे एम४ कार्बाइन असॉल्ट रायफल्स होत्या, तर अन्य दोन दहशतवाद्यांकडे एके-४७ रायफल्स होत्या.

# पहलगाम हल्ल्यानंतर भारताची आक्रमक भूमिका

## अरबी समुद्रात क्षेपणास्त्रांचा सराव सुरू

नवी दिल्ली, दि.२४ वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या निर्घृण हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले. या पार्श्वभूमीवर भारताने तातडीने कडक कारवाईचे संकेत दिले असून, त्यानंतर पाकिस्तानने आपल्या युद्धनौकांना अरबी समुद्रात क्षेपणास्त्र सरावासाठी सज्ज केले आहे.
भारताच्या तात्काळ हालचालींमुळे पाकिस्तानमध्ये खळबळ उडाली असून, पाक नौदलाने २४ एप्रिलच्या सकाळपासून २५ एप्रिलच्या दुपारी ४ वाजेपर्यंत अरबी समुद्रात क्षेपणास्त्र डागण्याचा सराव सुरू केला आहे. पाकिस्तानने याची माहिती आंतरराष्ट्रीय सागरी सुरक्षा संस्थाला दिली आहे.
जम्मू-काश्मीरमधील पर्यटकांचे आवडते ठिकाण असलेल्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने देशाला हादरवून सोडले आहे. अज्ञात दहशतवाद्यांनी २६ नागरिकांवर अंदाधुंद गोळीबार करत त्यांची हत्या केली. या घटनेने देशभरात संतापाची लाट उसळली आहे. हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'अर्जन सिंह स्मृती व्याख्यानात' बोलताना या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला.



ते म्हणाले, ''भारत हे सहन करणार नाही. आम्ही योग्य वेळेवर योग्य उत्तर देऊ. दोषींना शिक्षा होईलच.''
भारताने पहलगाम हल्ल्यानंतर तातडीने केंद्रीय सुरक्षा समितीची () उच्चस्तरीय बैठक बोलावली. या बैठकीत देशाच्या सुरक्षा यंत्रणांनी संभाव्य प्रतिसादाबाबत चर्चा केली. यानंतर, पाकिस्तानने देखील घाईघाईने आपली राष्ट्रीय सुरक्षा समितीची बैठक बोलावली आहे, जी २४ एप्रिल रोजी होणार आहे. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी ही माहिती सोशल मीडिया प्लॅटफॉर्म (पूर्वीचे ट्विटर) वर शेअर केली. त्यांनी सांगितले की, भारताच्या कारवाईच्या संभाव्यतेमुळे ही बैठक आयोजित केली जात आहे.दरम्यान, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या हल्ल्याशी इस्लामाबादचा काहीही संबंध नसल्याचे वक्तव्य केले. परंतु त्यांनी या हल्ल्याचा निषेध करण्याचे टाळले. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी करत हल्ल्यात झालेल्या जीवितहानीबद्दल चिंता व्यक्त केली, मात्र त्यास 'दहशतवादी हल्ला' म्हणणे टाळले. भारताने या दुहेरी भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, पाकिस्तानवर हल्ल्याला पाठिंबा देणाऱ्या गटांचे समर्थन केल्याचा आरोप केला आहे.

## ख्रिश्चन असल्याचे सांगितल्यावर गोळी झाडली

### पत्नी आणि मुलांसमोरच पर्यटकाचा निर्घुण खून

नवी दिल्ली : दि.२४ वृत्तसंस्था



जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. यापैकी २५ जण पर्यटक होते, तर एका स्थानिक घोडेस्वाराला हल्ल्यात मारले गेले. मध्यप्रदेशमधील सुनील नथानिएल यांचीही यावेळी हत्या करण्यात आली. एलआयसीमध्ये शाखा प्रबंधक असलेल्या नथानिएल यांच्या कुटुंबियांनी पहलगाम येथे घडलेला थरारक प्रसंग कथन केला आहे. सुनील नथानिएल हे १९ एप्रिल रोजी पत्नी, मुलगा आणि मुलीसह जम्मू-काश्मीरला पर्यटनासाठी गेले होते.सुनील नथानिएल यांचे बंधू विकास यांनी एएनआयशी बोलताना सांगितले की, मंगळवारी रात्री ९.३० वाजता त्यांना पुतण्या ऑस्टिनचा फोन आला. तेव्हा सुशील या जगात नसल्याचे त्यांना समजले.सुशील यांच्या पत्नी जेनिफर यांनी विकास यांना घडलेला प्रसंग सांगितला. दहशतवादी अचानक आल्यानंतर त्यांनी सुशील यांना गुडघ्यावर बसवले आणि कलमा वाचण्यास सांगितले. यानंतर सुशील यांनी दहशतवाद्यांना ते ख्रिश्चन असल्याची माहिती दिली. हे सांगताच दहशतवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. यात सुशील यांचा जागीच मृत्यू झाला. तर आमची पुतणी आकांक्षाच्या पायाला गोळी लागली.

## बेल्जियममध्ये मेहुल चोक्सीला झटका

ब्रसेल्स, दि.२४ वृत्तसंस्था

पंजाब नॅशनल बँकेची जवळपास १३,५०० कोटी रुपयांची फसवणूक करत २०१८ मध्ये भारतातून फरार झालेला आरोपी मेहुल चोक्सीची जामीन याचिका बेल्जियम येथील एका न्यायालयाने फेटाळली आहे. तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सुनावणीनंतर जामीन न देण्याचा निर्णय दिला आहे. यापुर्वी चोक्सीचे भारतीय वकील विजय अग्रवाल यांनी जामीन याचिकेवरील सुनावणीपूर्वी एंटवर्प येथील तुरुंगात चोक्सीची भेट घेतली होती.
भारतीय अधिकाऱ्यांच्या विनंतीनुसार चोक्सीला मागील आठवड्यात बेल्जियमच्या पोलिसांनी एंटवर्प येथे अटक केली होती. चोक्सी बेल्जियमच्या एका रुग्णालयात उपचार करवून घेत होता, तेथेच त्याला अटक करण्यात आली आहे.

## पहलगाम हल्ल्याबाबत इस्लामाबादमध्ये उच्चस्तरीय बैठका!

### भारताने फटकारल्यानंतर पाकिस्तानला आली जाग

नवी दिल्ली, दि.२४ वृत्तसंस्था

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत भारतासह जगभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भारताच्या शेजारी राष्ट्रांसह अमेरिकेनंदेखील भारतासह ठामपणे उभे असल्याचं स्पष्ट केलं. या पार्श्वभूमीवर पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या ७ दहशतवाद्यांपैकी काही पाकिस्तानी असल्याचं स्पष्ट झालं आहे. यानंतर भारत सरकारनं पाकिस्तानला परखड शब्दांत सुनावत मोठ्या घोषणा केल्या. त्यात सिंधु जल करार स्थगित करणे, पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेशबंदी अशा घोषणांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर आता पाकिस्तान सरकारला उपरती आली असून उच्चस्तरीय बैठकांचं आयोजन केलं जात आहे.
केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयाकडून बुधवारी रात्री उशीरा घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत भारताकडून घेण्यात आलेल्या पाच महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली. त्यात सिंधु जल करार रद्द करणे, पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेश बंदी, भारतातील पाकिस्तानी नागरिकांनी ४८ तासांत मायदेशी परत जावं, पाकिस्तानातील भारतीय दूतावासातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या कमी करणे आणि पाकिस्तानातील भारतीयांनी लवकरात लवकर भारतात परतणे अशा निर्णयांचा यात समावेश आहे.
दरम्यान, भारतानं घेतलेल्या या निर्णयांवर पाकिस्तानकडून निषेधाचा सूर आळवण्यात आला आहे. पहलगाम हल्ल्यात आपला कोणताही हात नसल्याचं सांगत पाकिस्ताननं याआधीच या सर्व प्रकरणातून अंग काढून घेण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यात आता भारतानं एकतर्फी पद्धतीने सिंधु जल करार रद्द करणं चुकीचं अल्याचा कांगावा पाकिस्ताननं सुरू केला आहे. हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावे भारतानं सादर करावेत, अशीही मागणी पाकिस्तानकडून करण्यात आली आहे.

**पाकिस्तानला उपरती, बैठकांना वेग**
दरम्यान, भारतानं घेतलेल्या निर्णयांमुळे पाकिस्तान सरकारला जाग आली असून आता या सर्व प्रकरणावर भारताने मांडलेल्या मुद्द्यांना उत्तर देण्यासाठी पाकिस्तान सरकारकडून तयारी केली जात आहे. पाकिस्तानमध्ये काही उच्चस्तरीय बैठकांचं आयोजन गुरुवारी करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. ''पाकिस्तानमधील राष्ट्रीय सुरक्षा समितीची बैठक बोलावण्यात आली असून पंतप्रधान शाहबाझ शरीफ या बैठकीचे अध्यक्ष असतील'', अशी माहिती पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी पीटीआयशी बोलताना दिल्याचं टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तात नमूद केलं आहे.

## पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तान सरकारचे एक्स अकाउंट भारतात ब्लॉक

### केंद्र सरकारच्या विनंतीनंतर कारवाई

नवी दिल्ली : दि.२४ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्यानंतर दोन दिवसांनी भारतात पाकिस्तान सरकारचे अधिकृत एक्स अकाउंट ब्लॉक करण्यात आले आहे.
इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स ला भारतातील पाकिस्तान सरकारचे अधिकृत अकाउंट ब्लॉक करण्याची विनंती केली होती. त्यानंतर एक्सने हे पाऊल उचलले आहे. भारत सरकारने केलेल्या विनंतीनुसार, पाकिस्तान सरकारचे अकाउंट निलंबित करण्यात असून, आता ते भारतातील युजर्ससाठी उपलब्ध नाही.दरम्यान दहशतवाद्यांना सतत पाठीशी घालणाऱ्या पाकिस्तानच्या मुसक्या आवळण्यासाठी भारताने कठोर धोरण स्वीकारले आहे. कालच सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची बैठक झाल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानवर विविध निर्बंध लादले होते. त्यानंतर आता



पाकिस्तान सरकारचे एक्स अकाउंटही भारतात ब्लॉक करण्याचाही निर्णय घेतला आहे.
काल रात्री पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अधिकृत निवासस्थानी झालेल्या सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीच्या बैठकीनंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी एक पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले की, ''या दहशतवादी हल्ल्याचे गांभीर्य ओळखून, सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीने काही निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये १९६० चा सिंधू पाणी करार तात्काळ प्रभावाने स्थगित करण्याच्या निर्णयाचा समावेश आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादाला खतपाणी घालत राहील तोपर्यंत हा करार स्थगित राहील.''

### पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश

विक्रम मिस्री यांनी पुढे सांगितले की, ''संयुक्त चेकपोस्ट अटारी तात्काळ प्रभावाने बंद करण्यात येत आहे. ज्यांनी वैध मार्गाने अटारी सीमा ओलांडली आहे, ते १ मे २०२५ पूर्वी त्या मार्गाने परत येऊ शकतात. तसेच पाकिस्तानी नागरिकांना सार्क व्हिसा सवलत योजनेअंतर्गत भारतात प्रवास करण्याची परवानगी रद्द करण्यात आली आहे. यापूर्वी पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले व्हिसा रद्द मानले जातील. एसव्हीईएस व्हिसाद्वारे सध्या भारतात असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांनी तत्काळ भारत सोडावा. यासाठी त्यांना ४८ तासांची मुदत आहे.''

## पाकिस्तान सुधरणार नाही

### अमेरिकेचे मायकल रुबिन यांचे पाकिस्तानला खडेबोल

नवी दिल्ली, दि.२४ वृत्तसंस्था



काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी २२ एप्रिल रोजी पर्यटकांवर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर पाकिस्तानचा निषेध नोंदवला जातो आहे. दरम्यान या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला अमेरिकेच्या माजी लष्करी अधिकाऱ्याने झापलं आहे. अमेरिकेचे माजी अधिकारी मायकल रुबिन यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले. ''पाकिस्तान कधीही सुधरणार नाही. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर आणि ओसामा बिन लादेन यांच्यात फक्त एकच फरक आहे की लादेन गुहेत रहात होता आणि मुनीर महालासारख्या बंगल्यात राहतो. पहलगाममध्ये जो हल्या पाकिस्तानने केला त्यानंतर आता अमेरिकेने पाकिस्तानला दहशतवाद पसरवणाऱ्या देशांच्या यादीत टाकलं पाहिजे. मुनीरला दहशतवादी असल्याचं घोषित करा.'' अशी मागणी माजी अधिकारी मायकल रुबिन यांनी केली आहे.

## सर्वपक्षीय बैठकीला 'एआयएमआयएम' ला आमंत्रण नाही- ओवैसी

नवी दिल्ली, दि.२४ वृत्तसंस्था

पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून त्यांना गोळ्या घालण्यात आल्या, अशी प्रतिक्रिया दिलेल्या एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी आता केंद्र सरकारविरोधात संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. सर्वपक्षीय बैठकीत फक्त पाच ते दहा खासदार असलेल्या पक्षांनाच आमंत्रण दिल्यावरून त्यांनी संताप व्यक्त केला आहे. यासंदर्भात त्यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. एक्सवरील पोस्टमध्ये असदुद्दीन ओवैसी म्हणतात, ''पहलगाम दहशतवादी हल्ल्यासंदर्भात चर्चा करण्याकरता सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले. यासंदर्भात मी किरेन रिजिजू यांना काल रात्री संपर्क साधला. ते म्हणाले की ५ ते १० खासदार असलेल्या पक्षांनाच या बैठकीचं आमंत्रण देण्यात येणार आहे. कमी



सदस्य पक्षांना आमंत्रण का नाही? असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले की यामुळे बैठक लांबली जाईल. मग मी म्हणालो की आमच्यासारख्या लहान पक्षांचं काय मग?''
''ही भाजपाची किंवा इतर कोणत्याही पक्षाची अंतर्गत बैठक नाही. ही सर्वपक्षीय बैठक आहे. यामुळे दहशतवाद आणि दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशांना आपल्या देशातील एकतेचा संदेश मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व पक्षांचं म्हणणं ऐकून घेण्यासाठी अतिरिक्त वेळ काढू शकत नाहीत का?'' असा प्रश्नही त्यांनी यावेळी विचारला.

## भारताने 'अटारी सीमा' केली बंद

नवी दिल्ली, दि.२४ वृत्तसंस्था

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कडक कारवाई केली आहे. भारत सरकारने अटारी चेक पोस्ट तात्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. देशाच्या सुरक्षेशी संबंधित कॅबिनेट समितीने हा निर्णय घेतला आहे. या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ''वैध कागदपत्रांसह सीमा ओलांडणारे लोक १ मे २०२५ पूर्वी त्याच मार्गाने परत येऊ शकतात, परंतु हा मार्ग केवळ एका निश्चित कालावधीसाठी खुला राहील.''
दरम्यान, या निर्णयाचा भारत आणि पाकिस्तानमधील व्यापारावर काय परिणाम होईल? यांची चर्चा सर्वत्र होत आहे. एक




इंग्रजी वर्तमानपत्रानुसार, अटारी सीमा हा एकमेव जमीनी मार्ग आहे ज्याद्वारे दोन्ही देशांमधील व्यापार होतो. भारत या मार्गाने पाकिस्तानला सोयाबीन, चिकन फीड, भाज्या, प्लास्टिकचे कण, प्लास्टिकचा धागा आणि लाल मिरची यासारख्या वस्तू पाठवतो.''
अमृतसरपासून फक्त २८ किमी अंतरावर असलेले अटारी हे भारतातील पहिले भू-बंदर आहे आणि पाकिस्तानशी व्यापार करण्यासाठी एकमेव भू-मार्ग आहे. हे बंदर १२० एकरमध्ये पसरलेले आहे आणि ते थेट राष्ट्रीय महामार्ग-१ शी जोडलेले आहे. अटारी चेकपोस्ट केवळ भारत-पाकिस्तान व्यापारातच नाही तर अफगाणिस्तानातून येणाऱ्या वस्तूंच्या आयातीतही महत्त्वाची भूमिका बजावते. अटारी-वाघा कॉरिडॉरमध्ये दरवर्षी व्यापार आणि प्रवाशांच्या वाहतुकीत चढ-उतार दिसून येतात. २०२३-२४ मध्ये या बंदरातून ६,८७१ मालवाहू वाहने गेली आणि ७१,५६३ लोकांनी या मार्गाने प्रवास केला. या कालावधीत एकूण ३,८८६.५३ कोटी रुपयांचा व्यापार झाला.
हे बंदर भारत आणि पाकिस्तानमधील एक महत्त्वाचा व्यापारी मार्ग आहे. भारतातून सोयाबीन, चिकन फीड, भाज्या, लाल मिरच्या, प्लास्टिकचे दाणे आणि प्लास्टिकचा धागा यासारख्या वस्तू येथून पाठवल्या जातात. त्याच वेळी, पाकिस्तान आणि इतर देशांमधून सुकामेवा, सुका खजूर, जिप्सम, सिमेंट, काच, खडी मीठ आणि विविध प्रकारच्या औषधी वनस्पती भारतात येतात.

## पहलगामच्या बैसरणलाच दहशतवाद्यांनी लक्ष्य का केले?

### खडतर भूभाग, सुरक्षा व्यवस्था नसणे ही ठरतायत मुख्य कारणे!

श्रीनगर, दि.२४ वृत्तसंस्था

काश्मीरमधील ''मिनी स्वित्झर्लंड'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पहलगामच्या बैसरण व्हॅलीत मंगळवारी (दि.२४) पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी घडवलेल्या प्राणघातक हल्ल्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.
या हल्ल्यासाठी दहशतवाद्यांनी बैसरणची निवड का केली, याचं उत्तर त्या परिसराच्या भूगोलात दडलं आहे. इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तात येथील नकाशे आणि प्रत्यक्ष चित्रफितीद्वारे याचे विश्लेषण करण्यात आले आहे. बैसरण हे पहलगामच्या आग्नेय दिशेला असलेलं गवताळ पठार आहे. इथे पोहोचण्यासाठी नागमोडी चढाव असलेला ट्रेक मार्ग



आहे. जो झऱ्यांतून, दाट जंगलातून आणि चिखलाट रस्त्यांमधून जातो. हा मार्ग वाहनांसाठी अनुपयुक्त आहे आणि काही ठिकाणी अतिशय घसरणारा आहे.
स्थानिक व्यापारी काही सुरुवातीचा टप्पा दुचाकीवर पार करतात, पण तो मार्गही पक्का नाही. इतक्या अवघड भूभागामुळे, कोणतीही आपत्कालीन सेवा किंवा सुरक्षा यंत्रणा घटनास्थळी पोहोचायला किमान ३०-४० मिनिटं लागतात.
दररोज शेकडो पर्यटक बैसरणला भेट देतात, तरीही या मार्गावर कोणतीही पोलीस तुकडी तैनात नव्हती, हे इंडिया टुडेच्या वृत्तांकामध्ये स्पष्ट सांगण्यात आले आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोयबाच्या द रेसिस्टन्स फ्रंट या गटाशी संबंधित दहशतवाद्यांनी स्थानिक सहाय्यकांच्या मदतीने परिसराची रेकी केली होती. ते घनदाट जंगलात लपण्यासाठी ठिकाणं तयार करत होते आणि हल्ल्याच्या वेळी त्यांनी बॉडी कॅमेरेही घातले होते. १९९० नंतर पर्यटकांवर हल्ले दुर्मीळ असतानाही, या घटनेमुळे पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.

**असा करावा लागतोय बैसरणपर्यंतचा जीवघेणा प्रवास**
पहलगामहून बैसरणपर्यंत पायी किंवा घोड्यावरूनच प्रवास केला जातो. काही पर्यटक एटीव्हीचा वापर करतात, पण या भागात ते अजून व्यावसायिकरित्या उपलब्ध नाही. या ५.५ कि.मी. अंतरासाठी सुदृढ तरुणालाही जवळपास एक तास लागतो. बैसरण चारही बाजूंनी खोल दऱ्यांनी वेढलेलं असून, अधिकृत ट्रेक मार्गाशिवाय इतर कुठूनही तिथं पोहोचणं अशक्य आहे.

अजिंक्य भारत

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +1.104 |
| दिल्ली | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +0.657 |
| मुंबई | 9 | 5 | 4 | 0 | 0 | 10 | +0.673 |
| बेंगलुरु | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.472 |
| पंजाब | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.177 |
| लखनौ | 9 | 5 | 4 | 0 | 0 | 10 | -0.054 |
| कोलकाता | 8 | 3 | 5 | 0 | 0 | 6 | +0.212 |
| राजस्थान | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -0.633 |
| हैदराबाद | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -1.361 |
| चेन्नई | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -1.392 |

# हैदराबादला नमवत मुंबई पलटनची गुणतालिकेत एण्ट्री

नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी



आयपीएल २०२५ स्पर्धेत मुंबई इंडियन्सला सूर गवसला आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि सनरायजझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना पार पडला. या सामन्यात मुंबई इंडियन्सला विजयासाठी १४४ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना रोहित शर्माच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने ७ गडी राखून विजय मिळवला आहे.

मुंबई इंडियन्सला या हंगामात हवी तशी सुरूवात करता आली नव्हती. मात्र, गेल्या चारही सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सने विजयाची नोंद केली आहे. या विजयासह मुंबईने गुणतालिकेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला मागे सोडत तिसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. यासह मुंबईचा प्लेऑफमध्ये जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी १४४ धावा करायच्या होत्या. मुंबईची बॅटिंग लाईनअप पाहता, हे आव्हान फार मोठं नव्हतं. मुंबईकडून डावाची सुरूवात करण्यासाठी रायन रिकल्टन आणि रोहित शर्माची जोडी मैदानावर आली. रायन रिकल्टनला या डावात चांगली सुरूवात करून देता आली नाही. तो अवघ्या ११ धावांवर तंबूत परतला. त्यानंतर रोहित शर्माने एक बाजू धरून ठेवली. रोहितने ४६ चेंडूंचा सामना करत ८ चौकार आणि ३ चौकारांच्या साहाय्याने ७० धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबईने सामन्यावर पकड मजबूत केली. विल जॅक्सने २ षटकार आणि १ चौकाराच्या साहाय्याने २२ धावांची खेळी केली. शेवटी सूर्यकुमार यादवने १९ चेंडूंचा सामना करत नाबाद ४० धावांची खेळी केली आणि संघाला ७ गडी राखून विजय मिळवून दिला.या सामन्यात सनरायझर्सचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी आला होता. मात्र या संघाला हवी तशी सुरूवात करता आली नाही. पावरप्लेमध्ये तुफान फटकेबाजी करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या हैदराबादला मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी लागोपाठ धक्के दिले. पावरप्लेमध्येच हैदराबादचे ४ प्रमुख फलंदाज तंबूत परतले होते. हैदराबाद हेनरिक क्लासेनने एकेरी झुंज दिली. त्याने ४४ चेंडूंचा सामना करत ७१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने संघाची धावसंख्या १४३ पर्यंत पोहोचवली.या विजयासह मुंबई इंडियन्सने गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. मुंबईने गेल्या चारही सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. ९ सामन्यांपैकी ४ सामन्यांमध्ये मुंबईला पराभवाचा सामना करावा लागला आहे. तर ५ विजयासह मुंबईचा संघ १० गुणांसह तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. या यादीत गुजरातचा संघ १२ गुणांसह अव्वल स्थानी आहे. तर दिल्लीचा संघ दुसऱ्या स्थानी आहे. मुंबईच्या विजयानंतर बंगळुरूचा संघ चौथ्या स्थानी सरकला आहे.

## शिवम दुबेने १० खेळाडूंसाठी जाहीर केली ७ लाखांची शिष्यवृत्ती



नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी

आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्स संघाचे प्रदर्शन आतापर्यंत खूपच खराब राहिले आहे. हा संघ गुणतालिकेत सध्या सगळ्यात खालच्या स्थानावर आहेत. या दरम्यान, चेन्नई सुपर किंग्सच्या एका स्टार अष्टपैलू खेळाडूने तामिळनाडूतील १० उदयोन्मुख खेळाडूंकरता मोठी घोषणा केली आहे. च्या या खेळाडूने तामिळनाडू स्पोर्ट्स जर्नालिस्ट असोसिएशन अवॉर्ड अँड स्कॉलरशिप या कार्यक्रमाच्या वेळी हा निर्णय जाहीर करून सर्वांची मने जिंकली.



## ऑरेंज कॅपच्या शर्यतीत निकोलस पूरनची घसरण

नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी

लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स आयपीएल २०२५ च्या ४० व्या सामन्यानंतर साई सुदर्शनने ऑरेंज कॅपच्या शर्यतीत वर्चस्व गाजवले. खरं तर, लखनौ विरुद्ध दिल्ली सामन्यात निकोलस पूरनला मोठी खेळी खेळण्याची आणि ऑरेंज कॅप पुन्हा मिळवण्याची संधी होती, परंतु या सामन्यात एलएसजीचा हा फलंदाज स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतला. पूरण अजूनही यादीत दुसऱ्या स्थानावर आहे, तर गुजरात टायटन्सच्या साई सुदर्शनला आता त्याची आघाडी वाढवण्याची संधी आहे.दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या या सामन्यात निकोलस पूरन फक्त ९ धावा करून बाद झाला. यासह, त्याने आयपीएल २०२५ मध्ये ८ सामन्यांमध्ये ३६८ धावा केल्या आहेत आणि तो ऑरेंज कॅपच्या शर्यतीत दुसऱ्या स्थानावर आहे. तर गुजरात टायटन्सचा साई सुदर्शन ४१७ धावांसह यादीत अव्वल स्थानावर आहे. गुजरात टायटन्सचा हा फलंदाज या हंगामात ४०० धावांचा टप्पा ओलांडणारा आतापर्यंतचा एकमेव फलंदाज आहे.

## गौतम गंभीरला जीवे मारण्याची धमकी

नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी

भाजपाचा माजी खासदार आणि टीम इंडियाचा मुख्य कोच गौतम गंभीरला ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. काश्मीर नावाच्या संघटनेने ही धमकी दिली आहे. ज्यानंतर या संघटनेविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. बुधवारी गौतम गंभीरने या संघटनेविरोधात पोलिसात तक्रार दाखल केली आणि स्वतःची तसंच त्याच्या कुटुंबासाठी सुरक्षा पुरवा अशी मागणी केली.पहलगाम या ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्याची गौतम गंभीर यांनी कठोर शब्दांत निंदा केली होती. त्यानंतर गौतम गंभीरला ही धमकी देण्यात आली आहे. सध्या सुरू असलेल्या आयपीएलमुळे गौतम गंभीर सध्या टीम इंडियापासून ब्रेकवर आहे. अलीकडेच तो त्याच्या कुटुंबासह युरोप दौऱ्यावर गेला होता. पण पहलगाम हल्ल्याच्या एका दिवसानंतर त्याला आता जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे.आयपीएल संपल्यानंतर टीम इंडिया इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. त्या दौऱ्यावेळी गौतम गंभीर पुन्हा एकदा आपली जबाबदारी पार पाडताना दिसणार आहे. आयपीएल २०२५ सुरू होण्यापूर्वी, गौतम गंभीरच्या प्रशिक्षकपदाखाली टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतपद जिंकले होते.

मात्र फायनलसाठी पात्र ठरण्यास भारतीय संघाला अपयश मिळाले होते.गौतम गंभीरच्या प्रशिक्षकपदाखाली इंग्लंड दौऱ्यावर पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाईल. ही मालिका जून ते ऑगस्ट दरम्यान होईल. इंग्लंडमधील कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाची तयारी करणे आणि ती जिंकणे यावरच गंभीरचे लक्ष असणार आहे.

## राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्र संघ प्रथम



नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी

जयपूर, राजस्थान येथे झालेल्या राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने प्रथक क्रमांकाचे पारितोषिक पटाकावले आहे.या स्पर्धेत संपूर्ण भारतातून ४०० विद्यार्थीनी सहभाग घेतला यात महाराष्ट्र, राजस्थान, तेलंगना, तामिळनाडू, मणिपूर, नागालँड, कोलकाता या संघांच्या खेळाडूंचे प्रमाण जास्त होते.महाराष्ट्राच्या संघात एकूण ६८ विद्यार्थी होते, त्यापैकी १९ विद्यार्थी पिंपरी चिंचवड शहरातील आहेत. या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले तसेच सुवर्ण आणि रौप्य पदके मिळवली.

या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष व सचिव संतोष देशमुख व संतोष खंदारे यांनी केले. या स्पर्धेत महाराष्ट्रतर्फे पंच म्हणून रवि गायकवाड, स्नेहल पवार व उमेश थोरवे यांनी केले. महाराष्ट्र संघाचे कोच नरेश मेहेत्रे यांचे खेळाडूना मार्गदर्शन मिळाले.

## झिम्बाब्वेने ४ वर्षांनी कसोटी जिंकली; ६ वर्षांनी बांगलादेशला त्यांच्याच घरात धूळ चारली

ढाका :: दि. २४ प्रतिनिधी

झिम्बाब्वेने बांगला देशला त्यांच्याच घरच्या मैदानावर धूळ चारत क्रिकेट विश्वात मोठी खळबळ उडवून दिली आहे. कसोटी क्रमवारीत १२ व्या क्रमांकावर असलेल्या झिम्बाब्वेने ९ व्या क्रमांकावर असलेल्या बांगला देश संघाला पराभूत करून कसोटी क्रिकेटमध्ये चमत्कार केला. झिम्बाब्वेने पहिल्या कसोटीत यजमान बांगला देशचा ३ विकेट्सने पराभव केला आणि कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.झिम्बाब्वेने पहिला कसोटी सामना ४ दिवसांत जिंकला. कर्णधार म्हणून क्रेग एर्विनचा हा पहिलाच कसोटी विजय आहे. त्याच वेळी, झिम्बाब्वेला ४ वर्षांनंतर पहिला कसोटी विजय मिळाला. झिम्बाब्वेने शेवटचा कसोटी विजय मार्च २०२१ मध्ये अफगाणिस्तानविरुद्ध मिळाला होता. इतकेच नाही तर झिम्बाब्वेला ६ वर्षांनी बांगला देशमध्ये कसोटी जिंकण्यात यश आले आहे.झिम्बाब्वेसमोर विजयासाठी १७४ धावांचे लक्ष्य होते, जे त्यांनी चौथ्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात पूर्ण केले. झिम्बाब्वेच्या विजयात सलामीवीर ब्रायन बेनेट याने मोलाचे योगदान दिले. त्याने दोन्ही डावात शानदार अर्धशतके झळकावली. त्याने पहिल्या डावात ५७ तर दुसऱ्या डावात ५४ धावांची महत्त्वाची खेळी साकारली.



बांगलादेश आणि झिम्बाब्वे यांच्यातील २ सामन्यांची कसोटी मालिका २० एप्रिल रोजी सिल्हेट आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सुरू झाली. बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण पहिल्या डावात त्यांचा डाव १९१ धावांवर संपुष्टात आला. प्रत्युत्तरात, ब्रायन बेनेट आणि शॉन विल्यम्स यांच्या अर्धशतकांच्या जोरावर झिम्बाब्वेने पहिल्या डावात २७३ धावा करून ८२ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या दिवसाच्या खेळाअखेर बांगलादेशने दुसऱ्या डावात १ विकेट गमावून ५७ धावा केल्या होत्या. तिसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात पावसामुळे एकही चेंडू टाकता आला नाही. त्यानंतर कर्णधार शांतो आणि मोमिनुल हक (४७) यांच्या खेळीमुळे बांगला देश संघ तिसऱ्या दिवशी पुनरागमन करू शकला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी केली. मात्र, मोमिनुल आणि मुशफिकुर रहीम लागोपाठ बाद झाले. त्यानंतर शांतो आणि झाकीर यांनी पाचव्या विकेटसाठी नाबाद ३९ धावांची भागीदारी करून पुढील कोणताही धक्का बसू नये याची खात्री केली. झिम्बाब्वेकडून ब्लेसिंग मुझारबानीने ५१ धावांत तीन विकेट्स घेतल्या. तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस, बांगलादेशने ४ विकेट गमावल्यानंतर १९४ धावा केल्या होत्या. यानंतर, चौथ्या दिवशी, यजमान संघाला त्यांच्या धावसंख्येत फक्त ६१ धावा जोडता आल्या आणि त्यांचा संघ २५५ धावांवर सर्वबाद झाला. अशाप्रकारे झिम्बाब्वेला जिंकण्यासाठी १७४ धावांचे लक्ष्य मिळाले.

## ॲक्सिस बँकेने एफडी व्याजदरात केले बदल




ॲक्सिस बँकेने मुदत ठेवींवरील (एफडी) व्याजदर कमी केले आहेत. आता, ॲक्सिस बँकेत एफडी केल्यावर, सामान्य नागरिकांना ३% ते ७.०५% पर्यंत व्याज मिळेल. तर ज्येष्ठ नागरिकांना ३.५०% ते ७.६५% पर्यंत व्याज मिळेल. हे व्याजदर आजपासून म्हणजेच २३ एप्रिलपासून लागू होतील. आरबीआयने रेपो दरात कपात केल्यानंतर आता बँकाही एफडी व्याजदर कमी करत आहेत. ३ कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेच्या एफडीच्या व्याजदरात हे बदल करण्यात आले आहेत.याआधी एचडीएफसी बँकेने मुदत ठेवींवरील (एफडी) व्याजदर कमी केले आहेत. एचडीएफसी बँकेत एफडी केल्यावर सामान्य नागरिकांना ३% ते ७.०५% पर्यंत व्याज मिळेल. तर ज्येष्ठ नागरिकांना ३.५०% ते ७.५५% पर्यंत व्याज मिळेल. ३ कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेच्या एफडीच्या व्याजदरात हे बदल करण्यात आले आहेत.अलीकडेच, स्टेट बँक ऑफ इंडिया () आणि बँक ऑफ इंडिया () ने मुदत ठेवींवरील () व्याजदर कमी केले आहेत. आता, एसबीआय १ वर्षाच्या एफडीवर ६.७०% व्याज देत आहे. आता, सामान्य नागरिकांना बँक ऑफ इंडिया () मध्ये १ वर्षाच्या वर ७.०५% व्याज मिळेल. आरबीआयने रेपो दरात कपात केल्यानंतर आता बँकाही एफडी व्याजदर कमी करत आहेत.एफडीमध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी, त्याच्या कालावधीबद्दल विचार करणे महत्वाचे आहे. कारण जर गुंतवणूकदारांनी मुदतपूर्तीपूर्वी पैसे काढले तर त्यांना दंड भरावा लागेल. जर तुम्ही एफडी मॅच्युरिटीपूर्वी मोडली तर तुम्हाला १% पर्यंत दंड भरावा लागेल. यामुळे ठेवीवरील एकूण व्याज कमी होऊ शकते.

# स्टील आयातीत होणार मोठी वाढ

नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी



जर तुम्हाला भारताला पोलादासारखे मजबूत बनवायचे असेल तर एकत्र काम करा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी उद्योग जगताला सांगितले. इंडिया स्टील २०२५ कार्यक्रमाला ऑनलाइन संबोधित करताना ते बोलत होते. पीटीआयच्या वृत्तानुसार, या भाषणात पंतप्रधान म्हणाले की, फायदेशीर बदलांना वेगाने पुढे नेऊ शकेल आणि पोलादाइतका मजबूत भारत निर्माण करण्यासाठी, देशाला कच्चा माल सुरक्षित करण्यासाठी जागतिक भागीदारी मजबूत करण्याची आवश्यकता आहे.पंतप्रधानांनी स्टील उत्पादन वाढवण्यासाठी वापरात नसलेल्या नवीन खाणींमधून लोहखनिज काढण्यास सुरुवात करण्याचे आवाहनही केले. स्टीलला एक उदयोन्मुख क्षेत्र म्हणून वर्णन करताना, मोदींनी त्याचे उत्पादन वाढवण्याची गरज अधोरेखित केली, जे विकासाचा कणा आहे. त्यांनी नवीन प्रक्रिया स्वीकारण्याचा, नाविन्यपूर्णतेचा आणि कोळशाची आयात कमी करण्याचा विचार करण्यास सांगितले.पंतप्रधान मोदी म्हणाले की, कच्च्या मालाची सुरक्षा ही एक मोठी चिंता आहे. आपण अजूनही निकेल, कोकिंग कोळसा आणि मँगनीजसाठी आयातीवर अवलंबून आहोत. आणि म्हणूनच आपण जागतिक भागीदारी मजबूत केली पाहिजे, पुरवठा रेषा सुरक्षित केल्या पाहिजेत आणि तंत्रज्ञानाच्या अपग्रेडिंगवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.पंतप्रधान म्हणाले की, देशाने कोळशाची आयात कमी करण्यासाठी कोळशाचे गॅसिफिकेशन आणि त्याच्या साठ्याचा चांगला वापर यासारखे पर्याय देखील शोधले पाहिजेत. पंतप्रधान म्हणाले की, उद्योगाने भविष्यासाठी सज्ज असले पाहिजे आणि नवीन प्रक्रिया, नवीन स्तर आणि नवीन व्याप्ती स्वीकारली पाहिजे. देशाचे स्टील उत्पादन क्षमता २०२३-२४ च्या १७९ दशलक्ष टनांवरून २०३० पर्यंत ३०० दशलक्ष टनांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच, त्याच कालावधीत दरडोई स्टीलचा वापर सध्याच्या ९८ किलोवरून १६० किलोपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे.रस्ते, रेल्वे, विमानतळ, बंदरे आणि पाइपलाइनमधील विकासाचा वेग स्टील क्षेत्रासाठी नवीन संधी निर्माण करत असल्याचे मोदी म्हणाले. मोठ्या प्रकल्पांची वाढती संख्या उच्च दर्जाच्या स्टीलची मागणी वाढवेल. पहिल्या स्वदेशी विमानवाहू युद्धनौका विक्रांत आणि चांद्रयान मोहिमेत वापरलेले स्टील स्थानिक पातळीवर तयार केले गेले होते. निर्यात बाजारपेठेवर लक्ष ठेवून आधुनिक आणि मोठी जहाजे बांधण्याची देशाची महत्त्वाकांक्षा असल्याचे पंतप्रधान म्हणाले. अशा कामांसाठी उच्च दर्जाचे स्टील आवश्यक असेल.पंतप्रधानांनी यावर भर दिला की भारत आता केवळ देशांतर्गत विकासावर लक्ष केंद्रित करत नाही तर जागतिक नेतृत्वासाठी तयारी करत आहे. जग आता भारताला उच्च दर्जाच्या स्टीलचा विश्वासार्ह पुरवठादार म्हणून पाहते असे त्यांनी नमूद केले.

## सोन्याने तोडले सर्व रेकॉर्ड, १ लाख पार

नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी



सोन्याच्या दरात तेजी कायम आहे. किरकोळ बाजारात सोन्याने १ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. आता मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याचा दर मंगळवारी प्रति १० ग्रॅम ९९,१७८ रुपयांच्या नव्या उच्चांकावर पोहोचला. हा दर मागील सत्रातील दरापेक्षा जवळपास १,९०० रुपयांनी अधिक आहे.सोमवारी जीएसटी वगळता, सराफा बाजारात सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम ९७,२०० रुपयांवर होता.

तर ३ टक्के जीएसटीसह हा दर किरकोळ बाजारात सोन्याच्या दराने १ लाख रुपयांचा टप्पा पार केला. दरम्यान, आज एमसीएक्सवर सोन्याचा दर ०.३३ टक्के वाढून प्रति किलो ९५,५६२ रुपयांवर खुला झाला.दिल्लीत २४ कॅरेट म्हणजे शुद्ध सोन्याचा दर १,६५० रुपयांनी वाढून प्रति १० ग्रॅम ९९,८०० रुपयांवर पोहोचला आहे.

किरकोळ बाजारात सोने खरेदी करताना जीएसटीसह घडणावळ खर्च आकारला जातो. यामुळे प्रति तोळा सोन्याचा दर १ लाख रुपयांवर गेला आहे.मुंबईत २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १ लाख १ हजारांवर पोहोचला आहे. चेन्नई आणि बंगळूरमध्येही सोने १ लाख पार झाले आहे.जागतिक बाजारातील अनिश्चिततेमुळे सोने आणि चांदीच्या किमतीत मोठ्या प्रमाणात अस्थिरता दिसून येत आहे.

## भारत-पाकिस्तान दोन्ही देशांच्या शेअर बाजारात घसरण

नवी दिल्ली : दि. २४ प्रतिनिधी



पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध घेतलेल्या कठोर कूटनीतिक कारवाईमुळे गुंतवणूकदारांमध्ये सावधगिरीचे वातावरण निर्माण झाले. याचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर दिसून आला, जिथे सलग सात सत्रांच्या तेजीनंतर गुरुवारी सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांक घसरणीसह बंद झाले.नॅशनल स्टॉक एक्सचेंज () वर निफ्टी ५० निर्देशांक ८२.२५ अंकांनी म्हणजेच ०.३४ टक्क्यांनी घसरून २४,२४६.७० वर बंद झाला, तर बीएसई सेन्सेक्स ३१५ अंकांनी म्हणजेच ०.३९ टक्क्यांनी खाली येऊन ७९,८०१.४३ वर स्थिरावला. निफ्टीने दिवसाची सुरुवात २४,२७७ वर सपाट पातळीवर केली, दिवसभरात उच्चांकी २४,३४७ आणि नीचांकी २४,२३२ अशी चढउतार दिसून आली.राष्ट्रीय शेअर बाजारावर एचयूएल, भारती एअरटेल, आयशर मोटर्स, ओएनजीसी आणि श्रीराम फायनान्स या कंपन्यांच्या समभागांमध्ये मोठी घसरण नोंदवली गेली. दुसरीकडे, अल्ट्राटेक सिमेंट, ग्रासिम इंडस्ट्रीज, टाटा मोटर्स आणि टाटा कन्झ्युमर यांनी वाढ नोंदवली. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांवर विशेष परिणाम झाला.अशिका इन्स्टिट्यूशनल इक्विटीचे तांत्रिक आणि डेरिव्हेटिव्ह्ज विश्लेषक सुंदर केवट म्हणाले.




अजिंक्य भारत

# आपला विदर्भ

अकोला, शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५






## थोडक्यात

### हातात चाकू घेऊन दहशत माजविणाऱ्या आरोपीस अटक

**अकोला :** शहरातील लहान उमरी भागात हातात स्टील चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत पसरवणाऱ्या एका तरुणास सिव्हिल लाईन पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई बुधवार, दि. २४ एप्रिल रोजी दुपारी १२.३९ वाजता करण्यात आली. या प्रकरणी आरोपीविरोधात आर्म ॲक्टच्या कलम ४, २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पोलीस नाईक उमेश कुमार यादव (ब.नं. ६६३, पो.स्टे. सिव्हिल लाईन) हे पोलीस स्टेशनचे स्टाफसह परिसरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लहान उमरी येथील ढोके पेट्रोल पंपाजवळ एक इसम हातात धारधार चाकू घेऊन आरडा ओरड करत असून, परिसरात दहशत निर्माण करीत आहे.त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपी अंकुश प्रकाश घाटोळे (वय २७, रा. ढोके पेट्रोल पंप समोर, लहान उमरी, अकोला) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे तपासणी केली असता त्याच्याकडे स्टील धातूचा धारधार चाकू आढळून आला. त्यास ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्यावर सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन येथे प्रकाश जूनगडे (ब.नं. २०) यांच्या तक्रारीवरून गुन्हा क्रमांक १३८/२०२४ नुसार कलम ४, २५ अर्म्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या प्रकरणाचा अधिक तपास सिव्हिल लाईन पोलीस करत आहेत.

### सकल जैन समाजाचा संतप्त मोर्चा




**अकोला :** सत्य, अहिंसा, शांती आणि अनेकांतवाद ही अमूल्य तत्वे संपूर्ण जगाला देणारा जैन धर्म सध्या देशभरातील विविध घटनांमुळे चिंतेत आहे. मध्यप्रदेशातील नीमच जिल्ह्यातील सिंगोली गावात जैन साधूंवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. यासोबतच मुंबई महापालिकेने दिगंबर जैन मंदिराची तोडफोड केली, तर शत्रुंजय पालिताणा, गिरनार, रणकपूर आणि समेतशिखरजीसारख्या तीर्थस्थळांवर अतिक्रमण करण्यात आल्याने संपूर्ण जैन समाजामध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.या घटनांचा निषेध करण्यासाठी अकोल्यात सकल जैन समाजाच्या वतीने भव्य आणि मूक मोर्चा काढण्यात आला. शहरातील प्रमुख मार्गांवरून हा मोर्चा काढण्यात आला असून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात, नीमच येथे साधूंवर हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, मुंबईतील मंदिर पाडणाऱ्या बीएमसी अधिकाऱ्यांवर त्वरित कार्यवाही करून संबंधित मंदिराची पुनर्बांधणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पायी प्रवास करणाऱ्या साधू-साध्वींसाठी सुरक्षा व्यवस्था आणि विश्रांती स्थळांची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली.देशभरातील सर्व जैन तीर्थक्षेत्रे अतिक्रमणमुक्त करून त्यांच्या पवित्रतेचे रक्षण करण्याचीही गरज व्यक्त करण्यात आली. यावेळी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा ही तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. या मोर्चामध्ये विविध जैन संघटना, महिला मंडळ, तरुण मंडळ यांचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### आर्णी तहसीलमधील जलशुद्धीकरण यंत्र बंदच!

**आर्णी:** आर्णी तहसील कार्यालयाच्या आवारात लाखो रुपये खर्चून उभारलेले जलशुद्धीकरण यंत्र दोन वर्षांपासून धूळखात पडून आहे. ४३ डिग्री तापमानात कामानिमित्त येणारे शेकडो नागरिक तहानलेले असताना, ही सुविधा केवळ शोभेची वस्तू ठरली आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.आर्णी शहराचे तापमान सध्या ४३ डिग्री सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. अशा कडक उन्हात कामानिमित्त दररोज शेकडो नागरिक तहसील कार्यालयाच्या आवारात येतात. या आवारात तहसील कार्यालयासोबतच पंचायत समिती आणि न्यायालयीन इमारतही आहे. या सर्व कार्यालयांतील कर्मचारी आणि विविध कामांसाठी येणाऱ्या अभ्यागतांना स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने सुमारे दोन वर्षांपूर्वी महसूल प्रशासनाने उपलब्ध निधीतून लाखो रुपये खर्च करून येथे एक आधुनिक जलशुद्धीकरण यंत्रणा (वॉटर प्युरिफिकेशन प्लांट) बसवली होती. या यंत्रणेमध्ये पाणी शुद्ध करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व उपकरणे बसवण्यात आली आहेत. मात्र, ही यंत्रणा बसवल्यापासून गेल्या दोन वर्षांत ती कधी सुरूच झाली नाही. आजतागायत ही लाखो रुपयांची यंत्रणा धूळखात पडून असून, केवळ एक शोभेची वस्तू बनली आहे. विशेष म्हणजे, तहसील, पंचायत समिती किंवा न्यायालयीन प्रशासनातील कोणताही संबंधित अधिकारी या बंद पडलेल्या यंत्रणेकडे फिरकूनही पाहत नसल्याचे चित्र आहे, ही मोठी शोकांतिका आहे. एकीकडे उन्हाचा तडाखा वाढत असून, नागरिकांना दर अर्ध्या तासाने पाण्याची गरज भासत आहे.

# महागाव शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची होणार चौकशी

## परीक्षा केंद्र चालकांकडून पैसे वसुलीचा आरोप; जिल्हा परिषदेकडून समिती नियुक्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**महागाव, दि. २४ :** महागावचे शिक्षण विस्तार अधिकारी विजय बेतेवाड यांच्या कथित 'पठाणी वसुली' प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषदेने समिती नेमली आहे. मनसेने परीक्षा केंद्र चालकांकडून कॉपीमुक्तीच्या नावाखाली पैसे उकळल्याचा आरोप करीत चौकशीची मागणी केली होती. या निर्णयामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली असून, अनेकांचे धाबे दणाणले आहेत.




महागाव पंचायत समिती शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी विजय बेतेवाड यांनी तालुक्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षा केंद्र चालकांकडून 'कॉपीमुक्ती'च्या नावाखाली पैशांची वसुली केल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) केला आहे. परीक्षा केंद्रांवर भेटी देऊन, 'उद्याचा पेपर कडक केला जाईल, त्यामुळे योग्य ती रक्कम द्यावी लागेल' अशी दमदाटी करून बेतेवाड यांनी शिक्षक व केंद्र चालकांकडून 'पठाणी वसुली' केल्याचे मनसेने म्हटले आहे. याप्रकरणाची सखोल चौकशी करून वसुली करणारे शिक्षण विस्तार अधिकारी विजय बेतेवाड आणि त्यांना या कामात मदत करणाऱ्या इतर संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार आणि मनविसे माजी जिल्हाध्यक्ष अनिल हमदापुरे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली होती. मनसेच्या या निवेदनाची आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रकाश मिश्रा यांनी तात्काळ चौकशी समिती नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. या चौकशी समितीच्या अध्यक्षपदी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) निता गावंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

समितीत सदस्य म्हणून यवतमाळ पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी प्रणिता गाढवे आणि महागाव पंचायत समितीचे कनिष्ठ सहाय्यक स्वप्निल भांगे यांचा समावेश आहे.

### अनेक गैरप्रकार येणार उजेडात

ही समिती लवकरच चौकशी सुरू करणार असल्याने महागाव तालुका शिक्षण विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची निःपक्ष चौकशी झाल्यास शिक्षण विभागातील अनेक गैरप्रकार उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात असून, त्यामुळे अनेक अधिकारी, कर्मचारी आणि संस्था चालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मनसेने केवळ विस्तार अधिकाऱ्यांचीच नव्हे, तर त्यांना वसुलीसाठी मदत करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे.

# शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे त्वरित पूर्ण करावे

## जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** पुनर्ररचित हवामान आधारित फळपिक विमा योजना अंबिया बहार सन २०२४-२५ अंतर्गत जिल्ह्यातील ज्या शेतक-यांनी फळपिकांचा विमा घेतलेला आहे, त्यांनी ई-पिक पाहणी डिजीटल क्रॉप सर्वे मोबाइल ॲपद्वारे शुक्रवार (ता.२५ ) पर्यंत पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.




पुनर्ररचित हवामान आधारित फळपिक विमा योजना दिनांक १२ जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यात युनिवर्सल सोम्पो जनरल इंसुरन्स कंपनी मार्फत मृग बहार मध्ये डाळिंब, पेरू, मोसंबी, लिंबू, संत्रा या फळपिकांसाठी तर अंबिया बहार सन २०२४-२५ मध्ये केळी, डाळिंब, पपई, मोसंबी, संत्रा या फळपिकांसाठी हवामान धोकयांच्या निकषानुसार राबविण्यात येत आहे. पुनर्ररचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत सहभागी होणा-या शेतक-यांनी ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे. ज्या शेतक-यांनी फळपिकांचा विमा घेतलेला आहे. परंतु फळपिकांची ई पिक पहाणी डिजीटल क्रॉप सर्वे () मोबाइल ॲपद्वारे केलेली नाही. त्यांनी दि.२५ एप्रिल, २०२५ पर्यंत ई-पिक पाहणी पूर्ण करावयाची आहे. अन्यथा दि. १२ जून २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार ७/१२ उता-यावर ई-पिक पाहणीची नोंद नसलेले सर्व विमा अर्ज रद्द करण्यात येतील व फळपिक विम्याचा लाभ दिला जाणार नाही. तरी ज्या शेतक-यांनी फळपिकांचा विमा घेतलेला आहे त्यांनी ई-पिक पाहणी डिजीटल क्रॉप सर्वे मोबाइल ॲपद्वारे दि.२५ एप्रिल, २०२५ पर्यंत पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

# १० मे रोजी अकोला जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

## वादविवादांची झटपट व शांततेत निकड; जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या कॉमन मिनिमम प्रोग्राम अंतर्गत दि. १० मे २०२५ रोजी अकोला जिल्हा न्यायालय तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

यासंदर्भात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला यांनी प्रसिध्दीपत्रक प्रसिद्ध करत स्थानिक प्रमुख वर्तमानपत्रांतून जनतेपर्यंत ही माहिती पोहोचविण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रीय लोक अदालतीचे अनेक फायदे असून, यामध्ये प्रकरणांचा निर्णय परस्पर संमतीने घेतला जातो. परिणामी पक्षकारांमध्ये द्वेष किंवा कटुता राहत नाही. या निर्णयांवर कोणतेही अपील करता येत नाही, त्यामुळे



एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते.

या अदालतीत साक्षी, पुरावे, उलटतपासणी किंवा दीर्घ युक्तिवाद टाळले जात असल्याने झटपट निकाल लागतो. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे लोक अदालतीच्या निर्णयाची अंमलबजावणी देखील करता येते. यामुळे वेळ, पैसा व कोर्ट फी यांची बचत होते.

लोक अदालतीत निर्णय आपसी समजुतीने घेतला जात असल्यामुळे ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार. यामुळे दोन्ही पक्षांना समाधान मिळते आणि सामाजिक सलोखा टिकून राहतो. प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे असणाऱ्या नागरिकांनी या राष्ट्रीय लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. बी. कचरे व सचिव योगेश सु. पैठणकर यांनी केले आहे.

या संदर्भात संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रकरणाची माहिती तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा आणि आपले वाद शांततेत व कायमचे मिटवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# समृद्धीला जोडणाऱ्या रस्त्यांचा कायापालट!

## अकोला-महान रस्ता रुंदीकरणासह पातूर ते बऱ्हाणपूर मार्गाचे नूतनीकरण; २ हजार कोटींच्या प्रकल्पांना गती

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणाऱ्या महत्वाकांक्षी रस्त्यांच्या विकासाला आता नवसंजीवनी मिळाली आहे. समृद्धी महामार्गाशी थेट जोडणारा अकोला ते महान ( १६१) रस्त्याचा रुंदीकरण प्रकल्प आणि पातूर - बाळापूर - शेगाव तसेच शेगाव - संग्रामपूर - बऱ्हाणपूर ( १६१) या रस्त्यांच्या नूतनीकरण प्रक्रियेला आता अधिकृत सुरुवात झाली आहे. या तिन्ही मार्गांच्या कामांसाठी एकूण सुमारे २



हजार कोटी रुपये खर्च केले जाणार असून, त्यांची निविदा प्रक्रिया सुरू झाल्याने लवकरच प्रत्यक्ष कामालाही गती मिळणार आहे.

या सर्व प्रकल्पांच्या मुळाशी आहेत अकोला दक्षिणचे आमदार वसंतजी खंडेलवाल, ज्यांनी गेल्या काही वर्षांपासून या मार्गांच्या विकासासाठी केंद्र सरकारशी सातत्याने पाठपुरावा केला. केंद्रिय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्रव्यवहार करून हे प्रकल्प मंजुरीच्या टप्प्यापर्यंत नेले. त्यांचा हा ठाम आणि धोरणात्मक दृष्टिकोन अखेर यशस्वी ठरला आहे.

अकोला ते महान हा सुमारे ३१ किमी लांबीचा मार्ग अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. महान येथून अकोल्याला होणाऱ्या जलपुरवठ्याची पाईपलाईन या मार्गालगत असल्यामुळे रुंदीकरणाच्या कामास अडचणी येत होत्या. मात्र, आता त्या पाईपलाईनचे शिफ्टिंग करून दर्जेदार रस्त्याचे काम होणार आहे.या मार्गावर बार्शीटाकळी येथे बायपास आणि उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. सिंधी कॅम्प ते खडकी मार्गे जाणाऱ्या मार्गावर वाहनधारकांना मोठा दिलासा मिळणार असून, सुमारे ४२४ कोटी रुपये खर्च करून हा रस्ता फोर लेन करण्यात येणार आहे. या प्रकल्पांची निविदा प्रक्रिया सुरू झाल्याने लवकरच भूमिपूजन सोहळा पार पडून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. या विकासकामांमुळे अकोला जिल्ह्यातील नागरी आणि ग्रामीण भागांना उच्च दर्जाच्या रस्त्यांची जोड मिळणार असून, वाहतूक कोंडी, अपघातांची शक्यता आणि प्रवासाचा वेळ यात मोठ्या प्रमाणात घट होणार आहे.

### पातूर - शेगाव - बऱ्हाणपूर रस्ता: ग्रामीण भागासही दिलासा

दुसरीकडे, पातूर - बाळापूर - शेगाव ( १६१) हा ५१ किमी लांबीचा रस्ता असून, या प्रकल्पासाठी ६४१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. अकोला - पातूर आणि अकोला - बाळापूर मार्ग आधीच चौपदरी झालेले आहेत, त्यामुळे हा मार्ग देखील उच्च दर्जाचा आणि गतिमान होणार आहे. याशिवाय शेगाव - संग्रामपूर - बऱ्हाणपूर हा ६३ किमी लांबीचा मार्ग देखील मंजूर झाला असून, या मार्गाची निविदा प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. एकूण ३ रस्त्यांच्या कामासाठी २ हजार कोटी रुपयांचा निधी खेचून आणण्यात आमदार खंडेलवाल यांना यश आले आहे.

# पोलीस अधिकाऱ्याने आमदाराच्या कार्यकर्त्याला केली अश्लील शिवीगाळ; निलंबनाची कारवाई

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांच्यावर त्यांच्या सेवेत असताना असभ्य वर्तन आणि गंभीर हलगर्जीपणामुळे कारवाई करण्यात आली आहे. त्यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले असून, यासंदर्भातील अधिकृत आदेश गृहविभागाकडून जारी करण्यात आला आहे.

२० एप्रिल २०२५ रोजी अकोलाकडून पिंजरकडे जाणाऱ्या एम एच १९ झेड-५५३३ क्रमांकाच्या वाहनामध्ये गोवंश वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलीस अंमलदार क्रमांक २६७ यांनी पोलीस अंमलदार संतोष दाभाडे यांना सदर वाहनाची तपासणी करण्याचे आदेश दिले. मात्र, तपासणी दरम्यान गाडीत लष्करी साहित्य असल्याचे सांगून ती गाडी सोडण्यात



आली.

ही माहिती आमदार हरीष पिंपळे यांच्या कानावर गेल्यानंतर त्यांनी पोनि प्रकाश तुनकलवार यांना फोन करून तपास करण्यास सांगितले. यावेळी आमदार पिंपळे यांचे कार्यकर्ते हरीष वाघ यांनी देखील तुनकलवार यांच्याशी संपर्क साधला. मात्र, यावेळी तुनकलवार यांनी अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ केली. मोबाईल कॉलची तांत्रिक रेकॉर्डिंग देखील उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यावरून आरोपांची पुष्टी होते.

सदर प्रकाराबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, मुर्तीजापूर यांच्या अहवालावरून प्राथमिक चौकशी करण्यात आली. चौकशीतून स्पष्ट झाले की, पोनि तुनकलवार यांनी आमदार व त्यांच्या कार्यकर्त्यांसोबत असभ्य वर्तन केले आणि स्टेशन डायरीमध्ये कोणतीही नोंद न करता आपल्या जबाबदारीपासून दूर राहिले. या प्रकारामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्यांना मुंबई पोलीस अधिनियम व पोलीस शिक्षासंबंधी नियमांनुसार तत्काळ निलंबित करण्यात आले आहे.

### निलंबन कालावधीत:

निलंबन आदेशात नमूद केल्याप्रमाणे श्री. तुनकलवार यांचे मुख्यालय पोलीस नियंत्रणकक्ष, अकोला येथे राहणार असून, त्यांना कोणतीही परवानगी न घेता मुख्यालय सोडता येणार नाही. दररोज उपस्थिती लावणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

### शिस्तभंगाविरोधात कठोर पावले उचलली जातील

या प्रकरणामुळे पोलीस खात्यात खळबळ उडाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कडक शिस्तभंग कारवाईचे संकेत दिले आहेत. पोलीस दलाची प्रतिमा जनतेमध्ये सकारात्मक राहावी यासाठी कुणाचाही गैरवर्तन खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.




हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.※ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (※पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५







# जिल्ह्यात बियाणे- खतांच्या विक्री केंद्रांवर कठोर निगराणी ठेवा!

## जिल्हाधिकारी अजित कुंभार: कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीची बैठक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २४ :** जिल्ह्यात खरीप हंगामात कृषी निविष्ठांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याबरोबरच विक्री व्यवहारात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. त्यासाठी दर, साठा आदी सर्व बाबींचे सुस्पष्ट फलक, उन्हाळा लक्षात घेऊन विक्री केंद्रांवर सावली, पेयजल आदी सुविधा असाव्यात. भरारी पथकांनी कठोर निगराणी ठेवावी. शेतकरी बांधवांना कुठल्याही प्रकारचा त्रास होता कामा नये, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी गुरुवारी (ता. २४) येथे दिले.

जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली, त्यावेळी ते बोलत होते. जि. प. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव, कृषी विकास अधिकारी महेंद्र साल्के यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी, कृषी निविष्ठा विक्रेते आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुंभार म्हणाले की, कृषी निविष्ठांची सार्वत्रिक मुबलक उपलब्धता असावी. त्याचप्रमाणे, कुठेही चढ्या दराने विक्री, साठेबाजी होता कामा नये. दुकानांवर निविष्ठांचे दर, उपलब्ध साठा आदी माहितीचे सुस्पष्ट फलक असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, वाढते ऊन पाहता सावलीची व्यवस्था, पेयजल, सीसीटीव्ही आदी सुविधा असाव्यात. शेतकरी बांधवांना कुठल्याही प्रकारचा त्रास होता कामा नये. विक्री केंद्रांनी फलक व इतर सुविधा उपलब्ध ठेवल्या किंवा कसे, याबाबत कृषी सहायकांच्या माध्यमातून तपासणी करून सात दिवसांत अहवाल देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

भरारी पथकांनी सुरुवातीपासूनच सजग राहून कार्यवाही करावी. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किरवे यांनी खरिपासाठी कृषी निविष्ठांचे नियोजन सादर केले. त्यानुसार जिल्ह्यात २०२५ मध्ये खरिपाचे ४ लक्ष ४२ हजार ८०० हे. पेरणी क्षेत्र प्रस्तावित आहे. कापसाचे संभाव्य क्षेत्रफळ १ लक्ष २७ हजार ३०० हे. असून, सुमारे ६ लक्ष ३६ हजार ५०० पाकिटांची मागणी आहे. मूग. उडीद, सोयाबीन, कपाशी अशी सर्व पिके मिळून ७० हजार ४३४ क्विं. बियाण्याची मागणी आहे. सोयाबीनच्या विविध वाणांच्या ९८ हजार ५०० क्विं. बियाण्याचे नियोजन आहे. खतांचे खरीप २०२५ साठी अंदाजे मागणी ९३ हजार १०० मे. टन असून, मंजूर आवंटन ९३ हजार ७९६ मे. टन आहे. जिल्ह्यात सर्वत्र बियाणे, खतांची पुरेशी उपलब्धता ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

### नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई

कपाशीच्या बियाण्यात जिल्ह्यात अजित सीड्स वाणाच्या मागणीनुसार साडेतीन लाख पाकिटांची उपलब्धता ठेवावी. खते, बियाणे विक्रीत इतर उत्पादन लिंकिंग करू नये. एका उत्पादनाबरोबर दुसरे उत्पादन घेण्याची बळजबरी करू नये. नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हाधिका-यांनी दिला.

# जिल्हा परिषदेच्या शिक्षक संवर्गातील १०१ कर्मचाऱ्यांना समुपदेशनने पदोन्नती



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** राज्याचे मुख्यमंत्री यांच्या महत्वाकांक्षी १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत ७ कलमी उद्दिष्टांमधील महत्त्वाचे उद्दिष्ट्य म्हणून जिल्हा परिषद अकोला अंतर्गत गुरुवारी (ता. २४) रोजी पंचायत राज दिनी शिक्षक संवर्ग कर्मचारी यांची पदोन्नती समुपदेशन पद्धतीने केली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचाऱ्यांचा जिव्हाळ्याचा पदोन्नतीचा विषय मार्गी लागला आहे. जिल्हा परिषदेमधील तब्बल १०१शिक्षक कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाली आहे. या कर्मचाऱ्यांना दिलेल्या ठिकाणी रुजू होण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले.

**सीईओ अनिता मेश्राम यांचे आदेश**

यामध्ये , शिक्षण विस्तार अधिकारी १० केंद्रप्रमुख २७ मुख्याध्यापक मराठी (माध्यम) ४५ मुख्याध्यापक उर्दू (माध्यम )१९ अशा एकूण १०१ पदोन्नतीस पात्र शिक्षक सवर्गतील कर्मचाऱ्यांना बढती मिळाल्याने या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, प्रकल्प संचालक मनोज जाधव, जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांच्या देखरेखीत ही पदोन्नती प्रक्रिया पार पडली.

शांततेच्या वातावरणात समुपदेशनाने पदोन्नती प्रक्रिया पार पडल्यामुळे जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या या प्रक्रियेमध्ये सहायक प्रशासन अधिकारी अभिजित बन्नोरे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी तुषार पत्की, अलकनंदा खर्चे, विस्तार अधिकारी विनोद मानकर, वरिष्ठ सहायक किरण पवार, सुजाता तायडे, सुनील गुजर, रामराव राठोड, दिनेश काटे, राजेश जंजाळ, अमोल पुंडकर, सुशील दुतोंडे, मंगेश राऊत यांचे सहकार्य लाभले.

# अंदुरा ॲग्रो प्रोडक्शन कंपनीवर कारवाई

## आ. रणधीर सावरकर यांच्या पाठपुराव्याला यश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** राज्य शासन व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी अन्याय करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचा निर्धार सातत्याने दिसून येतो आहे. याचाच प्रत्यय अकोल्यातील अंदुरा ॲग्रो प्रोडक्शन कंपनी लिमिटेड या संस्थेकडून झालेल्या आर्थिक फसवणूक प्रकरणात दिसून आला आहे.

सन २०२४-२५ या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार रणधीर सावरकर यांनी अंदुरा ॲग्रो प्रोडक्शन कंपनीकडून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची झालेली फसवणूक सभागृहात जोरकसपणे मांडली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शेतकऱ्यांना त्यांचे पैसे परत मिळाले पाहिजेत व या आर्थिक फसवणुकीस कारणीभूत अधिकाऱ्यांवर देखील योग्य ती कारवाई झाली पाहिजे.या प्रकरणात सतत पाठपुरावा करून आमदार सावरकर यांनी शेतकऱ्यांच्या न्यायासाठी संघर्ष सुरू ठेवला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाले असून, शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने सपस-२०२५/प्र.क्र. ६९/२४-स, दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशानुसार अंदुरा ॲग्रो प्रोडक्शन कंपनीला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तसेच, या संस्थेकडून वसूल केलेले कमिशनचे पैसे महाराष्ट्र फेडरेशनकडे जमा करण्यात येणार असून, याच रकमेतून शेतकऱ्यांना त्यांच्या फसवणुकीचे पैसे परत करण्यात येणार आहेत. जर रक्कम अपुरी पडली, तर संस्थेची अनामत रक्कम जप्त करून उर्वरित पैसे शेतकऱ्यांना परत करण्यात येणार आहेत. उरलेली रक्कम ही महसूलप्रमाणे जमिनीच्या थकबाकीप्रमाणे वसूल केली जाणार आहे, असेही शासनाच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांनी आमदार रणधीर सावरकर यांचे आभार मानले आहेत.

## उन्हापासून बचाव करीत आहे वृक्ष...



**अकोल्याच्या तापमानात विक्रमी नोंद होत आहे. सध्या नवतपा सुरू असल्याने प्रचंड उकाड्याने जीवाची काहीली होत आहे. एकीकडे रस्ता रुंदीकरणासाठी बेसुमार वृक्ष कत्तल होत असतानासुद्धा कौलखेड ते बार्शीटाकळी रस्त्यावर दुतर्फा असलेली कडुनिंबाची मोठी झाडे वाहनधारकांचे उन्हापासून संरक्षण करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. (छाया. संजय ताथुरकर)**

# अकोल्याला मिळणार वाहतूक सुरक्षेचा नवा टप्पा!

## एमआयडीसी अप्पू पुतळा आणि निपाणा टी पॉईंट येथे अंडरपासचे शुक्रवारी भूमिपूजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** अकोल्यातील वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत एमआयडीसी समोरील अप्पू पुतळा आणि निपाणा टी पॉईंट येथे अंडरपासचे काम लवकरच सुरू होणार आहे. शुक्रवार, २५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता, या दोन्ही अंडरपास प्रकल्पांचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या प्रकल्पांसाठी आमदार वसंत खंडेलवाल यांनी सतत पाठपुरावा करत केंद्र सरकारकडे मागणी लावून धरली होती. विशेषतः या ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढल्यामुळे ही गरज आणखीनच ठळक झाली होती.

निपाणा टी पॉईंटजवळ अलीकडेच घडलेल्या दुर्दैवी अपघातात एका युवतीचा मृत्यू झाला होता. तसेच एमआयडीसी परिसरातील वाहतूक गर्दी आणि सिग्नल नसल्याने वारंवार अपघात घडत होते. या पार्श्वभूमीवर आमदार खंडेलवाल यांनी केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे या दोन्ही ठिकाणी अंडरपास उभारणीसाठी मागणी केली. त्यांचा हा ठाम पाठपुरावा यशस्वी ठरला आणि दोन्ही प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाली.

या दोन्ही अंडरपासमुळे वाहनधारकांना सुलभ आणि सुरक्षित प्रवासाचा मार्ग उपलब्ध होणार आहे.एमआयडीसी अप्पू पुतळा येथे अंडरपास झाल्यास उद्योग क्षेत्रात ये-जा करणाऱ्या कामगारांना आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळेल.निपाणा टी पॉईंट हा अकोल्याच्या पश्चिम भागातील मुख्य जंक्शन असून येथे अंडरपास झाल्यास शहर व महामार्गाच्या दरम्यानचा वाहतूक प्रवाह अधिक सुरळीत होणार आहे. भूमिपूजनानंतर लगेचच कामाला गती देण्यात येणार असून, याचा लाभ लवकरच अकोलावासीयांना मिळणार आहे. आमदार वसंत खंडेलवाल यांच्या या दूरदृष्टीपूर्ण निर्णयाचे सर्वत्र प्रशंसा आणि स्वागत होत आहे. वाहतूक सुरक्षेच्या दिशेने अकोल्याने टाकलेले हे एक निर्णायक पाऊल ठरणार आहे.

### जनतेच्या सुरक्षेसाठी वचनबद्ध:

या अंडरपास प्रकल्पांचा उद्देश फक्त वाहनचालकांची सोय एवढाच मर्यादित नसून, जनतेच्या सुरक्षेची ग्वाही देणारे पाऊल आहे. यामुळे वाहनांची गती न थांबवता वाहतूक प्रवाह सुरु राहील आणि अडथळे निर्माण होणार नाहीत. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांपासून ते वयोवृद्धांपर्यंत प्रत्येकासाठी ही रचना उपयुक्त ठरणार आहे.

# अकोल्यात हिवताप रुग्ण शून्यावर! तीन वर्षांतली पहिली वेळ

। शरद शेगोकार ।



**जागतिक मलेरिया दिनानिमित्त विशेष**

**अकोला, दि. २४ : अकोला जिल्ह्याने हिवतापावर प्रभावी नियंत्रण मिळवत २०२५ च्या पहिल्या तिमाहीत एकही रुग्ण नोंदवलेला नाही. मागील तीन वर्षांच्या तुलनेत ही आरोग्य व्यवस्थेची मोठी उपलब्धी मानली जात आहे. जागतिक मलेरिया दिनाच्या पार्श्वभूमीवर अकोल्याची ही कामगिरी अन्य जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.**

मलेरिया आपल्यासोबत संपतो: पुन्हा गुंतवणूक करा, पुन्हा कल्पना करा, पुन्हा प्रज्वलित करा, या घोषवाक्याखाली यंदा जागतिक मलेरिया दिन साजरा होत असतानाच अकोला जिल्ह्यातून आरोग्यविषयक सकारात्मक चित्र समोर आले आहे. २०२५ च्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च) अकोला जिल्ह्यात एकही हिवताप रुग्ण आढळलेला नाही, ही गेल्या तीन वर्षांतली पहिली वेळ आहे. ही घसरण आरोग्य यंत्रणेकडून राबवण्यात आलेल्या सातत्यपूर्ण तपासण्या, औषध फवारणी व नागरिकांमध्ये जागरूकतेचा परिणाम मानला जात आहे. डॉ. अतुल बी. शंकरवार जिल्हा हिवताप अधिकारी, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स यांनी संयुक्तपणे काम करत हे यश मिळवले. हिवताप शून्यावर येणे ही मोठी उपलब्धी असली तरी डेंग्यू आणि चिकनगुनिया अजूनही आव्हान ठरत आहे. हिवतापाचा शेवट आपल्याच हातात आहे. सजग रहा, सुरक्षित रहा!

**पुन्हा गुंतवणूक करा, पुन्हा कल्पना करा : पुन्हा प्रज्वलित करा, या घोषवाक्याखाली यंदाचा जागतिक मलेरिया दिन साजरा होत असताना, विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये हिवतापासह चिकनगुनियावर नियंत्रण मिळवण्यात आरोग्य विभागाला मोठे यश मिळाले आहे. अकोला जिल्हा हिवताप कार्यालयाच्या सहायक संचालक डॉ. राधा जोगी यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या तीन वर्षांचा आढावा घेतल्यास संसर्गजन्य रोगांच्या बाबतीत जनजागृती, प्रतिबंधक उपाय व वेळीच केलेल्या उपाययोजनांमुळे सकारात्मक चित्र दिसून येत आहे.**

**२०२३ व २०२४ मध्ये वाढ, पण २०२५ मध्ये झपाट्याने घट**
- २०२३ : शहरी व ग्रामीण मिळून ६ रुग्ण
- २०२४ : ही संख्या वाढून १३ रुग्ण
- २०२५ (-): ० रुग्ण

**डेंग्यू व चिकनगुनिया: मात्र अजूनही चिंता**
- डेंग्यू : - २०२३: २८९ रुग्ण
- २०२४: ६५४ रुग्ण
- २०२५ (जाने-मार्च): १३१ रुग्ण
- **चिकनगुनिया:**
- २०२३: १७७ रुग्ण
- २०२४: ६२९ रुग्ण
- २०२५ (-): ११४ रुग्ण

**इतर जिल्ह्यांचा आढावा हिवतापावर नियंत्रण, पण अजूनही आव्हान**

**वाशिम जिल्हा**
- **हिवताप रुग्ण:** २०२३ ४, २०२४ ८, २०२५ ०
- **डेंग्यू रुग्ण:** २०२५ मध्ये केवळ ६, चिकनगुनिया ११

**अमरावती जिल्हा**
- २०२३ व २०२४ मध्ये ४२ हिवताप रुग्ण, २०२५ मध्ये केवळ ७
- २०२४ मध्ये डेंग्यूमुळे १ मृत्यू

**बुलडाणा जिल्हा**
- हिवताप: २०२३ ३, २०२४ ६, २०२५ ०
- २०२४ मध्ये डेंग्यूचा १ मृत्यू

**यवतमाळ जिल्हा**
- हिवताप घट: २०२३ ९, २०२४ ७, २०२५ १
- चिकनगुनियाचा एकही रुग्ण नाही २०२५ मध्ये

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी**
- पाणी साठवणे टाळा
- अडकवलेले पाणी झाकून ठेवा
- ताप आल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्या
- आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करा

# बेकायदेशीर ताबा असलेल्या ओपन स्पेसच्या कार्यवाहीला ब्रेक

## मालमत्ता विभागाची कार्यवाही पुढे सरकेना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २४ :** वादग्रस्त ५८ ओपन स्पेसप्रकरणी सुनावणी आटोपल्यावर तत्कालिक आयुक्त कविता द्विवेदी यांनी १८ ओपन स्पेस ताब्यात घेण्याचे निर्देश दिले होते. त्यापैकी ११ ओपन स्पेस महापालिकेने ताब्यात घेतले आहे; मात्र या प्रकरणी सुनावणी होऊनही उर्वरित ओपन स्पेस ताब्यात घेण्याची कार्यवाही थांबली आहे. मालमत्ता विभागाने ही फाईल बंद केल्याची माहिती आहे. मनपाच्या मालमत्ता विभागाने संस्थांच्या ताब्यातील खुल्या जागांचे सर्च ऑपरेशन केल्यानंतर ५८ ओपन स्पेसची सूची तयार केली होती. दरम्यान या संदर्भात माहिती गोळा करण्यात आली असता त्यामध्ये झालेला करार, जागेचा वापर, आकारण्यात आलेले भाडे, कालावधी याविषयी पडताळणी करण्यात आली.

प्राप्त झालेल्या माहितीनुसार तत्कालीन नगरपालिका काळात सदर ओपन स्पेस खिरापतीसारखे भाडे पट्ट्यावर वितरित करण्यात आल्याचे समोर आले होते. दरम्यान यासंदर्भात तत्कालीन उपमहापौर वैशाली शेळके यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती; मात्र त्यानंतरही प्रशासनाने या प्रकरणी गांभीर्याने दखल घेतली नाही.

या ओपन स्पेसवर अतिक्रमण व अवैध ताबा असून, काही ओपन स्पेसवर खासगी व्यवसाय व घरे उभारण्यात आली आहेत. यामधील काहींचे करार संपुष्टात आले आहेत. दस्तऐवजाची पडताळणी केली असता हे प्रकार लक्षात आले होते. त्यानंतर या प्रकरणी संस्थांची सुनावणी घेण्यात आली. या ओपन स्पेसवर शाळा, संस्था, लॉन, क्रीडा संस्था यांचा कब्जा असून, यापैकी ११ ओपन स्पेस प्रशासनाने ताब्यात घेतले होते. १८ ओपन स्पेस ताब्यात घेण्याचे निर्देश तत्कालीन आयुक्त कविता द्विवेदी यांनी दिले होते; परंतु या प्रकरणी सुनावणी घेतल्यानंतरही मालमत्ता विभाग कार्यवाही करण्यास टाळाटाळ करीत असल्याची माहिती आहे. ही फाईल आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी हाती घेऊन उचित कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. यामुळे नागरिकांच्या हक्कांच्या जागांवर बेकायदेशीर कब्जा करण्यात आला आहे. या जागा मोकळ्या करून महापालिकेने ताब्यात घ्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, शुक्रवार दि.२५ एप्रिल २०२५ www.ajinkyabharat.com



## थोडक्यात

### गाडीचा कट लागल्याने जातीवाचक शिवीगाळ, गुन्हा दाखल

**बुलडाणा :** गाडीचा कट लागल्याने जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी खामगाव पोलीस स्टेशनमध्ये सुनिल गवई यांनी चेतन पुरोहितच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. खामगाव येथील इंदिरानगरमध्ये वास्तव्यास असलेले सुनिल प्रकाश गवई हे शहारातील एका हॉटेलवर कामाला आहे. सुनिल गवई हे २३ एप्रिल रोजी सकाळी हॉटेल मालकाच्या घरी भाजीपाला घेऊन गेले. परत मोटारसायकलने येत असतांना नटराज गार्डन विहिरीजवळ चेतन पुरोहित समोर आला. गाडीचा कट लागण्याच्या कारणावरून जातीवाचक शिवीगाळ करून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलिसांनी चेतन पुरोहित याचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जम्मूमध्ये अडकणाऱ्या पर्यटकांमध्ये तालुक्यातील १७ जणांचा समावेश

**खामगाव :** जम्मूमध्ये अडकलेल्या पर्यटकांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील ४९ जणांचा समावेश असून यामध्ये खामगाव तालुक्यातील १७जणांचा सहभाग आहे. विशेष म्हणजे हे सर्व सुखरुप असले तरी त्यांना आता घराची आस लागली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने जिल्ह्यातील या सर्व पर्यटकांना सुखरुप आणण्यासाठी तातडीची उपाययोजना सुरु केली आहे. जिल्ह्यातील हे पर्यटक विविध तालुक्यांमधून जम्मूमध्ये दाखल झाले होते. या पर्यटकांमध्ये १७ महिला, ३ लहान मुले आणि १९ पुरुष आहेत. यामध्ये खामगाव तालुक्यातील १७, नांदुरा तालुक्यातील २५, शेगाव तालुक्यातील ३ व जळगाव जामोद तालुक्यातील ४ जणांचा समावेश आहे. हे सर्व जण विविध भागातून मलकापूर येथून हमसफर एक्स्प्रेसने निघाले होते. तेव्हापासून ते जम्मूत विविध स्थळांना भेटी देत होते.

### घाटपूरी येथे प.पू. रामभाऊ महाराज पुण्यतिथी

**खामगाव -** घाटपुरी येथील श्री सद्गुरु श्रीधर महाराज संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे श्री रामभाऊ महाराज चोपडे पुण्यतिथी महोत्सव साजरा झाला. यावर्षी या उत्सवाचे अठरावे वर्ष पार पडले. महोत्सवाची सांगता उत्साहात पार पडली. या उत्सवात शेकडो गाथावाचक पारायणकर्ते यांनी गाथा पारायण करून आपल्या गाथा पारायणच्या उत्सवामध्ये सहकार्य दिले. विविध क्षेत्रातील नामवंत, प्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तने या उत्सवांमध्ये झाली. कार्यक्रमाची सांगता गाथा पारायण व्यासपीठ नेतृत्वात हरिभक्त पारायण प्रभाकर महाराज फारकाळे यांचे काल्याच्या कीर्तनाने पूर्ण झाले. हजारो भाविकांनी किर्तनाचा लाभ घेतला.

### शिवसेना (उबाठा) कर्जमाफीसाठी महायुती सरकारला विचारणार जाब....

# जिल्हाधिकारी कार्यालयावर रणरणत्या उन्हात निघणार ट्रॅक्टर मोर्चा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२४

ईव्हीएम ची कृपा(!) आणि फसव्या योजनांच्या निवडणूक पूर्व आश्वासनांमुळे सत्तेत आलेल्या महायुती सरकारला मायबाप शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विसर पडला आहे. ''सत्ता द्या ,कर्जमाफी करू ''अशी घोषणा केल्यानंतर तीन महिन्यातच या गोष्टीचा विसर महायुती सरकारला पडला आहे. त्यामुळे रणरणत्या उन्हामध्ये शेतकऱ्यांचा आक्रोश व्यक्त करत राज्यातील फडणवीस- शिंदे - अजित दादा सरकारला जाब विचारण्यासाठी शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात येणार आहे. २ मे ला शेतकऱ्यांच्या

### काश्मीर येथील भ्याड हल्ल्याचा केला निषेध




न्याय हक्काच्या मागण्यांसाठी हा मोर्चा बुलढाणा जिल्हा मुख्यालयी निघणार असल्याची माहिती आज शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत देण्यात आली.

बुलढाणा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी भवनात आज ही बैठक दुपारी पार पडली. यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख प्राध्यापक नरेंद्र खेडेकर, आमदार सिद्धार्थ खरात, शिवसेना प्रवक्ता जयश्रीताई शेळके, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, वसंतराव भोजने, सह संपर्क प्रमुख छगन दादा मेहेत्रे, जिल्हा संघटक डी एस लहाने , गोपाल बछिरे, नंदु कऱ्हाडे, अँड सुमित सरदार, संजीवनी वाघ, प्रा आशिष रहाटे, सुनील घाटे, बद्रि बोडखे, तुकाराम काळपांडे, अशोक मामा गव्हाणे, निंबाजी पांडव, किसान धोंडगे, श्रीराम खेलदार, दिपक चांभारे, ईश्वर पांडव, प्रा सिद्धेश्वर आंधळे, अपंग सेलचे गणेश सोनुने यांचेसह शिवसेनेच्या अंगीकृत संघटनांचे उप जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, विधानसभा संघटक, तालुका संघटक, उप तालुका प्रमुख, आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख मान्यवरांनी मार्गदर्शन केले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री म्हणून सत्तेत आल्यानंतर त्यांनी पहिला निर्णय हा शेतकरी कर्जमाफीचा घेत शेतकऱ्यांना कुठल्याही कागदपत्रांची अट न घालता दोन लाखापर्यंत सरसकट कर्जमाफी दिली होती. शेतकरी आणि एकूणच शेती समस्या हा आमच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्याउलट या फडणवीस शिंदे आणि अजित दादा सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. असा सूर या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. सरसकटपणे त्यांनी कर्जमाफी न देण्याचे जाहीर केले आणि मोकळे होऊन गेले. ही बाब म्हणजे शेतकऱ्यांसाठी सर्व जनतेचा विश्वासघात आहे. त्याामुळे या महायुती सरकारला जाब विचारण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रमुख पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिली. दरम्यान पहलगाम कश्मिर येथे पर्यटनासाठी गेलेल्या निष्पाप लोकांवर गोळीबार करण्यात आला. यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. या झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध करत मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप जीवांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली देखील यावेळी वाहण्यात आली.

# कॉलेज ऑफ मेनेजमेंट द्वारा भव्य रोजगार मेळावा संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२४

दर वर्षी प्रमाणे यंदा ही कॉलेज ऑफ मेनेजमेंट द्वारा २३ एप्रिल २०२५ रोजी भव्य रोजगार मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात विविध पदाकरिता भरती करण्यात आली. भरती करिता दहावी पास ते पदवीयुत्तर युवक युवती पात्र झाले.

इंडसइंड बँक संयुक्त भारत फाईनाशियल इन्क्लयुशन लिमिटेड मध्ये विविध पदाकरिता जागा भरण्यात आल्या. या कंपन्यामध्ये रोजगारासाठी अनेक उमेदवार मुलाखतीकरिता आले. मुलाखतीतुन अनेक पदांकरिता उमद्वानांची निवड करण्यात आली. यामध्ये ४० उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. निवड




झालेल्या उमेदवारांची यादी २४ एप्रिल रोजी कॉलेज ऑफ मेनेजमेंट खामगाव येथे प्रकाशित करण्यात येइल व निवडलेल्या उमेद्वाराना कंपनी कडून लवकरच नियुक्ति पत्र देण्यात येणार आहे. यामध्ये वेगवेगळ्या पदांकरिता जास्तीत जास्त वार्षिक पगार ४.५ लाख तर कमीत कमी २.५ पर्यंत देण्यात येणार आहे. इंडसइंड बँक संयुक्त भारत फाईनाशियल इन्क्लयुशन लिमिटेडद्वारा घेण्यात आलेल्या मुलाखतीत कॉलेज ऑफ मेनेजमेंट खामगाव मधील अनेक विद्यार्थ्यांनी देखिल सहभाग नोंदविला. कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत कॉलेजच्या अनेक विद्यार्थ्यांची निवड झाली. या रोजगार मेळाव्यामुळे अनेक होतकरू उमेद्वाराना रोजगार प्राप्त झाला.

कॉलेज ऑफ मेनेजमेंट खामगावच्या वतीने इंडसइंड बँक संयुक्त भारत फाईनाशियल इन्क्लयुशन लिमिटेड कंपनीचे मनपूर्वक आभार मानले. भविष्यात असेच अनेक भव्य रोजगार मेळावे घेउन अनेकानेक होतकरू उमेद्वाराना रोजगार उपलब्ध करून देऊ असे प्रतिपादन कॉलेज ऑफ मेनेजमेंटचे संस्थापक अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहान यांनी केले.

या रोजगार मेळाव्याच्या यशश्वीतेसाठी कॉलेज ऑफ मेनजमेंटच्या उपप्राचार्य प्रा. कोमल मन्नी समवेत कॉलेजचे प्राध्यापक वृंद प्रा. धनश्री चंदन, प्रा. कोमल उन्हाळे, प्रा.सन्नी बोदडे, प्रा. मोनिका अरबट, प्रा. दीपक बघे, प्रा. रुपाली लांडे, प्रा.दानिश, प्रा. अनीस, प्रा. वसीम खान, प्रा. अश्विनी पाटमासे, प्रा. महेश कुर्हे यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय हॅण्डबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाला कांस्यपदक



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२४

लखनौ येथे झालेल्या ४७ व्या ज्युनियर गर्ल्स राष्ट्रीय हँडबॉल अजिक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या मुलींच्य संघाने कांस्यपदक प्राप्त केले.

या स्पर्धेत पहीला सामना महाराष्ट्र विरुध्द गुजरात यांच्यात झाला. या सामन्यात महाराष्ट्राच्या संघाने २१ विरुध्द ४ अशी गुजरातच्या संघावर मात केली. दुसरा सामना महाराष्ट्र विरुध्द पंजाब यांच्यात झाला या चुरशीच्या सामन्यात १९ विरुध्द १५ अशी महाराष्ट्राच्या संघाने पंजाबर विजय संपादन केला. तिसरा सामना महाराष्ट्र विरुध्द आध्रप्रदेश यांच्यात झाला. यात २१ विरुध्द ८ अशा गोलनी महाराष्ट्राचा संघ विजय झाला. त्यानंतर हरीयानाच्या संघाचा २ गोलने पराभव करीत महाराष्ट्राने आपली विजय पताका पुढे फडकवीत ठेवली. शेवटी महाराष्ट्र विरुध्द उत्तर प्रदेश यात महाराष्ट्राचा ४ गोलने पराभूत झाला व आपल्या महाराष्ट्राच्या मुलीच्या संघास कांस्यादक प्राप्त झाले. या संघामध्ये बुलडाणा येथील रेणुका संजय चोपडे, हीने महाराष्ट्र संघाकडून उत्कृष्ठ खेळोचे प्रदेश करुन संघामध्ये महत्वाचा सहभाग नोंदवुन संघाला कांस्यपदक प्राप्त करुन दिले. तिच्या या उत्कृष्ठ खेळाबदल जिल्हयामध्ये सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या या यशाच श्रय ती आई वडील व बुलडाणा मतदार संघाचे आमदार संजय गायकवाड यांना देते. तसेच जिल्हा हॅन्डबॉल संघटनेचे अध्यक्ष अरविंद होंडे व सचिव श्रीपाद इतापे,कुणाल सुर्वे, जयश्री यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संघाच्या यशाबदल हँडबॉल असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष रविंद्र गायकवाड, महासचिव राजाराम राऊत व शिवछत्रपती पुरस्कार विजेते रुपेश मोर यांनी अभिनंदन केले.

# देऊळगाव राजा येथे दहशतवादी हल्ल्याचा निषेध

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
दे.राजा दि.२४

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. या हल्ल्यामध्ये अनेक भारतीय नागरिकांसह काही परदेशी पर्यटकांचाही मृत्यू झाला असून मृतांचा आकडा ३० पर्यंत पोहोचला आहे. या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने स्थानिक तहसील कार्यालय येथे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये काश्मीरमध्ये पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आलेल्या निरपराध लोकांना दहशतवाद्यांनी लक्ष केले. या भ्याड हल्ल्यामध्ये अनेक नागरिकांचा मृत्यू झाला असून मृतांचा आकडा ३० पर्यंत पोहोचला आहे. तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहे. या दहशतवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देश हादरला असून संपूर्ण देशात संतापाचे वातावरण आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यकर्त्यांनी स्थानिक तहसील कार्यालय येथे एकत्रित येऊन या भ्याड हल्ल्याचा निषेध केला. यावेळी कार्यकर्त्यांनी पाकिस्तान विरोधात नारेबाजी करत सदर घटनेचा तीव्र निषेध केला.दरम्यान तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारने या हल्लेखोरांचा असा बंदोबस्त करावा की या हल्लेखोरांच्या पुढच्या दहा पिढ्यात त्याा आठवणीने सुद्धा थरकाप आला पाहिजे. आशा संतप्त भावना निवेदनाद्वारे निषेधकर्त्यांनी व्यक्त केल्या.

यावेळी बाजार समितीचे सभापती समाधान शिंगणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे, खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष परमेश्वर शिंदे, माजी जि.प. उपाध्यक्ष गंगाधर जाधव, शहराध्यक्ष विजय खांडेभराड, माजी सभापती हरी शेटे, रंगनाथ कोल्हे,माजी नगराध्यक्ष गोविंद झोरे, महेश देशमुख, माजी सभापती गजानन पवार, गणेश बुरकुल, शिवसेनचे वसंत आप्पा खुळे, पवन झोरे, गणेश सवडे, विलास खराट, युवक शहराध्यक्ष अभिनव खांडेभराड, मंगल अंभोरे, दत्ता टकले, रमेश नरोडे, गजानन तेजनकर, दिनकर देशमुख, नामदेव मुंडे, बबन कवळे, राम कापसे आदी उपस्थित होते.

# मराठा पाटील युवक समिती कार्यकारिणी गठित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
शेगाव दि.२४

काल स्थानिक विश्रामगृह शेगांव येथे मराठा पाटील युवक समिती ची बैठक संपन्न झाली , मराठा पाटील युवक समिती गेल्या पंधरा वर्षापासून सामाजिक काम करत आली आहे.

समितीचे माध्यमातून रक्तपुरवठा , मोफत ॲम्ब्युलन्स सेवा , वधुवर सोयरिक पुस्तिका, वधुवर परिचय मेळावा,यासह तरुणान मार्गदर्शन शिबिर ,रोजगार, नोकरी साठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत करून समाजातील युवकांना योग्य मार्गाने पुढे नेण्यासाठी काम करते, मराठा पाटील युवक समितीचे या बैठकीला संस्थापक अध्यक्ष गजानन ढगे जिल्हा अध्यक्ष सुनील कुईटे जिल्हा सचिव प्रा योगेश म्हैसागर जिल्हा उपाध्यक्ष सतीश लांजुळकर ,श्याम आढाव, जिल्हा



प्रवक्ता विठ्ठल पाटील अवताडे, खामगाव तालुका अध्यक्ष राम पारसकर नांदुरा तालुका अध्यक्ष प्रफुल बिचारे, यांच्या उपस्थिती मध्ये शेगांव तालुका कार्यकारणी गठित करण्यात आली.

यावेळी ऋषिकेश हिंगणे यांची शेगांव तालुका अध्यक्ष महेश पहूरकार उपाध्यक्ष अविनाश कोकाटे उपाध्यक्ष दत्ता खोंड सचिव अविनाश शेजोळे सहसचिव प्रतिक मिरगे कार्याध्यक्ष प्रतिक ढगे प्रसिद्धी प्रमुखआयुष पहूरकार सह प्रसिद्धी प्रमुख राहुल पाटील तालुका संघटकसरपंच अमोल भाऊ गोळे पाटील तालुका संघटक यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

यावेळी तरुणांनी आधी आपले काम व्यवसाय नोकरीला प्राधान्य देऊन सक्षम व्हावे आणि आपण ज्या समाजात जन्माला आलोय त्याचे काही देणे लागते या भावनेतून आपला वेळ हा सामाजिक कार्याला लावून समाजाच्या प्रगतीसाठी काम केले पाहिजे. तसेच आता वाढत्याा बेरोजगारी मुळे मिळेल त्या छोट्या मोठ्या व्यवसायात समाज बांधवांनी जाऊन स्वतःची सुरुवात करून आज सक्षम कसे होता येईल याचा विचार केला पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सक्रिय असलो पाहिजे असे मत गजानन ढगे यांनी व्यक्त केले.

# दोन घराला भीषण आग ; धान्य जळून खाक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.२४

तालुक्यातील डोणगाव पासून जवळ असलेल्या बेलगाव मध्ये रोजगार सेवक यांच्या राहत्याा घराला दि. २१ एप्रिल ला रात्री साधारण १ च्या सुमारास आग लागली आग ऐवढी भयानक होती कि घराला अग्नीने भयानक तांडव निर्माण केली होती गावातील मुस्लिम समाजातील नागरिक शेख सैयदा भाई हे बाहेरगावाहून गावात आले असता त्यांना आग दिसली असता त्यांनी आरडाओरडा केला सुदैवाने उन्हाळा असल्याने सामान्य कुटुंब हे रस्त्यावर झाडाखाली झोपलेली होती. त्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही.

गावामध्ये दोन-तीन विहिरी असून महाजल विहीर नुसती नावाला उभी आहे तर दुसरीकडे जल मिशन यांचे काम अपुरे असल्याने विहिरीमध्ये एकही थेंब पाणी नसल्याने आग विझवण्यासाठी गावातील



नागरिक रात्री धावपळ सुरू करत होती मात्र बेलगाव येथील मारुती बोरकर यांनी टँकर मध्ये भरलेल्या पाणी आणून एक मदतीचा हात दिला आणि आग आटोक्यात आणली बेलगाव ग्रामपंचायत मध्ये निवृत्ती इंगळे वय साधारण ६० ते ६५ वर्षे हे रोजगार सेवक म्हणून काम पाहता त्याचा नातू अक्षयच्या काही कागदपत्रे आणि रोजगार हमी ची केलेली कामे व त्यांची कागदपत्रे घरामध्ये राख झाली घरामध्ये रोजगार सेवक यांचा मोबाईल तसेच धान्य व काही पैसे जळून खाक झाले आता ते उघड्यावर आहे.

या घटनेची माहिती कळताच गावातील पोलीस पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष यांनी पाहणी करून तंटामुक्ती अध्यक्ष यांनी रोजगार सेवक निवृत्ती इंगळे यांना थोडी फारपैशाची मदत केली बेलगाव येथील रोजगार सेवक निवृत्ती इंगळे यांच्या राहत्याा घराला अचानक रात्री आग लागली या आधीच संपूर्ण घर आणि संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले या आगीत त्यांच्या मुलीचेही घर शेजारी असल्याने ते जळून खाक झाले. त्या घरामध्ये लागणारे सर्व धान्य गहू जवारी डाळ व काही रोख रक्कम कानातील मशीन तसेच मोबाईल तेल भांडी किराणा इत्यादी वस्तू जळून पूर्णपणे खाक झाले आहे. सुदैवाने या आगीत कोणत्याही जीवित आणि झालेली नाही मात्र सदर कुटुंब पूर्णपणे उघड्यावर आले आहे. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही तरी याबाबत पंचा समक्ष महसूल कर्मचारी अरुण आलोने पंचनामा करण्यात आला असून पुढील मदतीसाठी आहवाल संबंधित विभागाला सादर केला जाणार आहे. संकटग्रस्त कुटुंब उघड्यावर आले असून संसाराची राख रांगोळी झाली आहे. त्यामुळे या कुटुंबाला शासनाने तात्काळ मदत देण्याची मागणी गावातील नागरिक करीत आहे तसेच मेहकर येथील स्थानिक आमदार सिद्धार्थ खरात यांनी ही फोन करून रोजगार सेवक यांना शासनापर्यंत त्याांच्या घराची माहिती देऊन त्यांना मदत देण्याची आश्वासन दिले आहे. .

# जिल्ह्यात १११ हज यात्रेकरूंनी केले लसीकरण

## डॉ.भुसारी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२४

हज यात्रेला जाणाऱ्या हार्जीना लसीकरण करण्यासाठी शिबिर कॅम्प उभारण्यात आले होते. २३ एप्रिल रोजी या आयोजित शिबिरात पोलिओ, फ्लूपासून संरक्षण करण्यासाठी मेनिंजायटीस, इन्फ्लूएंझासाठी अनिवार्य लसीकरण दिले गेले.

यात १११ हज यात्रिकरांनी घेतले लाभ यावर्षी जिल्ह्यातील २५० नागरिक हज यात्रेसाठी जात आहेत. त्यांची यादी तयार करण्यात आली असुन त्याा मधून आज २३ एप्रिल रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे सकाळी ९ ते १२ वाजे दरम्यान लसीकरण करण्यात आले आहे.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी हज यात्रेसाठी जाणाऱ्या नागरिकांना आवाहन करीत सांगितले की, आपल्या सुरक्षतेसाठी सर्व हज यात्रेकरूंना तिन्ही लसी घेणे बंधनकारक आहे. सोबतच लसीकरण केल्याशिवाय २०२५ च्या हज यात्रेला जाणाऱ्यांना अडचण निर्माण होणार नाही हे लक्षात घेऊन प्रत्येक यात्रेकरूंनी मेनिंजायटीस, पोलिओ हे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन डॉ. भागवत भुसारी यांनी केले आहे.

तसेच हज यात्रेकरूंनी चांगला लाभ दिला आहे. या शिबिर मध्ये जे बाकी आहे त्यांनी खामगाव आणि शेगाव इथे लसीकरण करावे असे आवाहन



करण्यात आले आहे. तसेच आरोग्य, प्रशिक्षण कार्ड/डायरी घेणे अनिवार्य आहे. यावेळी हज कमिटी बुलडाण्याचे वतीने लसीकरण स्थळी हे सर्व उपक्रम राबविले गेले. तर सामान्य रुग्णालय खामगांव येथे २६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १२ वाजेपर्यत लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### शेतातील गोठ्याला आग : मोठे नुकसान

**वाशिम :** तालुक्यातील वांगी येथील शेतकरी भागवत भोयर यांच्या शेतातील गोठ्याला अचानक लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले आहे. या आगीत शेती उपयोगी साहित्य, गुरांसाठी ठेवलेला कुटार आणि इतर साहित्य जळून खाक झाले. या घटनेत शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांच्या रोजच्या शेती कामांसाठी लागणारी साधनसामग्री पूर्णपणे नष्ट झाली आहे. आगीचे नेमके कारण स्पष्ट झालेले नसून, प्रशासनाकडून तत्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी वर्गातून होत आहे.

### दोन दिवसांपासून बेपत्ता ज्ञानेश्वरचा मृतदेह विहिरीत आढळला!

**रिसोड :** रिसोड तालुक्यातील वनोजा येथील १४ वर्षीय ज्ञानेश्वर राजू कांबळे याचा मृतदेह २३ एप्रिल रोजी सकाळी वनोजा शिवारातील एका शेतातील विहिरीत तरंगताना आढळून आला. ही धक्कादायक घटना समोर येताच परिसरात खळबळ उडाली. २१ एप्रिल रोजी ज्ञानेश्वर बेपत्ता झाला होता. त्याची आई लक्ष्मी कांबळे यांनी रिसोड पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाची तक्रार दाखल केली होती. ज्ञानेश्वरने मित्रासोबत पोहायला जाण्याची इच्छा व्यक्त केली होती; मात्र आईने त्यास विरोध केला होता. त्यानंतर तो घरातून निघून गेला आणि परत आला नाही. शोधाशोध केल्यानंतर २३ एप्रिल रोजी त्याचा मृतदेह विहिरीत आढळून आला. माहिती मिळताच रिसोड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. ज्ञानेश्वरचे अचानक गायब होणे, अपहरणाची तक्रार आणि मृतदेह सापडण्याची घडलेली घडामोड यामुळे गावात विविध चर्चांना उधाण आले आहे.

### 'तेलबियां'साठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**वाशिम :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबियांतर्गत मूल्य साखळी भागीदार निवड प्रक्रियेसाठी पात्र शेतकरी उत्पादक कंपनी , सहकारी संस्था यांनी प्रस्ताव सादर करावे. असे आवाहन करण्यात आले आहे.
महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया अंतर्गत मूल्य साखळी भागीदार निवड प्रक्रिया पारदर्शकता, गुणवत्ता व शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करून राबविण्यात येत आहे. योजनेचे मुख्य उद्दिष्ट तेलबिया पिकांच्या उत्पादनात वाढ करून खाद्यतेल आयात कमी करणे आहे.
शेतकऱ्यांना तांत्रिक सहाय्य प्रदान करून मूल्य साखळी मजबूत करणे, शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्थांना प्राधान्य देऊन आधुनिक शेती पद्धती व तंत्रज्ञान अंमलबजावणी करणे, निवड प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक : पात्रता निकष : मूल्य साखळी भागीदार निवडण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या सहकारी संस्थांकडे किमान ३ वर्षांचा अनुभव असावा आणि मागील ३ वर्षांतील सरासरी वार्षिक उलाढाल किमान ९ लाख रुपये असावी. संबंधित तालुक्यांमध्ये निवड करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्थांचे प्रस्ताव त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

### शहरातील कचरा डेपो इतरत्र हलवा: शिवसेनेची मागणी



**वाशिम :** शहरातील हिंगोली नाका परिसरातील कचरा डेपोनजीक नागरी वसाहत आहे. दरम्यान, या डम्पिग ग्राउंडमध्ये जमा होणाऱ्या कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. या उलट दर आठ दिवसाआड येथील कचरा जाळण्यात येतो. त्यामुळे उठणारा धूर व कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे सदर कचरा डेपो निर्जनस्थळी हलविण्याची मागणी २४ रोजी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. या संदर्भात शिवसेना शहरप्रमुख डॉ. विशाल सोमटकर यांच्या नेतृत्वात देण्यात आलेल्या निवेदनात नमूद आहे की, शहरातील ओला व सुका कचरा वाहनांव्दारे संकलीत करून कचरा डेपोत टाकण्यात येतो. ओला व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे नगरपालिका प्रशासनाने सांगितले असले तरी या कचऱ्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया केल्या जात नाही. तर जमा झालेला कचरा चक्क पेटवून देण्यात येतो. या ठिकाणी पूर्वी लोकवसाहत नसल्याने कचरा डेपोचा कुणालाही त्रास नव्हता; परंतु शहराचा विस्तार झपाट्याने होत असल्याने आजघडीला डम्पिंग ग्राउंड परिसरात मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती उभ्या झाल्या. कचरा डेपोत संकलीत केल्या जाणाऱ्या कचऱ्याची दुर्गंधी व जाळल्यानंतर धुरामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे हा कचरा डेपो शहराबाहेर निर्जनस्थळी हलविण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी शहरप्रमुख डॉ. विशाल सोमटकर, श्याम खरात, अनिल भडके, अब्दुल आकीब, कैलास थोरात, सुमित गोटे, राजू सहातोंडे, मदन भडके, संदीप कांबळे, संतोष श्रीमंत,अंबादास कांबळे, सै. अभीब,संतोष राजगुरु, गोपाल चव्हाण आदि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २४ :** जिल्ह्यातील वाढत्या पाणीटंचाईच्या समस्येचा तातडीने सामना करण्यासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी संबंधित विभागांना काटेकोर उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, वैशाली देवकर, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.
जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी सांगितले की, गावागावांतील टंचाईग्रस्त भागांची तातडीने यादी तयार करा आणि त्याठिकाणी नियमितपणे टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुनिश्चित करा. कोणत्याही गावात पाणीटंचाईमुळे नागरिकांना त्रास होऊ नये, याची काळजी घ्या. तसेच, त्यांनी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देताना सांगितले की, जलसंधारणाच्या विविध योजना - जसे की बंधारे, जलशुद्धीकरण प्रकल्प, शेततळ्यांची निर्मिती, पाणलोट क्षेत्र विकास - यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करा. त्यामुळे भविष्यातील पाण्याची गरज भागवता येईल.
पाण्याच्या वापराबाबत जनजागृतीची गरज अधोरेखित करत त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, पाण्याचा अपव्यय टाळा, वर्षा पाणीसंचयास प्राधान्य द्या आणि जलसंवर्धनासाठी सामूहिक प्रयत्न करा. या बैठकीत प्रत्येक तालुक्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, उपाययोजना व आवश्यक गरजा यावर सविस्तर चर्चा झाली. प्रशासनाने ठोस कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी त्वरित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्यांची चाळणी; प्रशासनाचे दुर्लक्ष

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. २४ :** तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्याची पूर्णपणे चाळणी झाल्याने वाहनचालकांना खड्डे वाचवून रस्त्याने मार्गक्रमण करताना किरकोळ अपघाताच्या घटना घडत आहे, त्यामुळे प्रशासनाने तालुक्याला जोडणाऱ्या ग्रामीण भागातील रस्त्याकडे लक्ष देऊन रस्त्याची डागडुजी करावी व रस्त्यावरील खड्डे तातडीने भरावे, अशी मागणी ग्रामीण भागातील वाहनधारकांमधून होत आहे.
तालुक्यातून दररोज शेतकरी, शेतमजूर, नोकरदार, विद्यार्थी तालुका ठिकाणी दैनंदिन कामासाठी मानोरा येथे येतात, तसेच तालुका ठिकाणावरून अनेक नोकरदार, शेती तसेच विविध कामांसाठी ग्रामीण भागात येऊन ये-जा करतात. अनेक गावातील रस्त्याची दुरवस्था असल्याने सर्वसामान्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या रोजच्या त्रास व असुरक्षित प्रवासामुळे प्रवासी त्रस्त झाले आहेत. एकीकडे केंद्र सरकार हायवे निर्माण करण्याकडे लक्ष देत आहे. तर राज्य सरकार रिंग रोड आणि राज्य महामार्ग करण्याकडे लक्ष देत आहे; मात्र ग्रामीण भागातील रस्त्यांकडे केंद्र व राज्यातील सरकारने पाठ फिरवली आहे. त्यामुळे तालुक्याला जोडणाऱ्या गावांच्या रस्त्यांची परिस्थिती विदारक झाली आहे. याकडे शासन व प्रशासनाने लक्ष केंद्रित करण्याची मागणी ग्रामीण भागातील नागरिकांमधून होत आहे.

## गुंतवणूक परिषदेत १६३६ कोटींचे सामंजस्य करार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २४ :** जिल्हा उद्योग केंद्र आणि जिल्हा प्रशासनाच्या विद्यमाने नुकतीच जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद पार पडली. या परिषदेत एकूण १६३६ कोटी रुपयांचे सामंजस्य करार (एम ओयू) करण्यात आले. या करारांमुळे जिल्ह्यात अंदाजे ८४८ नवीन रोजगार संधी निर्माण होणार आहेत.
ही परिषद निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे आणि उद्योग सहसंचालक नीलेश निकम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. परिषदेत विविध उद्योजक, व्यावसायिक आणि शासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यातील गुंतवणूक वाढविणे आणि औद्योगिक विकासाला चालना देणे हा परिषदेमागील प्रमुख उद्देश होता. यावेळी बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी घुगे म्हणाले की, सामंजस्य करार जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. या गुंतवणुकीमुळे केवळ रोजगार संधी निर्माण होणार नाहीत, तर जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेलाही भक्कम बळकटी मिळेल. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक आकाश बांगर यांनी सांगितले की, या गुंतवणुकीमध्ये अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी यांसह विविध लहान-मोठ्या क्षेत्रांतील उद्योगांचा समावेश आहे. परिषदेदरम्यान उद्योजकांनी जिल्ह्यातील गुंतवणूक संधी, शासनाच्या विविध योजनांविषयी माहिती घेतली. त्यांनी आपल्या समस्या व अपेक्षाही मांडल्या, ज्यांना प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला.एकूणच, ही गुंतवणूक परिषद वाशिम जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी एक आशादायक टप्पा ठरली आहे. येत्या काळात ही गुंतवणूक रोजगार निर्मितीच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## पहलगाम हल्ला: वाशिम शहरातील कुटुंबीय सुखरूप

### 'देव तारी त्याला कोण मारी'

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २४ :** 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीचा पुन्हा एक वेळा प्रत्यय आला. वाशिम शहरातील ॲड. महेश महामुने, विधी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, प्रा. संजय ताजने आणि राजू जितकर हे त्यांच्या कुटुंबियांसोबत काश्मीर पर्यटनाला गेले होते. यात दोन मोठ्या संकटातून ते सुखरूप बचावले.
निसर्गाचा प्रकोप असो वा दहशतवादी हल्ला. या दोन्ही परिस्थितीतून सहीसलामत परत येणे हा केवळ योगायोग नाही. मुसळधार पावसामुळे श्रीनगर-जम्मू मार्गावर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत अनेक निष्पाप लोकांचा जीव गेला, त्यावेळी याच मार्गावरून हे तीन कुटुंब प्रवास करीत असूनही कोणतीही बाधा न येता सुखरूप निघणे, हे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. त्यानंतर लगेचच पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या वेळी ते काश्मीरमधून परत येत होते आणि सुरक्षितपणे वाशिमला पोहोचले, हे त्यांचे भाग्यच म्हणावे लागेल. महेश , प्रा. संजय ताजने आणि राजू जितकर आणि कुटुंबातील सदस्य खरंच खूप भाग्यवान आहेत! दोन्ही संकटे येण्यापूर्वीच संकटाला चकमा देण्यात हे लोक यशस्वी ठरले. त्यांच्या सुखरूप आगमनाने त्यांच्या मित्रमंडळींना आणि कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला, यात शंका नाही. प्रा. संजय ताजने यांची आई अजूनही श्रीनगरमध्ये सुरक्षित आहे. त्यासुद्धा सुरक्षित वाशिमला पोहोचतील, यात शंका नाही. आता सर्व जण आपल्या घरी, वाशिममध्ये सुरक्षित आहेत.

## टेरका-भोयणी शिवारातील 'त्या' रस्त्याचे काम थांबवा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. २४ :** तालुक्यातील मौजा टेरका व भोयणी येथे विना परवानगी शेतकऱ्यांच्या शेतातून सुरू असलेले शिव रस्त्याचे काम थांबवून न्याय द्यावा, असे निवेदन तहसीलदार यांना शेतकरी परमेश्वर राऊत यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी दिले आहे.
निवेदनात नमूद केले आहे की, मौजा टेरका व भोयणी शिवारात उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या पत्रानुसार शिवरस्ता मोजणीसाठी १५ एप्रिल रोजी मंडळ अधिकारी काटकर, तलाठी महाजन, दोन पोलीस कर्मचारी व जेसीबी मशीन घेऊन शेतशिवारात आले. प्राप्त नोटीसनुसार हद्द व खुणा कायम न करता थेट ३३ फुटाचा शिवरस्ता सुरुवात करून शेतातील १०० वर्षांचे जुने अनेक झाडे पाडून टाकले. याबाबत शेतकऱ्यांनी शिव रस्ता कामाच्या आदेशाबाबत त्यांना विचारणा केली असता, महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना दमदाटी करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी कार्यवाही करण्याबाबत धमकावले. शिवरस्त्याची मागणी करणारा व्यक्ती राजू सदार हा व्यक्ती दगड, गिट्टी या गौण खनिजाचा व्यापारी असून, गिट्टी खदान व क्रेशर त्याच्या शेतात टाकण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांना हाताशी पकडून देवाण-घेवाण करून विना परवानगी शिवरस्त्याचे कामासाठी उठाठेव करीत आहेत. जर शासकीय नियमानुसार शेतकऱ्यांच्या वैयक्तीक शेतजमिनीमधून ३३ फुटाचा शिव रस्ता करणे अनिवार्य असेल तर रस्त्याच्या कामाला लागणाऱ्या जमिनीचे क्षेत्राचे भूसंपादन करून शेतजमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना द्यावा व त्यानंतर आदेश पारीत करून सर्व शेतकऱ्यांच्या सहमतीने शिव रस्ता तयार करावा. सद्यस्थितीत सुरू असलेले विना परवानगी रस्त्याचे काम बंद करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, असे निवेदन दिले आहे. निवेदनावर लोनेस राऊत, रंगराव राऊत, उद्धव पाटील आदींसह इतर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी कारंजा यांना पाठविल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

## पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ आंदोलन




दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २४ :** जम्मू आणि कश्मीर या राज्यातील पहेलगाम येथे दहशतवाद्यांकडून हिंदू पर्यटकांवर गोळीबार करून हल्ला करण्यात आला. यात सुमारे २७ पर्यटकांचा मृत्यू झाला, या दहशतवादी घटनेच्या निषेधार्थ वाशिम येथे आमदार श्याम खोडे यांच्या नेतृत्वात व राजू पाटील राजे यांच्या मार्गदर्शनात शेकडो कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.
यावेळी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शिवसेना, दुर्गा वाहिनी, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, धर्मरक्षक ग्रुप, बागेश्वर धाम सेवा समिती, सकल हिंदू समाजातील कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी आंदोलन करून या घटनेचा तीव्र निषेध केला. दहशतवाद्यांनी पर्यटकांना आपला धर्म विचारून त्यांची हत्या केली, हा दहशतवादी हल्ला हिंदू धर्माच्या विरोधात केलेला हमला आहे, या घटनेचा निषेध करावा तेवढा कमी आहे, या दहशतवादी घटनेचा विरोध करताना हिंदूंच्या सुरक्षेसाठी सरकारने ठोस पावले उचलावी, अशी जोरदार मागणी कार्यकर्त्यांच्यावतीने करण्यात आली. यावेळी या हल्ल्यात शहीद झालेल्या हिंदू बांधवांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या घटनेच्या जाहीर निषेधानंतर माननीय जिल्हाधिकारी बुवनेश्वर एस यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी हिंदुत्ववादी कार्यकर्ते शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.
आगामी काळात अशा दहशतवादी घटना देशभरात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, यासंबंधी सतर्कता बाळगून हिंदू समाजाने व सरकारनेही सतर्क राहण्याची आवश्यकता आहे.

## कर्मचाऱ्यांना कुटुंब समजणारा नेतृत्वशील अधिकारी डॉ. ठोंबरे





**आरोग्य विभागासारख्या तणावपूर्ण व्यवस्थेमध्ये, कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून, एक संघभावना आणि कुटुंबवत सुसंवाद राखणे हा डॉ. ठोंबरे यांचा खरा कौशल्यगुण आहे. 'नेतृत्व म्हणजे फक्त आदेश देणे नाही, तर समोरच्याच्या सुख-दुःखात सहभागी होणे. डॉ. पी. एस. ठोंबरे हे त्याचं सजीव उदाहरण आहेत.**

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २४ :** जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे यांनी अल्पावधीतच त्यांच्या कार्यशैलीने सर्वसामान्य कर्मचाऱ्यांपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या मनात एक खास स्थान निर्माण केले आहे. अनेक अधिकारी काम करतात, आदेश देतात; पण डॉ. ठोंबरे यांच्या कार्यपद्धतीत एक वेगळेपण आहे. ते केवळ काम करून घेत नाहीत, तर कर्मचाऱ्यांमध्ये काम करण्याची उमेद आणि आत्मविश्वास निर्माण करतात.
डॉ. ठोंबरे हे केवळ एक प्रशासकीय अधिकारी नाहीत, तर एक संवेदनशील माणूसही आहेत. आपल्या प्रत्येक कर्मचाऱ्यांचे दुःख हे आपले वैयक्तिक दुःख समजून ते मदतीसाठी तत्पर असतात. कोणत्याही कर्मचाऱ्याच्या अडचणीत ते स्वतःहून धावून जातात. त्यांनी अनेक वेळा वैयक्तिक उपस्थितीतून किंवा तत्काळ उपाययोजना करून कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या समस्या सोडविल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागात एक सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. कर्मचारी आता दबावाखाली नाही, तर आत्मियतेने आणि प्रेरणादायी वातावरणात काम करीत आहेत. अनेकांनी असे सांगितले आहे की, 'डॉ. ठोंबरे यांच्यासारखा अधिकारी आमच्या आयुष्यात प्रथमच भेटला आहे.' डॉ. ठोंबरे यांचं प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, ते फक्त कामावर भर देत नाहीत, तर माणसांना जोडतात. त्यांच्या नेतृत्वात कार्यरत आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि जिल्हा रुग्णालय यामध्ये कार्यक्षमता वाढली असून, सेवा देण्याची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारली आहे.

### पहलगाम हल्ल्याचा बार असोसिएशनकडून निषेध

**मानोरा :** जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकधार्जिन्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यामध्ये असंख्य निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला, तसेच या घटनेमुळे देशभरात मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. पाक धार्जिन्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ २४ एप्रिल रोजी वकील बार असोशिएशन संघटनेच्यावतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केले आहे की, जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात भारतीय नागरिकांची झालेली हत्या या क्रूर घटनेचा निषेध नोंदवून भारत सरकारने झालेल्या घटनेचा बदला घेऊन अतिरेकी ,दहशतवादींना कठोर शिक्षा करावी. निवेदन देतेवेळी विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. जी. आर. राठोड, उपाध्यक्ष ॲड. एस. एन. पखाले, सचिव ॲड. इंगोले, सहसचिव ॲड. अग्रवाल, सदस्य ॲड.आर. डी. ठाकरे, ॲड. एन. पी. चौधरी, ॲड. रेखाते, ॲड. चव्हाण, ॲड. पटेल, ॲड. मनवर, ॲड. पाटील, ॲड. कांबळे आदी उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपला जिल्हा
अकोला, शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५


## थोडक्यात

### अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई



**वाडेगाव** : पातूर तालुक्यातील नायब तहसीलदारांना रेतीमाफियांनी कारवाई कराल तर जिवंत जाळु, अशी धमकी देण्यात आल्याची घटना ताजी असतानाच बुधवारी सकाळी बाळापूर उपविभागीय अधिकारी यांच्या अवैध गौण खनिज पथकाने बाळापूर तालुक्यातील हाता येथे अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई केल्याने रेतीमाफीयांचे धाबे दणाणले आहेत. बाळापूर तालुक्यात गौण खनिज उत्खनन करून वाहतूक सुरू असल्याचा गोरखधंदा राजरोसपणे सुरू असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. बुधवारी सकाळी ८.४५ वाजताच्या दरम्यान उपविभागीय अधिकारी बाळापूर यांचे अवैध गौण खनिज पथक गस्तीवर असताना हाता येथे एम एच ३० बी डी २००० क्रमाकांचे टिप्पर हे एक ब्रास रेती वाहतूक करताना मिळून आले. यावेळी टिप्पर मालक शारुख फकिरा देशमुख रा.लोहारा यांना रॉयल्टी ( परवाना ) बाबत विचारणा केली असता, त्यांच्याकडे कोणतीही रॉयल्टी नसल्याचे दिसून आले, त्यामुळे सदर रेतीचे टिप्पर उरळ पोलीस स्टेशनला लावण्यात आले असून, या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. सदर कारवाई उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार बाळापूर यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाल गिरीधर घोगरे, योगेश सरप, महसूल सेवक देवानंद अवचार, शिपाई संजय लांजुडकर, अमोल पवार यांनी केली आहे. दरम्यान, या कारवाईमुळे रेतीमाफीयांचे धाबे दणाणले आहे.

### दहशत माजविणारा युवक पोलिसांच्या जाळ्यात!

**अकोला** : हातात लोखंडी स्टील तलवार घेऊन आरडाओरडा करीत परिसरात दहशत माजविणाऱ्या एका २४ वर्षीय युवकाला सिव्हिल लाइन पोलीस ठाण्याच्या पथकाने तत्काळ कारवाई करीत अटक केली. ही घटना मंगळवारी (२३ एप्रिल) संध्याकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कृषी नगर, पोद्दार शाळेजवळ घडली. पोलिसांना मिळालेल्या खात्रीलायक गुप्त माहितीनंतर किशोर काशिनाथ सोनोने यांच्या फिर्यादीवरून, आरोपी आकाश ऊर्फ करण विनोद थुंकेकर (२४), धंदा मजुरी, राहणार लेबर कॉलनी, पोद्दार शाळेजवळ याच्यावर कलम ४, २५ शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडारे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने घटनास्थळी दोन पंचांसह जाऊन पाहणी केली असता, आरोपी हा हातात स्टीलची मूठ असलेली लोखंडी तलवार घेऊन आरडाओरडा करीत होता व दहशत निर्माण करीत असल्याचे दिसून आले. त्याला शिताफिने ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून मुद्देमाल म्हणून लोखंडी तलवार जप्त करण्यात आली आहे. पोलिसांनी वेळेवर दाखविलेल्या सतर्कतेमुळे परिसरात कुठलीही मोठी दुर्घटना घडण्यापासून टळली. पुढील तपास सुरू असून, आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

### कॅन्सरला कंटाळून इसमाची रेल्वेखाली आत्महत्या!



**अकोला** : कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजाराला कंटाळून अकोल्यातील गोविंद नगर परिसरातील रहिवासी गजानन महादेवराव माहोकार (४३) यांनी रेल्वे रुळावर आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी (२४ एप्रिल) सकाळी घडली. याबाबत सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात मर्ग क्रमांक २४/२०२५ अंतर्गत नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत गजानन माहोकार हे काही काळापासून कॅन्सरने त्रस्त होते. त्यांनी संताजी नगरच्या मागून जाणाऱ्या रेल्वे लाईनवर सकाळी ७.३० वाजता गाडीखाली येऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृताचे भाऊ विठ्ठल नारायण माहोकार (४१) रा. मोठी उमरी, लक्ष्मी नगर यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा मर्ग दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पंचनामा करून मृतदेह पुढील तपास व शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. लाश हिफाजतीसाठी पोलीस कॉन्स्टेबल यांची नेमणूक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सिव्हिल लाईन पोलीस करीत आहेत.

## निधन वार्ता

### लक्ष्मण अंभोरे



**पिंपळखुटा**: पातूर तालुक्यातील सुकळी येथील रहिवासी लक्ष्मण करणाजी अंभोरे वय वर्ष ९७ यांचे २२ एप्रिल मंगळवार रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, मुले ,जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे.

# अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

## श्री क्षेत्र वेताळ बाबा ते पाटसूल रस्त्याचे प्रकरण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**देवरी, दि. २४ : गत काही दिवसांपासून श्री क्षेत्र वेताळ बाबा ते पाटसूल, रेल्वे रस्त्याचा विवादित प्रश्न निर्माण झाला असून, या रस्त्याच्या कामाची तक्रार केल्यावरून जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांनी बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना चौकशीचे आदेश दिले होते; मात्र या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे.**




गत काही दिवसांपासून श्री क्षेत्र वेताळ बाबा ते पाटसूल, रेल्वे रस्त्याचे काम सन २०२०-२१ मध्ये मंजूर आहे; परंतु गावकऱ्यांच्या व तक्रार करता यांच्या तक्रारीनुसार वेताळबाबा या पावनभूमीच्या रस्त्याचे काम हे २०२४ च्या मे, जूनमध्ये कंप्लिट झालेले आहे, अशी नागरिकांची माहिती आहे. सदर रस्त्यावर कोणत्याही जड वाहनांची वाहतूक नसतानासुद्धा रस्त्यावर मोठ्या भेगा पडल्या असल्याने या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने या कामाची चौकशी करून दोषींना निलंबित करण्याची मागणी २४ मार्च २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे रयत शेतकरी संघटनेचे विदर्भ युवा अध्यक्ष पूर्णाजी खोडके यांनी व प्रभाकर बोरकर यांनी केली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांनी बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना श्री क्षेत्र वेताळबाबा ते पाटसूल रेल्वे रस्त्याचे काम सन २०२३-२४ साली करण्यात आले असून, सदर रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याने संबंधित दोषीविरुद्ध कारवाई करणेबाबत संदर्भीय तक्रारीत नमूद केले होते. तक्रारीतील मुद्दा गंभीर स्वरुपाचा असल्याने या कामाबाबत आपण स्वतः चौकशी करून प्रकरणी दोषीविरुद्ध कारवाई प्रस्तावित करावी. आपणाकडून सात दिवसांचे आत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात यावा, असे निर्देश दिले होते; मात्र अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या आदेशाला कार्यकारी अभियंत्यांनी केराची टोपली दाखवली असून एक महिना होऊनसुद्धा अद्यापही चौकशी करण्यात आलेली नाही. सदर शाखा अभियंता, उपअभियंता अकोट यांनी केलेले निकृष्ट कामे दडपण्यासाठी संबंधित तक्रारकर्त्यांना चौकशी अहवाल देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे तक्रारकर्त्यांनी म्हटले आहे. या गंभीर प्रकरणात जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष देऊन निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामप्रकरणी दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### अधिकाऱ्यांची टाळाटाळ

यासंदर्भात आपण बुधवार (ता.२३) प्रत्यक्ष वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन चौकशी अहवाल संदर्भात माहिती मागितली; मात्र अधिकारी अहवाल देण्यास टाळाटाळ करीत आहेत.

- **पूर्णाजी खोडके,** विदर्भ युवा अध्यक्ष, रयत शेतकरी संघटना.

# अकोट तहसील कार्यालयात पाण्याचा ठणठणाट

## वॉटर कूलर बंद, नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २४ :** तालुक्यामध्ये १०० च्यावर गावांचा समावेश आहे. कित्येक लोक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी तहसील कार्यालयामध्ये येतात. उन्हाळ्याचे दिवस असल्याने अकोला जिल्ह्याचा उन्हाचा पारा ४२ ते ४५ अंश सेल्सिअसवर आहे. निराधार योजनेतील वयोवृद्ध नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यांना दोन किलोमीटर पायी जाणे आणि दोन किलोमीटर वापस येणे, आणि वरून उन्हाचे चटके, तद्नंतर तहसील परिसरामध्ये पिण्याचे पाण्याची सोयसुद्धा उपलब्ध नाही. पिण्याच्या पाण्यासाठी एवढा प्रचंड हाहाकार, मात्र अधिकारी कुठलीही भूमिका



घेताना दिसून येत नाहीत.त्याचप्रमाणे इतरत्र कामासाठी अकोट तहसील कार्यालयामध्ये येणाऱ्या नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होताना दिसून आली आहे. तहसील परिसरात उपलब्ध असलेले वॉटर कूलर बंद अवस्थेत आढळून आल्याने नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांवर आपला रोष व्यक्त केला .नागरिकांना आपली तहान भागविण्यासाठी दोन किलोमीटर परत शहरात येऊन पाणी प्यावे लागत आहे. एवढी दयनीय अवस्था अकोट तहसील कार्यालयाची आहे.

उन्हाचा पारा अधिकच चढत असल्याने नागरिकांचे हाल बेहाल पहावयास मिळत आहेत. यामुळे अकोट शहरातील नागरिकांचा रोष अधिकाऱ्यांवर व्यक्त होताना दिसत आहे. नागरिकांची तहान भागविण्यासाठी तहसील प्रशासनाने कायमस्वरूपी मार्ग काढावा व नागरिकांची गैरसोय टाळावी, असे नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे.

## महिला सुरक्षा वाऱ्यावर...




**अकोट : येथील बसस्थानकावर असलेल्या पोलीस चौकीत पोलीस कर्मचारी नेहमीच अनुपस्थित राहत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरात भुरटे चोरांचा वावर वाढला असून, बसस्थानकावर महिला सुरक्षा वाऱ्यावर असल्याची ओरड नागरिकांकडून होत आहे.**

**(छाया- देवानंद खिरकर)**

# आकोट भाजपा तालुकाध्यक्ष पदी गोपाल मोहोड, तर शहराध्यक्षपदी हरिष टावरी यांची फेरनिवड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २४ :** भारतीय जनता पार्टी आकोट तालुका व शहराची संघटनात्मक निवडणुक मंगळवारी मान्यवरांच्या उपस्थीतीत पार पडली त्यामध्ये आकोट तालुका अध्यक्ष पदी गोपाल मोहोड तर शहर अध्यक्षपदी पुनःच हरिष टावरी यांची निवड करण्यात आली. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्रात संघटन पर्व सुरु आहे त्याअंतर्गत आकोट शहर व तालुका भाजपा संघटनात्मक निवडणुक मंगळवार दि.२२ रोजी आमदारांचे कार्यालय येथे आयोजीत करण्यात आली होती या सभेच्या अध्यक्षस्थानी आ.प्रकाश भारसाकळे होते तर ग्रामीणचे निवडणुक अधिकारी मनोहरराव रहाणे,शहर निवडणुक अधिकारी राजेश नागमते लाभले होते तर मंचावर जिल्हाउपाध्यक्ष प्रभाकरराव मानकर,ज्येष्ठ नेते विनायकराव भोरे,माजी नगराध्यक्ष हरिनारायण माकोडे,पुरुषोत्तम चौखंडे,संतोष झुनझुनवाला,विधानसभा संयोजक




उमेश पवार प्रा.अशोक गावंडे,राजेश रावणकर,विठ्ठल वाकोडे, योगेश नाठे,संदीप उगले आदिंची मंचावर उपस्थीती होती. निवडणुक अधिकारी रहाणे यांनी प्रक्रीया विषद करीत गोपाल मोहोड यांची तालुकाध्यक्ष पदी निवड झाल्याचे घोषीत केले तर राजेश नागमते यांनी शहराध्यक्षपदी हरिष टावरी यांची निवड झाल्याचे घोषीत केले त्यानंतर आ.भारसाकळे यांनी मोहोड व टावरी यांना नियुक्ती पत्र व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले त्यानंतर बोलतांना आ.भारसाकळे यांनी अध्यक्षपद ही पार्टीने केलेली एक व्यवस्था आहे,पार्टीमध्ये खांदेपालट होत असतात, मोहोड व टावरी यांचेवर पुढील कार्यकालासाठी पक्षाने जवाबदारी दिली आहे त्यांनी भाजपाचे संघटन शहरात व ग्रामिण भागात अधिका-अधिक मजबुत करावे व आगामी स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये पक्षाचा झेंडा फडकावा असे आवाहन केले.बैठकीचे प्रास्तावीक विधानसभा संयोजक उमेश पवार यांनी केले तर संचलन शहर सरचिटणीस तथा माजी नगरसेवक मंगेश लोणकर व आभार भाजयुमो जिल्हासरचिटणीस गजानन आकोटकर यांनी मानले.यावेळी दोघांच्याही निवडीचे स्वागत पेढे भरवुन तसेच फटाक्याची आतिषबाजी व ढोल-ताशे वाजवुन करण्यात आले,बैठकीला शहर व ग्रामिण भागातील पदाधिकारी,क्रीयाशील सदस्य,बुथ समिती अध्यक्ष, सदस्यांची उपस्थीती होती.

# माकड आडवे आल्याने दुचाकीचा अपघात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**वाडेगाव, दि. २४ :** बाळापूरकडून वाडेगावकडे येत असताना रस्त्यावर अचानक माकड आडवे आल्याने दुचाकीचा अपघात झाल्याची घटना २४ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजताच्या दरम्यान वाडेगाव-बाळापूर रस्त्यावरील पेट्रोल पंपाजवळ घडली. यावेळी उपस्थितांनी जखमींना तत्काळ उपचारार्थ अकोला येथे पाठविण्यात आले; मात्र त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

### दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू

मिळालेल्या माहितीनुसार देगाव येथील ५२ वर्षीय रमेश वासुदेव गावंडे (५२) हे एम एच ३० बी आर ९०५४ क्रमांकाच्या दुचाकीने बाळापूरकडून वाडेगावकडे येत असताना वाडेगाव बाळापूर रस्त्यावरील पेट्रोल पंपाजवळील थोड्याच अंतरावर असलेल्या वळणावर अचानक दुचाकी समोर माकड आडवे आल्याने दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात दुचाकीचालक रस्त्यावर कोसळल्याने गंभीर जखमी अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडलेला होता. यावेळी वाडेगाव ग्रामपंचायतचे सरपंच राजेश्वर पळसकार, सागर सरप, रंणजित अहीर, प्रेम तायडे, गोपाल भोंडे, हे रस्त्यावरून प्रवास करीत असताना त्यांना दुचाकीस्वार गंभीर जखमी अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडलेले दिसले. त्यांनी त्वरित जखमींना उपचारार्थ प्राथमिक आरोग्य केंद्रात आनले असता येथे जखमींवर प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी अकोला येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात १०८ रुग्णवाहिकेतून हलविण्यात आले; मात्र येथे उपचार सुरू असताना त्याचा मृत्यु झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन भाऊ, मुलगा, मुलगी असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# माझ्या पित्याच्या हत्येत अनेक मारेकरी; मृताच्या मुलाचा आरोप

## हत्येचा तपास सीआयडीकडे देण्याची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. २४ :** काही दिवसांपूर्वी पातूर शहरातील मुजावरपुरा येथील सय्यद जाकीर सय्यद मोयुद्दीन यांची धारदार शस्त्राने हत्या झाली होती. त्यामध्ये पातूर पोलिसांनी दोन ते तीन आरोपींना या गुन्ह्यामध्ये अटक केली असून, आरोपीने गुन्हा कबूल केला आहे; मात्र सदर हत्येमध्ये आणखी आरोपी असून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी वडिलांच्या हत्येचा तपास सीआयडी विभागाकडे देण्यात यावा, अशी मागणी मृत सय्यद जाकीर सय्यद मोयुद्दीन यांचा मुलगा सय्यद शाकीर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. सविस्तर वृत्त असे आहे की, शिर्ला ग्रामपंचायत हद्दीमध्ये मुजावरपुरा येथील शेतकरी सय्यद जाकीर यांची हत्या ही सामान्य कारणाने झालेली नसून, गोवंश चोरीचे रॅकेट उघडकीस येऊ नये म्हणून पाच ते सहा आरोपींनी संगनमत करून नियोजनबद्ध कट रचल्याचा संशय मृताच्या कुटुंबियांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी अनेक दिवस वडिलांवर पाळत ठेवत योग्य क्षणाची वाट पाहत निर्घृण हत्या केली. या प्रकरणात अटक झालेल्या काही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असली, तरी या गुन्ह्याच्या मुळाशी असलेले रॅकेट अद्याप पोलिसांच्या तपासातून दूरच आहे, असा गंभीर आरोप करत मृताचे पुत्र सय्यद शाकीर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सीआयडीमार्फत सखोल तपासाची मागणी केली आहे.

सय्यद शाकीर यांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे वडील सय्यद जाकीर हे पातूर शिवारातील आपल्या शेतीत दररोज गायी-गुरांना चारापाणी करण्यासाठी जात असत. १२ मार्च २०२५ रोजी ते नेहमीप्रमाणे शेतात गेले; मात्र रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी शोध घेतला असता तुळजापूर रस्त्यालगत गोठ्याजवळ त्यांचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाजवळ त्यांचा पाण्याचा डबा आणि थैली व्यवस्थित ठेवलेली होती, मात्र त्यांच्या शरीरावर धारदार शस्त्राने अनेक घाव केलेले होते. या हत्येप्रकरणी पातूर पोलीस ठाण्यात एफआयआर क्र. ०११३/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०३(१) आणि २३८(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरुवातीला इजरार खान मुकद्दर खान याच्यावर संशय घेत तक्रार दाखल करण्यात आली, पोलिसांना दिलेल्या जबानीमध्ये अल्तमश खान, शहजाद खान, नवाज शाह व हमीद खान अशी इतर आरोपींची नावे पोलिसांना सांगण्यात आली . या आरोपींनी काही अंशी गुन्ह्याची कबुली दिली असली तरी मुख्य सूत्रधार अद्यापही मोकाट असल्याचा आरोप मृताच्या मुलाने मुख्यमंत्र्यांना दिलेल्या तक्रारीमध्ये केला आहे. हत्या झाली त्या ठिकाणी फारसे रक्त सांडले नसल्यामुळे मृतदेह इतरत्र मारून गावठाण परिसरात आणून टाकल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. तसेच, घटनास्थळी सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही त्यांची तपासणी करण्यात आलेली नाही, ही गंभीर दुर्लक्षाची बाब असल्याचे सय्यद शाकीर यांनी नमूद केले.

### गोवंश चोरीविरोधात वारंवार तक्रार केल्याने हत्या

मुजावरपुरा येथील शेतकरी सय्यद जाकीर यांची हत्या गोवंश चोरीविरोधात वारंवार तक्रार केली गेली, असा आरोप मृताच्या कुटुंबीयांनी केला आहे. त्यांचा विश्वास आहे की, आरोपींनी गोवंश चोरीचे रॅकेट उघड होऊ नये म्हणून पुरावे नष्ट करण्याचा उद्देश ठरवून ही हत्या केली. मृताचे पुत्र सय्यद शाकीर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सीआयडीमार्फत सखोल तपासाची मागणी केली आहे, ज्यामुळे मुख्य आरोपींना पकडून योग्य न्याय मिळवता येईल.

“ माझ्याकडे अशा प्रकारचे कोणतेही निवेदन किंवा अर्ज आलेले नाहीत. त्यामुळे सध्या या प्रकरणावर भाष्य करणे संयुक्तीक होणार नाही. मात्र संबंधित कागदपत्रे माझ्याकडे आल्यानंतर तपासांतर्गत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

- **हणमंत डोपेवाड,** ठाणेदार पातूर.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा,शुक्रवार २५ एप्रिल २०२५ www.ajinkyabharat.com




## थोडक्यात

### विधान परिषद सभापती राम शिंदे यांचा जिल्हा दौरा



**बुलडाणा** : महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे दि. २५ व २६ एप्रिल २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौरावर येत आहे. त्याांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.शुक्रवार दि. २५ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता अहिल्यानगर येथून शेगांव संस्थान विश्रामगृह, ता.शेगाव जि. बुलढाणा येथे आगमन व मुक्काम. शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ वाजता गजानन महाराज मंदिर, शेगांव येथे दर्शन. सकाळी ८.३० वाजता शेगाव येथून अमरावतीकडे प्रयाण करतील.

### युवा हिंदू प्रतिष्ठानतर्फे भ्याड हल्ल्याचा निषेध

**खामगाव:** जम्मू आणि काश्मीर येथील इस्लामिक दहशतवाद्यांनी निर्दयपणे हल्ला केल. ज्यात असंख्य निष्पाप हिंदू नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या भयंकर हिंसाचाराच्या निषेधार्थ समस्त हिंदुत्ववादी, गौरक्षक व हिंदू धर्मबंधूच्या उपस्थितीत उद्या २५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता येथील टॉवर चौक, उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर संविधानिक पद्धतीने शांततेच्या मार्गाने निषेध व्यक्त करण्यात येणार असून निवेदन देण्यात येणार आहे. तरी जात-पात, पंथ भाषावाद विसरून जास्तीत जात संख्येने हिंदू धर्मबंधूनी उपस्थित राहावे, असे आवाहन युवा हिंदू प्रतिष्ठान तर्फे करण्यात आले आहे, अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकातून देण्यात आली आहे.

### महिलेला मारहाण; चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**बुलडाणा** :दारासमोर उभे राहून महिलेला इकडे ये असे म्हणून आवाज दिला. परंतु सदर महिलेने या आवाजाला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे चिडून सदर महिलेच्या अंगावर धावत जावून मारहाण केली. यावेळी त्याच्या कुटुंबातील इतरांनी त्याला सहकार्य केले. अशा आशयाच्या तक्रारीवरुन खामगाव ग्रामीण पोलिसांनी चौघांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. कदमापूर येथील ज्योती मंगेश बिलेवार (२८) ही महिला २३ एप्रिल रोजी संध्याकाळी गल्लीतून जात असताना तिला सुरज संतोष बगे याने आवाज देवून इकडे ये असे म्हटले. परंतु तिने तिकडे कशाला येऊ असा उलट जाब दिला. त्यामुळे चिडून सुरज संतोष बगे याने तिच्या अंगावर धावून जावून तिला शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच मनोज संतोष बगे, सरला सुरज बगे, संतोष विश्वनाथ बगे यांनीही धावत येवून सौ. ज्योतीला मारहाण केली. या मारहाणीत आणखी एक महिलाही जखमी झाली. जखमी झालेल्या महिलेचे नाव बेबी रामदास भोंगरे आहे. अशा आशयाची तक्रार सदर महिलेने खामगाव ग्रामीण पोस्टेला दिली. त्यामुळे पोलिसांनी आरोपी सुरज, मनोज, सरला, संतोष अशा चौघांविरुध्द आज २४ एप्रिल रोजी कलम ११८ (१), ११५ (२), ३, (५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे.

# बुलडाणा जिल्ह्यातील ५० पर्यटक जम्मू काश्मीरमध्ये

## सुखरुप घरी पोहोचविण्यासाठी केंद्रीयमंत्री जाधव यांच्या कार्यालयाशी साधला संपर्क!

**अजिंक्य भारत / प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.२४**

जम्मू काश्मिरातील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्यानंतर भयभित झालेले आणि जम्मू काश्मिरमध्ये बुलढाणा जिल्हयातील सुमारे ५० नागरीक अडकुन पडले आहेत. त्यांनी घरी सुखरुप पोहचविण्याच्या दृष्टीकानातुन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला आहे. गृह विभागाच्या मदतीने उपाययोजना करण्यात येत असल्याची माहीती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन देण्यात आली आहे.

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्याचा शिवसेनेच्या वतीने निषेध नोंदविला आहे.



केंद्र सरकारने केलेल्या विविध उपाय योजनांमुळे जम्मू काश्मिरमध्ये पर्यटकांचा ओढा वाढलेला असतांना देशामध्ये धर्माच्या नांवावर विभाजन करण्याच्या दृष्टीकोनातुन दहशतवाद्यानी जम्मू काश्मिरमध्ये गेलेल्या पर्यटकांवर लक्ष करत गोळीबार केला. यामध्ये २६ जण मृत्यूमुखी पडले असुन त्यातील ६ जण हे महाराष्ट्रातील आहेत. बुलडाणा जिल्हयातील जवळपास ५० पर्यटक जम्मू काश्मिरमध्ये पर्यटनांसाठी गेलेले आहेत हे सर्व पर्यटक सुखरुप आहेत. अनेकांनी केंद्रीयमंत्री तथा जिल्हयाचे खासदार प्रतापराव जाधव यांच्या दिल्ली येथिल कार्यालयाशी संपर्क साधला असुन त्यांना घरी सुखरुप पोहचविण्याच्या दृष्टीकोनातुन प्रयत्न करण्यात येत आहे. बुलढाणा येथिल पत्रकार अरुण जैन यांच्या कुटूंबातील ५ व्यक्ती जम्मू काश्मिर पर्यटनासाठी गेलेले आहेत. त्यांचे कुटूंबीय सुखरुप आहेत. इतर ४५ जण जम्मू काश्मिर मध्ये अडकुन पडलेले आहे दहशतवादी हल्यानंतर अडकुन पडलेले सर्व पर्यटक भयभित झाले आहेत. त्यांची मागणी घरी सुखरुप पोहचण्याची आहे. या संदर्भात गृह विभागाशी संपर्क साधण्यात आला आहे. त्या सर्वांना सुखरुप घरी पोहचविण्याच्या दृष्टीकोनातुन उपाययोजना करण्यात येत आहे. अशी माहीती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन देण्यात आली आहे. दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्याचा शिवसेनेच्या वतीने निषेध करण्यात आला आहे.

**जम्मू कश्मीर येथे अडकून पडलेल्या पर्यटकांना स्वतः रेल्वेत बसून केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिल्लीकडे रवाना केले आहे**

जम्मू कश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांना लक्ष करत दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता या घटनेनंतर अनेक पर्यटक जम्मू-काश्मीरमध्ये अडकून पडले होते. त्यांना घराकडे परत यायचे होते, त्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने विशेष रेल्वे सोडण्यात आली. अडकलेल्या पर्यटकांना रेल्वे स्थानकावर आणून रेल्वे गाडीत बसून देण्याचं काम केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला आहे. हे सर्व पर्यटक दिल्लीला येणार आहे. त्यानंतर त्यांना त्यांच्या गावाकडे जाणाऱ्या रेल्वे मार्गाने पाठवण्यात येणार आहे. यासाठी केंद्र सरकारच्या वतीने रेल्वेमध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे आता हे पर्यटक आपल्या गावी सुखरूप पोहोचणार आहेत.

## कृषी उत्पन्न बाजार समिती तिसऱ्यांदा जिल्ह्यातून प्रथम

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**शेगाव दि.२४**

शेगाव राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आर्थिक वर्ष २०२२-२४ मधील कामगिरीच्या आधारावर रैंकिंग (दर्जा) जाहीर झाला आहे. यामध्ये शेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने सलग तिसऱ्यांदा बुलढाणा जिल्ह्यातील तेरा बाजार समिती मधून पहिला क्रमांक पटकाविला असून विभागामधून सहावातर राज्यामधून सोळावा क्रमांक पटकाविला आहे. शेगाव बाजार समिती लहान असून सुद्धा तिने उत्कृष्ट कामगिरी करत बाजी मारली आहे. यावर्षीच्या रॅंकिंगमध्ये बाजार समित्यांच्या आर्थिक व्यवस्थापन, कामकाज, आणि शेतकऱ्यांसाठी पुरवलेल्या सोयीसुविधा यांसारख्या घटकांचा विचार करण्यात आला. एकूण ३०५ बाजार समित्याांचे मूल्यांकन करण्यात आले होते.

खाजगी बाजारांची वाढती स्पर्धा लक्षात घेता शेगांव बाजार समितीने आता आधुनिकीकरणावर भर देण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा पुरवणे, मालाची गुणवत्ता तपासणे, आणि वेळेवर व्यवहार करणे यावर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. बाजार समितीने मुख्य बाजार आवारात संगणकीकृत वजन काटे, तसेच ऑनलाइन पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. बाजार समितीद्वारे आता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. यामध्ये जनजागृती कार्यक्रम, मार्गदर्शन शिबिरे, आणि आवश्यक सुविधा पुरवण्यावर भर दिला जात आहे. त्यांना त्यांच्या मालाला चांगला भाव मिळेल आणि वेळेवर पेमेंटची सोय उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शेगाव बाजार समितीने सहकार नेते पांडुरंग पाटील यांचे मार्गदर्शनाखाली मुख्य बाजार आवारात प्रशस्त असे भव्य नवीन प्रशासकीय कार्यालय उभारले आहे. याबाबत राज्यातील बारामती, वर्धा, जिंतूर, कोल्हापूर, मलकापूरखामगाव, मेहकर, गोरेगाव, मालेगाव, माहूर, भिवापूर, पांढरकवडा यांचे सह ४० ते ५० कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे सभापती, उपसभापती, सचिव व संचालक मंडळ यांनी शेगाव बाजार समितीला भेट देऊन बाजार समितीचे सभापती गोपाळराव मिरगे, श्रीकांत तायडे सचिव विलास पुंडकर यांचे सह संचालक मंडळ व कर्मचारी यांचे कौतुक होत आहे

## एस.टी.पडली बंद; राज्य महामार्गावर ट्राफिक जाम

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**डोणगाव दि.२४**

डोणगाव हे राज्य महामार्गावर असून येथून अहोरात्र ट्राफिक सुरु असते अश्यातच २३ एप्रिलच्या दुपारी ऐन ट्राफिक मधे एस टी बस फेल झाली आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूने एक ते दीड किमीच्या रांगा लागल्या मात्र हाकेच्या अंतरावर असलेल्या पोलीस स्टेशन मधून एकही पोलीस ट्राफिक सुरळीत करण्यासाठी आलेला नसल्याने सुमारे दीड तासा नंतर वाहतूक सुरळीत झाली.

डोणगाव येथील आठवडी बाजार हा बुधवारी असल्यामुळे मुंबई नागपूर राज्य महामार्गा वरील वाहतूक आणि बाजारा साठी आलेल्या लोकांनची गर्दी, असते आठवडी बाजाराचे नियोजन न केल्याने आठवडी बाजार हा राज्य महामार्गाला लागूनच भरतो अश्यात ऐन बाजाराच्या दिवशी बाजार भरलेला असतांना बसस्थानक जवळ सोमेश वाईनबार समोर एस टी बस बंद पडली त्याने ट्राफिक जाम झाले रस्त्याच्या दोन्ही बाजूने वाहणाच्या रांगा लागल्या ज्या ठिकाणी एस टी बंद पाडली त्या पासून पोलीस स्टेशन हे १५० मिटर अंतरावर



असल्या नंतर सुद्धा येथे वाहतूक सुरळीत करण्यासाठी एकही पोलीस कर्मचारी आलेला नसल्याने ही ट्राफिक जाम अवस्था सुमारे दीड तास जशीच्या तशीच होती. त्याला जवाबदार कोण असा प्रश्न जन सामान्यांच्या मनात निर्माण होतं आहे. तर डोणगाव येथे भर बसस्थानकावर अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने उभी असतात त्याच्या मुळे ही वारंवार ट्राफिक जाम होते, पण डोणगाव बसस्थानकावर वाहतूक पोलीस दिसत नाही. या अगोदर ही माजी मंत्री मनोहर नाईक यांना वाहतूक खोळबीचा फटका बसला होता तेव्हा त्यांनी प्रशासनाला धारेवर धरताच डोणगाव येथील वाहतुकीची समस्या सुटली होती. सध्या डोणगाव बसस्थानकावर राज्य महामार्गोलगत अतिक्रमण झालेली आहे. त्यामुळे वारंवार वाहनधारकांना वाहतूक कोंडी चा सामना करावा लागत आहे याकडे संबधित विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे.

## उद्या काँग्रेसची भव्य सद्भावना संकल्प सभा

### प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्यासह मान्यवर राहणार उपस्थित

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.२४**

बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने येत्या २६ एप्रिल शनिवार रोजी खामगाव येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत भव्य सद्धावना संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून समाजातील जातीय तसेच धार्मिक विद्वेष वाढत चालला आहे. दहशतवादी हल्ल्यांमध्ये निष्पाप नागरिकांचा बळी जात असून देशाच्या शत्रुकडून सुरक्षिततेला आव्हान दिल्या जात आहे. तसेच अनेक माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत असून देश व महाराष्ट्र अस्थीर करण्याचे काम केल्या जात आहे. समाज एकसंघ असावा, तिथे जातीय तसेच धार्मिक द्वेषाला, तिरस्काराला काहीही महत्व असू नये हेच काँग्रेसचे उद्दिष्ट राहले आहे. त्यामुळेच समाजातील वाढत्या विद्वेषाला प्रेमभावनेचे उत्तर देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने संविधान बचाव व सद्धावना रॅली, सभेचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने येत्या २६ एप्रिल २०२५ रोजी खामगाव येथील संत तुकाराम महाराज सभागृह, नांदुरा रोड येथे सकाळी १० वाजता प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत भव्य सद्धावना संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, माजी आमदार राहुल बोंद्रे तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस प्रभारी कुणाल चौधरी, बुलढणा जिल्हा निरीक्षक राजेंद्र राख, आमदार धीरज लिंगाडे यांचेसह काँग्रेस पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी सद्धावना सभेचे उद्दिष्ट, काँग्रेसचे आगामी काळातील ध्येय, धोरण व आगामी निवडणूक संदर्भात प्रदेशाध्यक्षांसह प्रमुख पदाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी या सद्धावना संकल्प सभेस बुलढाणा जिल्ह्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा काँग्रेस कमिटीचे राहुल बोंद्रे, ज्ञानेश्वर दादा पाटील यांनी केले आहे.



## तालुका शेतकी खविसं संचालक मंडळाची निवडणूक ३१ मे रोजी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपूर दि.२४**

तालुका शेतकी खरेदी विक्री सहकारी संस्थेच्या १५ संचालक मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम २२ एप्रिल रोजी घोषित झाला असून निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. तर ३१ मे रोजी निवडणूक होणार आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार सहकारी संस्था मतदार संघ ५, वैयक्तिक सर्वसाधारण मतदार संघ-५, अनुसूचित जाती जमाती मतदार संघ १, महिला राखीव मतदार संघ २, इतर मागास प्रवर्ग राखीव मतदार संघ १, विमुक्त जाती/ भटक्या जमाती व विमाप्र सदस्य १ अशा एकुण १५ संचालकांच्या जागेसाठी निवडणूक होणार आहे.

२२ ते २८ एप्रिल पर्यंत सकाळी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशन पत्र मिळतील व स्वीकारले जातील, २ ते १९ मे पर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत, २० मे रोजी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द व मतदानाचे ठिकाण नंतर कळविण्यात येईल. तर १ जून रोजी सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरूवात व मतमोजणीनंतर लगेच निकाल जाहीर करण्यात येईल.

## मेहकर येथील अतिक्रमिकांचे पुनर्वसन करा

### अन्यथा न्यायालयात दाद मागणार- सावजी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**डोणगाव दि.२४**

मेहकर मधे मागील वीस दिवसा पासून अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरु असून यामध्ये कित्येक व्यावसायिक बेरोजगार झाले त्यांच्यावर अन्याय झाला अश्यात जास्त दुकाने असल्यामुळे ग्राहकांचा फायदा होतो व बाजार पेठेत लोक येतात त्याला पाहता मोठ्या शहरात अश्या व्यवसायिकाकडे कानाडोळा केल्या जातो मात्र मेहकर मधे झालेली कार्यवाही म्हणजे व्यवसायिकावर घात करणारी ठरत असल्याने त्यांना नुकसान भरपायी सोबतच त्यांना नगरपालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करून देवून पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी एका पत्राद्वारे मुख्याधिकारी राम कापरे यांच्या कडे केली.

मेहकर येथे गेल्या २० दिवसा पासून अतिक्रमण म्हणून जे दुकाने, घरे पाडल्या जात आहेत त्यांना विविध परवाने, विद्युत मिटर घेण्यासाठी लागणारे नाहरकत, बँकेचे लोन घेण्यासाठी लागणारे नाहरकत या साठी नगर पालिकेने सन्मनती दिली आणि अत्ता हेच अतिक्रमण कसे?अतिक्रमण होतं असतांना किव्हा त्याला समंती देणारे ते कोण, अतिक्रमण होतं असतांना वॉर्ड ऑफिसर तेव्हा काय करत होते त्यांनी अतिक्रमण साठी मज्जाव का केला नाही ज्यांनी अतिक्रमणला चालना दिली अश्या अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर एफ आय आर नोंदवा



ते गोर गरिबांच्या नुकसानीला कारणीभूत आहेत, अतिक्रमण म्हणून जे आपण सुशिक्षित बेरोजगार, विधवा, पिढ्यानं पिढ्या चालणारे व्यवसाय मोडून टाकले अश्या व्यवसायिकांना पर्यायी जागेवर ना नफा ना तोडा या तत्वावार गाळे बांधून देण्यात यावे जेणेकरून त्यांच्या पोटा पाण्याचा प्रश्न मिटेल तसेच त्यांना नुकसान भरपायी देण्यात यावी व भविष्यात ज्या ठिकाणचे अतिक्रमण काढले तेथे पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची हमी कोण देणार त्याा सोबतच कोणतेही गाव किव्हा शहर हा तेथील व्यवसायावर अवलंबून असतो. व्यावसायिक जास्त जास्त दुकाने म्हणजे ग्राहकांचा फायदा त्याला पाहता पुणे, मुंबई, अमरावती, अकोला या सारख्या महानगर पालिकेत अतिक्रमण असून सुद्धा त्याच्या कडे कानाडोळा केल्या जातो. कारण त्यावर कित्यकांचे पोट अवलंबून असते असे असतांना मेहकर मधे मात्र उलट व्यवसायिकांच्या दुकानावर बुलडोजार चालवल्या गेलेत तेव्हा तुम्ही त्या दुकानदाराचे पुनर्वसन करा अन्यथा मि १५ दिवसा नंतर नगर पालिका प्रशासन विरुद्ध न्यायालयात दाद मागणार आहे. त्याने तुम्ही या लोकांचे पुनर्वसन कसे करणार त्याची रूपरेषा ठरवा अश्या आशयचे पत्र दिले.

# बिट जमदार सिध्दार्थ सोनकांबळे यांना तत्काळ बडतर्फ करा

## अन्यथा अन्नत्याग आंदोलन छेडणार -विठ्ठल खेडेकर

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**अंढेरा दि.२४**

मातृतिर्थ बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठे पोलीस स्टेशन म्हणून अंढेरा पोलिस स्टेशन ओळखले जाते. मागिल काही महिन्यांपासून अंढेरा पोलिस स्टेशन कोणत्या ना कोणत्या कारणाने संपूर्ण जिल्हाभर नव्हे तर राज्य भर चर्चेत आहे. बुलढाणा जिह्यात जवळपास सत्ताविस ते अठ्ठावीस पोलिस स्टेशन असुन अंढेरा पोलिस स्टेशन विविध घटना, क्राईमसाठी नेहमीच चर्चेत असते. मागिल काही महिन्यांपूर्वी अफु प्रकरण असो किंवा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांचे खडक पुर्णा पाण्यासाठी बलिदान असो या दोन्ही घटनेने अंढेरा पोलिस स्टेशन संपूर्ण राज्यभर गाजले. सध्या अंत्री खेडेकर येथील युवा सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल खेडेकर आणि कार्तिक खेडेकर यांनी मेरा बु. बिटचे हप्तेखोर बिट जमदार सिध्दार्थ सोनकांबळे यांना बडतर्फ करावे अन्यथा मुख्यालयी बदली करण्याची मागणी केली होती. त्यावर ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या कडुन कुठलीच कार्यवाही न झाल्याने अखेर युवा सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल खेडेकर आणि



कार्तिक खेडेकर यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे बुलढाणा व अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार रुपेश शक्करगे यांना दि.२३ एप्रिल २०२५ रोजी एक स्मरणपत्र देऊन पुढील पाच दिवसांत मागणी मान्य न झाल्यास दि.२८ एप्रील पासुन मेरा खु. फाट्यावर अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा एका स्मरण पत्र द्वारे दि.२३ एप्रील रोजी दिला आहे.

संतोष भुतेकर यांचे अवैध रेती उत्खनन व वाहतूक विरोधात नुकतेच जलसमाधी आंदोलनामुळे महसूल तसेच पोलिस प्रशासनाचे चांगलेच नाकीनऊ आले असुन यात अंढेरा पोलिस स्टेशन अवैध रेती वाहतूक रोखण्यात पुर्णपणे अपयशी ठरले असुन महसुल प्रशासनाने पकडलेले टिप्पर अंढेरा पोलिस स्टेशनचे तोडी बहाद्दर कर्मचारी यांनी अनेक वेळा सोडले असुन अवैध रेती वाहतूकतुन मिळणारा मेवा वसुलीसाठी हपापलेले कर्मचारी यांच्या बुडखावर घाव घालण्याची वेळ आली असुन आता या अवैध रेतीतुन मलाई खाणारे कर्मचारी यांच्यावर कारवाई न केल्यास गंभीर स्वरूपाचे परिणाम भोगावे लागतील असा इशारा विठ्ठल खेडेकर यांनी दिला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणारे मेरा बु बिट तथा देऊळगाव घुबे बिटमध्ये बिट अंमलदार सिद्धार्थ सोनकांबळे यांच्या अभयामुळे सुरु असलेल्या अवैध देशी दारू विक्री, वरली मटका, अवैध गुटखा विक्री,अवैध रेती वाहतूक तसेच वसुली यामुळे सर्व सामान्य गावकरी तथा नागरिक त्रस्त असुन याबाबत नागरिकांनी पोलीस स्टेशन अंढेरा यांचेकडे वेळोवेळी तक्रारी निवेदने दाखल केले परंतु नागरिकांच्या तक्रारीवर पोलीस स्टेशन अंढेरा कडून कुठलीच कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नसुन अवैध धंदे कायमचे बंद न होता अधिकच वाढले आहेत. सुरु असलेले अवैध धंदे हे सर्वसामान्य जनतेला दिसतात परंतु अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना दिसत नाही का? त्यांना चष्मा लावण्याची गरज आहे का? तसेच याबाबत आपण लवकरच राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेणार असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल खेडेकर यांनी दैनिक अजिंक्य भारत ला बोलताना दिली आहे. आता जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे हे भ्रष्ट व हप्तेखोर बिट जमदार यांच्यावर काय कार्यवाही करतात याकडे परिसरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५

# कारल्यातील शंकराला ब्रह्मदेवाचा आशीर्वाद!

## प्रयागराजची धुंदी : कुठल्याही आजारावर आयुर्वेदिक उपचाराचा दावा

अजिंक्य भारत । संजय देशमुख

**अमरावती, दि. २४ :** कारला येथे २३ जानेवारी २०२५ रोजी ब्रह्मदेवाची स्थापना झाली असून येथील शंकर महाराज नामक व्यक्तीला ब्रह्मदेवाचा आशीर्वाद प्राप्त असल्याचे बोर्ड गावाच्या मुख्य स्थानकाशेजारी बघायला मिळते. कारला येथे हर बिमारी वर आयुर्वेदिक औषधी मिळेल असे बोर्ड लावून एका भोंदू महाराजने प्रयागराज यात्रेपासून प्रभावित होत गावातच झोपडी उभारून छोटेखानी आखाडा निर्माण केला आहे. पंचक्रोशीत साक्षात शंकराला ब्रह्मदेवाचा आशीर्वाद म्हणून चर्चेला पेव फुटले आहे. कारला नजिक असलेले मार्डी येथील तवेवाला महाराज प्रकरण सध्या शांत होत असताना कारला येथील शंकर महाराज चर्चेत येत आहे. कधीकाळी गावातच सोकारी करणाऱ्या या महाराजच्या कुटुंबातील सदस्यांनी महाराजची साथ सोडली आहे. प्रयागराज येथील कुंभमेळाचे दर्शन घेऊन तेथील विविध महाराजांचे आखाडे बघून प्रभावित झालेल्या या महाराजने कारला येथील मुख्य बसस्थानकाच्या बाजूच्या शासकीय जागेवर अतिक्रमण करत झोपडी उभारली आहे. या झोपडीच्या चहू बाजूंनी भगवे झंडे उभारून परिसरात केसरी व हिरव्या पताका उभारल्या आहे. सुरुवातीला पक्ष्यांना धान्य व पाणी ठेवत समाजात भूतदया निर्माण करत हळूहळू लोकांना आयुर्वेदिक औषध देण्याचा गोरखधंदा महाराजाने सुरू केला आहे.आता तर चक्क तेलाच्या पिप्याच्या पत्र्यावर बोर्ड प्रकाशित करत त्यावर साक्षात ब्रम्हदेवाची २३ जानेवारी २०२५ रोजी गुरुवारी ब्रम्हदेवाची स्थापना केल्याचे लाल अक्षरात लिहिले आहे.






### १०९ आजारांवर औषधींचा दावा

बोर्डवरील माहितीवरून एका व्यक्तीने कॅन्सरवर उपचार करणार का असा प्रश्न विचारला असता त्यावर होकार दर्शवित पेशंट ला घेऊन या गॅरंटीने आजार ठीक होणार असल्याचे शंकर महाराज ने दावा केला. १०९ आजारावर १०९ प्रकारचे औषध उपलब्ध असल्याचे शंकराचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे दुरून दुरून पीडित लोकं इलाजासाठी येत असल्याचे त्याचे म्हणणे आहे.

### सरकार उपचार करणार का?

सध्या कारला मार्डी परिसर भोंदू महाराजांची भूमी बनली आहे. कोणत्याही तांत्रिक शिक्षणाशिवाय एखाद्या रुग्णावर औषधोपचार करणे कायद्याने गुन्हा आहे. अमरावती शहरात सुध्दा एका अवैध वैद्यकीय उपचार करणाऱ्याव डॉक्टर विरूध्द जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार दिल्यावर सुध्दा उपचार केल्या जात नाही तर मग ग्रामीण भागातील अश्या भोंदुवर सरकार उपचार करणार की केवळ जादूटोना विरोधी कायदा केवळ कागदोपत्री राहणार असा सूर जनमानसात उमटत आहे.

---

## थोडक्यात

### नरहरी माळवी सुवर्णकार संघाची कार्यकारिणी गठित



**अमरावती :** नरहरी माळवी सोनार समाजाची आमसभा २० एप्रिलला सकाळी १० वाजता नरहरी माळवी प्रार्थना सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये नवीन कार्यकारिणी घोषित करण्यात आली. माळवी सुवर्णकार संघाच्या अध्यक्षपदी पुन्हा राजेंद्र अनासाने यांची एकमताने निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून राजेंद्र धरमठोक, विनोद गुहे, तर खजिनदार म्हणून नितीन खांडेकर, सचिवपदी राजेंद्र प्रांजळे, सहसचिवपदी मंगेश नेरकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी माळवी सुवर्णकार संघाच्या आमसभेत समाजातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. संस्थेचे अध्यक्ष राजेश अनासाने यांच्या नेतृत्वात ही कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

### पहलगाममधील पर्यटकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन सुरू

**अमरावती :** काश्मीरमधील पहलगाम येथील झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जिल्ह्यातील पर्यटक अडकले असण्याची शक्यता आहे. या परिस्थितीतील नागरिकांच्या मदतीसाठी श्रीनगर येथे विशेष हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. हेल्पलाईन क्रमांक हा दूरध्वनी : ०१९४-२४६३६५१, २४५७५४३, २४८३६५१ असून व्हॉटसअॅप क्रमांक : ७७८०८०५१४४, ७७८०९३८३९७, ७०००६०५८६२३ आहे. जिल्ह्यातील नागरिक पहलगाममध्ये अडकले असल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा किंवा माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, दूरध्वनी क्रमांक: ०७२१-२६६२०२५, आपत्कालीन संपर्कासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर संपर्क क्रमांक : ९४२१७४७७७७, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर, संपर्क क्रमांक : ९५४५४६३४५०, ९०४९३३१९९६ यावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

### आज अमरावतीत विहिंपचा बंद

**अमरावती :** जम्मू काश्मिर येथील पहलगाम येथे झालेल्या आतंकी हल्ल्याच्या निषेधार्थ अमरावती बंदची हाक विश्व हिंदू परिषदेने दिली आहे. जम्मू काश्मिर येथे पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मोठ्या प्रमाणात नागरिक मृत्यूमुखी पडली. या घटनेचा निषेध म्हणून अमरावती विश्व हिंदू परिषदेने उद्या, शुक्रवारी (दि.२५) रोजी राजकमल चौक येथून सकाळी १० वाजता विश्व हिंदू परिषदेच्या सदस्य दुकाने बंद करण्यासाठी व्यापाऱ्यांना आवाहन करणार आहेत. याबंदमध्ये नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

---

## मेळघाटातील शिवांग बनला 'आयएएस'

### प्राथमिक शिक्षण हरिसाल जि.प. शाळेतून तर विद्यालयीन शिक्षण कुसूमकोटमधून

अजिंक्य भारत । दीपक नागले



**हरिसाल, दि. २४ :** धारणी तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेले हरिसाल या खेड्यातील शिवांग अनिल तिवारी याने नुकतीच आयएएस परीक्षा उत्तीर्ण केली. शिवांग याची आई संजू अनिल तिवारी, त्याचे मोठे वडील जयप्रकाश तिवारी यांचे स्वप्न होते की मुलगा यूपीएससी पास होऊन आयएएस ऑफिसर व्हावा. यासाठी आपल्या मुलाला सुरुवातीपासूनच अतिदुर्गम भागात असलेल्या घरात शैक्षणिक वातावरणाची निर्मिती केली. शिवांगला हरिसाल येथील जिल्हा परिषद शाळेत वर्ग १ ते ७ पर्यंत शिक्षण देण्यासाठी आईने शाळेत घातले होते. यानंतर शिवांगने धारणी तालुक्यातील कुसूमकोट येथील मोनफोर्ट इंग्लिश मिडियम शाळेत पुढील शिक्षणासाठी दाखल केले. या शाळेतून त्याने चांगल्या गुणांनी एसएससी परीक्षेत यश मिळविले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी अमरावती येथील महाविद्यालयात प्रवेश घेतला. पदवीधर झाल्यानंतर शिवांगने आपली आई व घरातील मोठ्या मंडळीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांचे वेध लागले होते. यासाठी पूरेपूर प्रयत्न करीत अभ्यास करून यूपीएससी परीक्षेत यश मिळविले आज तो आयएएस ऑफिसर होऊन त्याने आपल्या कुटुंबियांचे स्वप्न पूर्ण केले. यामुळे त्याचे वडील अनिल तिवारी व जयप्रकाश तिवारी, त्याची आई संजू अनिल तिवारी यांनी शिवांगचे अभिनंदन केले.

## सचिव, सरपंचच शाळेचा विकास करु शकतात-महापात्र

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. २४ :** पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत लोणी टाकळी चे ग्रामपंचायत सरपंच, सचिव यांनी ज्या पद्धतीने शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल त्यांचे माननीय संचिता महापात्र मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. लोणीचे सरपंच सौ प्रतिक्षा आखरे व श्री निलेश वाघ ग्रामपंचायत अधिकारी यांच्या नियोजनामुळे शाळेला उत्कृष्ट दर्जाची टेबल खुर्ची , मुलींचे शौचालय बांधून देण्यात आले. शौचालयामध्ये कमोड सीट, बेसिन तसेच सतत २४ तास पाणी पुरवठा देण्यात आला. प्रवीण खांडेकर विस्तार अधिकारी शिक्षण यांनी १९ एप्रिल ला शाळेला भेट दिली. त्यावेळेस सर्व वर्गाची गुणवत्तेबद्दल सर्व शिक्षकांचे कौतुक केले व निरीक्षण करताना त्यांना नवीन बांधलेल्या शौचालयाकडे लक्ष गेले त्यांनी सरपंच तथा सचिव यांचे भरभरून कौतुक केले. शालेय शौचालय नागरी सुविधा निधी २०२४-२५अंतर्गत ३, लक्ष रू काम आहे. त्यामध्ये १०%लोक वर्गणी गावा मधून जमा केली ३०००० /- रू पूर्ण काम ३३०००० /-रू ग्राम पंचायत १५ वा वित्त अंतर्गत आरोग्य, शिक्षण, उपजीविका अंतर्गत लाकडी टेबल १०नग. ग्रामपंचायत स्व निधी १०% म. बा. क अंतर्गत १०खुर्ची देण्यात आल्यात.यावेळी डॉक्टर अरविंद मोहरे शिक्षणाधिकारी प्राथमिक, श्री . बुद्धभूषण सोनवणे उपशिक्षणाधिकारी प्राथमिक , सौ कल्पना वानखडे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर तसेच डायटचे अधिव्याख्याता सर्व पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. यावेळी श्री. धीरज धावडे सहाय्यक शिक्षक तथा प्रभारी मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा लोणी यांनी आज पर्यंत ग्रामपंचायतने शाळेला केलेल्या आर्थिक सहाय्याबद्दल आभार व्यक्त केलेत.

## हत्येतील दोन आरोपींना अटक

### सीपीच्या स्पेशल स्कॉडची कारवाई



अजिंक्य भारत । साहेबराव राऊत

**अंजनगावबारी, दि. २४ :** बडनेरा पोलिस ठाण्यांतर्गत येत असलेल्या कृष्णानगर तपोवन येथील एका ३४ वर्षिय युवकाची हत्या करण्यात आली होती. पोलिसांनी हत्येतील दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. फिर्यादी बबिता महेंद्रसिंग नाईक, रा. कृष्णानगर तपोवन यांचा मुलगा मृतक रोषण महेंद्रसिंग नाईक, ३४, याला मारहाण करून इर्विन रुग्णालयात नेले असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून फिर्यादी व त्यांचा मोठा मुलगा हे दोघे इर्विन रुग्णालयात पोहचले. त्याच्या अंगावर जखमा होत्या. आरोपीने पुरावा
नष्ट करण्यासाठी बराच वेळ पर्यंत घासत नेले होते. त्यामुळे संशय आल्याने बबिता नाईक यांनी पोलिसात तक्रार केली. बडनेरा येथील गुह्याची गांभीर्य ओळखून घटनास्थळावर पोलिस आयुक्तांच्या स्पेशल स्कॉडने याबाबत माहिती घेतली. यावरून मिळालेल्या माहितीवरून आरोपी रवी गंगाधर वानखडे ३५, रा. उतखेडपार्डी, दिनेश बंडू कुऱ्हाडकर, २६, रा. उतखेडपार्डी यांनी मृतकाचा खून केल्याचे समजल्याने स्कॉडच्या पोलिसांनी अंजनगाव बारी परिसरातून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. आरोपी रवी वानखडे याला गुन्हा करण्याचे कारण विचारले असता माझा व मृतकाच्या बहिनीचा आंतरजातीय विवाह आहे. तो विवाह मृतकाला पटत नव्हता तमुळे मृतकाचे व आरोपी रवी वानखडे याचे नेहमी वाद होत होते.
आरोपी दिनेश कुऱ्हाडकर याने पूर्व नियोजित पॅन करून रोषण नाईक यास दारू पाजून खुन केल्याचे सांगितले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद रेड्डी, सागर पाटील, गणेश शिंदे, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक आसाराम चोरमले, सिमा दाताळकर, युसूफ सौदागर, छोटेलाल यादव संजय भारसागळे नईम बेग आशिष डवले, रंजीत गावंडे रुपेश काळे, सुरज गाडे यांनी केली आहे.

## १७ संचालकांना शोकाज नोटीस

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २४ :** बाजार समितीच्या व्यवस्थापनाने ४४ लाखांची विद्युत निविदा सफाई कंत्राट, पुर्ननियुक्त्यांचे प्रकरण चांगलेच तापत आहे. या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी सभापतीसह १७ संचालकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. बाजार समिती कारभाराविरोधात शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रकाश साबळे, सचिन शेखर अवघड, उपाध्यक्ष महेश महिंगे, कोषाध्यक्ष राहुल तायडे यांनी शासन व प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. या बाबत चौकशी समितीचा अहवाल अभियाप्रायामध्ये ४४ लाखाची ई-निविदा व साफसफाई कंत्राट खर्चनिधीमध्ये चौकशी अधिकारी सचिन पतिंगे, सुशिल ठोके यांनी नियमबाह्यय प्रकार असल्याचे व्यक्त केले होते.चौकशी अहवाल अभिप्राय विरोधात बाजार समितीचा स्थगिती आदेश १३ मार्चला पणन संचालकांनी रद्द ठरविला. १७ संचालकांना ६ मे पर्यंत लेखी खुलासा सादर करावा लागेल, अशी माहिती जिल्हा उपनिबंधकांनी दिली आहे.

## मोर्शी तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मोर्शी, दि. २४ :** मोर्शी तालुक्यातील ग्रामपंचायतच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची प्रक्रिया तहसील कार्यालयाच्या सभागृहात करण्यात आली. यामध्ये तालुक्यातील एकूण ६७ ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार, तहसीलदार विनोद वानखडे, अविनाश हाडोळे, राजकुमार इंगळे, कविता पाटील यांच्या उपस्थितीत होते. ग्रामपंचायत मनिमपुर सर्वसाधारण महिला, गोराळा नामाप्र महिला, दाभेरी नामाप्र, कोळविहीर सर्वसाधारण, भाईपूर सर्वसाधारण महिला, चिखलसावंगी नामाप्र, सावरखेड सर्वसाधारण, मंगरूळ सर्वसाधारण, पातुर सर्वसाधारण महिला, शिरुळ सर्वसाधारण महिला, आष्टगाव नामाप्र, घोडगव्हाण सर्वसाधारण महिला, आखतवाडा अनुसूचित जमाती महिला,विष्णूरा सर्वसाधारण, लाडकी सर्वसाधारण महिला, उमरखेड सर्वसाधारण, चिंचोली गवळी सर्वसाधारण, वाघोली अनुसूचित जमाती महिला, अडगाव सर्वसाधारण, ऊदखेड नामाप्र महिला, तरोडा सर्वसाधारण, पिंपळखुटा लहान नामाप्र, पाळा नामाप्र महिला, भिलापूर सर्वसाधारण, काटपुर सर्वसाधारण महिला, विचोरी सर्वसाधारण महिला, लेहगाव सर्वसाधारण महिला, दापोरी सर्वसाधारण महिला, भांबोरा सर्वसाधारण महिला, डोमक नामप्र महिला, रिद्धपूर सर्वसाधारण, शिरखेड नामाप्र महिला, येवती सर्वसाधारण, खोपडा नामाप्र महिला, काटपुर सर्वसाधारण, तळेगाव नामाप्र महिला, शिरजगाव सर्वसाधारण महिला,वऱ्हा अनुसूचित जमाती,तळणी नामाप्र महिला, येरला नामाप्र, आस्टालि सर्वसाधारण, कवठाळ सर्वसाधारण महिला, दुर्गवाडा अनुसूचित जमाती, शिरलस नामाप्र, पोरगव्हान अनुसूचित जमाती महिला, धामणगाव नामाप्र, निंभी अनुसूचित जाती, सिंभोरा अनुसूचित जाती महिला, खेड अनुसूचित जाती, ब्राह्मणवाडा अनुसूचित जाती महिला, यावली अनुसूचित जाती महिला, राजूरवाडी अनुसूचित जाती महिला, बेलोना अनुसूचित जाती, रोहनखेड अनुसूचित जाती, नेरपिंगळाई अनुसूचित जाती महिला, पिंपळखुटा मोठा अनुसूचित जाती महिला, नया वाठोडा अनुसूचित जाती, पारडी सर्वसाधारण, मायवाडी सर्वसाधारण महिला, लिहिदा सर्वसाधारण, हिवरखेड अनुसूचित जाती महिला, खानापूर अनुसूचित जमाती, नशीरपूर महिला, अंबाडा महिला, बऱ्हाणपूर सर्वसाधारण महिला, धानोरा सर्वसाधारण, गणेशपुर सर्वसाधारण अशा प्रकारचे आरक्षण घोषित करण्यात आले.

## शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी तिवसा तालुका काँग्रेस आक्रमक

### खासदारांच्या व माजी मंत्र्यांच्या उपस्थितीत तहसीलदारांना दिले निवेदन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तिवसा, दि. २४ :** तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात दिवसा तालुका काँग्रेस कमिटी आक्रमक झाल्याचे चित्र तिवसा तहसील परिसरात दिसून आले. अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंतराव वानखडे व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रचंड उन्हाचे तापमान असताना सुद्धा शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निदर्शने देऊन निषेध केला.
या आंदोलनाच्या मागचा उद्देश असा की शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव द्यावा त्याचप्रमाणे निवडणुकीत आश्वासन देऊन सुद्धा महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी केली नाही, त्यामुळे सरकारने कुठलेही कारण न सांगता तातडीने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करावी, नियमित कर्ज भरणरे शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित असल्याचे दिसून येत असून त्याला अनेक महिन्यांचा कालावधी उलटला आहे त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रोत्साहन अनुदान तातडीने त्यांच्या खात्यात जमा करावे.
वर्ष २०२४ व २०२५ सोयाबीन पिकाच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी सोयाबीन तूर कापूस चना या उत्पादनाला चांगला भाव नसल्याने भावांतर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान द्यावे शेतकऱ्यांना त्वरित पीक विमा रक्कम द्यावी. कृषी पंपाकरिता रात्री ऐवजी दिवसाबीज पुरवठ्याची घोषणा निवडणुकीच्या वेळेस महायुतीच्या नेत्यांनी केली होती ती पूर्ण करावी तसेच दिवसा तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आंब्या बहाराची फळगड झाली असून उच्च तापमानामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्याचप्रमाणे तालुक्यातील अनेक पानंद रस्ते मंजुरा दिन असून पावसाळ्यापूर्वी ती कामे तातडीने पूर्ण करावी, तसेच खचलेल्या कॅनलची व पाटचऱ्यांची दुरुस्ती करून शेतकऱ्यांच्या समस्यांना न्याय द्यावा अन्यथा एक मे महाराष्ट्र दिनापासून दिवसा तालुका काँग्रेस व शहर काँग्रेस कमिटी आक्रमक आंदोलन करण्याचा इशारा यावेळी शासनाला तहसीलदार तिवसा यांचे मार्फत निवेदन देऊन करण्यात आला.




यावेळी खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष, नगरसेवक वैभव स. वानखडे, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष दिलीप काळबांडे, शहराध्यक्ष सेतू उर्फ श्रीराम देशमुख, नगराध्यक्ष प्रतिभा गौरखेडे, उपाध्यक्ष प्रिया विघ्ने, सुनिता अळसपुरे शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सुनील बाखडे, शहर महिला कॉग्रेस अध्यक्ष रुपाली काळे, माजी सभापती कल्पना दिवे,माजी सभापती शिल्पा हांडे, बाजार समिती सभापती रवी राऊत, खरेदी-विक्री अध्यक्ष सुरेशराव मेटकर, प्रदेश सचिव रितेश पांडव, युवक अध्यक्ष लोकेश केने, संदीप आमले, किसन मुंदाने मुकुंद पुनसे भारत ढोणे, दिवाकर भुरभुरे, प्रणव गौरखेडे,योगेश वानखडे अतुल खुळे, सतीश पोजगे, मोहन वानखडे, शरद वानखडे, अब्दुल सत्तार शहजाद पटेल, धर्मराज खडसे, दीपक सावरकर प्रमोद वानखडे, अमर वानखडे नितीन अर्डक दिलीप वानखडे वृंदा काळमेघ शुभांगी बोराळकर, अंकुश देशमुख स्वप्नील गंधे, रवी माथुरकर, दीपक पावडे, अक्षय यावले, राजू राऊत,विश्वजीत बाखडे, प्रीती भुरभुरे, हरिदास भगत अंकुश राठोड, राहुल राठोड नरेश लांडगे सुनील राऊत हरिदास भगत, गजानन भोंबे प्रद्युम पाटील,अक्षय पवार वैभव ढवळे अनिकेत प्रधान ✻आकाश मकेश्वर नंदू गोहत्रे गजानन चर्जन, दीपक पडोळकर, बंटी माहोरे सौरभ महल्ले, अतुल गवड, आशिष ताथोडे विशाल शापामोहन सुरज चव्हाण वृषभ वानरे वैभव काकडे, गजानन तडस ,अंकुश प्रधान, सचिन वानखडे अनिकेत प्रधान आकाश मकेश्वर, धीरज ठाकरे सागर राऊत व तीवसा तालुक्यातील सरपंच उपसरपंच स्थानिक स्वराज्य संस्था व सहकार क्षेत्रातील पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

## तिवसा नगर पंचायत पोखरली भ्रष्टाचाराने

### नगरसेविका सीमा खाकसेंचा काँग्रेसला घरचा अहेर, प्रशासनाचा आंधळेपणा!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तिवसा, दि. २४ :** स्थानिक तिवसा नगर पंचायतचे कारभाराबाबत काँग्रेस पक्षाची सत्ता असताना आपल्याच नगरसेवकांकडून एकामागून एक फटका देत असून आज झालेल्या काँग्रेस पक्षा चे नगर सेविका कडून अनेक कामात लाखो रूपयाचा भ्रष्टाचार होत असल्याचे बिंग उघड करत तीवस्याची नगर पंचायत ही भ्रष्टाचाराचे कुराणात चरत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेतून प्रभाग क्रमांक ८ चे काँग्रेस नगरसेविका सीमा आशिष खाकसे यांनी केला आहे. तिवसा विश्राम गृह येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषद मध्ये त्यांनी नगर पंचायत मधील कामकाजात भ्रष्टाचाराचे गोड बंगाल असल्याचे म्हंटले आहे यामध्ये अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत वन उद्यान यावर प्रभाग क्रमांक १७.मध्ये २९ लक्ष रुपये, प्रभाग क्रमांक १६,१४ मध्ये प्रत्येकी २४लक्ष तर प्रभाग क्रमांक ४ मध्ये १९ लक्ष रुपये असे कोटी रुपये खर्ची घातले येथे जाळीचे कंपाउंड , अँगल ,पेविंग बॉक्स, तेही निष्कृष्ट दर्जाचे करण्यात आले या वन उद्यानाचा कुठलाही उपयोग नाही केवळ पैशाचा अपव्यय कर्ण्यात आला असून यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला



आहे प्रभाग क्रमांक १७, १६ ,१४ या जागेचा फेरफार नगर पंचायत चे नावावर अद्यापही नसल्याने यावर निधी कसा खर्ची घातला असा.प्रश्न देखील नगर सेविका सीमा खाकसे यांनी उपस्थित केला त्याच प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन मध्ये प्रचंड प्रमाणात घोळ करण्यात येत असून १ कोटी ४० लक्ष रुपये हा कंत्राट देण्यात आला असून सुद्धा घनकचरा कंत्राट कंपनी अंदाज पत्रकाप्रमने काम करीत नाही ,कचरा गाडीचा काटा वजन ८ फेब्रुवारी पर्यंत केला नाही गरजेपेक्षा अपुरा मजूर परवठा केला जातो खत निर्मिती चे उद्दिष्ट पूर्तता होत नाही भ्रष्टाचाराला खतपाणी घालून मलिदा वसूल करण्याचा गोरख धंदा घनकचरा कचरा कंत्राट कंपनीने चालवीला आहे तिवसा नगर पंचायत चे वतीने मासिक सभेत विषय सूचित न ठेवता तिवसा शहरात २१ दिशादर्शक फलक लावण्यात आले असून त्याची प्रत्येकी किंमत १५४६० रुपये लावण्यात आली असून प्रत्यक्ष किंमत मात्र १२५० रुपये दराप्रमाणे असल्याचे पुढे आले फलक निदर्षणाप्रमाने लावण्यात न येता थातुर मातुर लावण्यात येऊन यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाल्याच निदर्शनात आले असल्याचे दिसत आहे. त्याच प्रमाणे प्रभाग क्रमांक १२ मध्ये चिंतामणी सभागृह येथील रेन वॉटर हार्वेस्टिंग चे दहा लक्ष रुपयाची कामाची माहिती देण्यात आली नाही. प्रभाग क्रमांक ८ मधील पंचशील व्यायाम प्रसारक मंडळ बौद्ध विहार नोटरी , पेपरला जाहीरनामा प्रसिद्ध कुणाचाही आक्षेप नसताना सुद्धा हेतू परस्पर फेरफार करण्यात आला नाही ही बाब अत्यंत खेद जनक असून बौद्ध विहारासाठी काही नगर सेवकांचा विरोध होत असल्याचं दुःख देखील नगर सेविका सीमा खाकसे यांनी व्यक्त केले. तिवसा नगर पंचायत मधील अनेक कामात भ्रष्टाचाराचे गोड बंगाल असून याची दाद आम्ही जिल्हाधिकारी अमरावती तथा वरिष्ठ पातळीवर मागू व अन्यायाचे विरोधात आवाज उठवू असा इशारा सुद्धा आजच्या झालेल्या पत्रकार परिषदेत प्रभाग क्रमांक ८ चे नगर सेविका सीमा आशिष खाकसे यांनी दिला.

## अध्यक्ष, उपाध्यक्षांकडून आरोपाचे खंडन

### वैयक्तिक स्वार्थ व राजकीय हेतूने सीमा खाकसे यांचे बिनबुडाचे आरोप!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**तिवसा, दि. २४ :** स्थानिक नगर पंचायत मधील अनोगदी कारभार तसेच होत असलेल्या निधीचा अपव्यय व भ्रष्टाचाराचे आरोप तिवसा नगर पंचायत चे नगरसेविका सौ सीमा आशिष खाकसे यांनी पत्रकार परिषदेतून केले होते त्यामुळे त्यांनी केलेल्या आरोपाचे खंडन तिवसा नगर पंचायतचे नगराध्यक्ष सौ प्रतिभा वसंत गौरखेडे व उपाध्यक्ष प्रिया नरेंद्र विघ्ने यांनी मंगळवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले. नगर सेविका यांनी केलेले आरोप. पूर्णपणे तथ्यहीन, व बिनबुडाचे असल्याचे सांगून त्यांनी नगरपंचायत ला बदनाम करण्याच कटकारस्थान चालविले असून त्यामागे त्यांचा वयक्तिक स्वार्थ असून राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगितले आहे. दिशादर्शक फलक, प्रभाग क्रमांक ४,१४,१६,१७ मधील उद्यान, घन कचरा व्यवस्थापन, रेन वॉटर हार्वेस्टिंग बुद्ध विहाराचा फेरफार यावर सीमा खाकसे यांनी केलेले आरोप हे. तिवसा शहराची बदनामी करण्याच काम त्या करीत असून केलेले आरोप हे धाद्यात खोटे असून त्याबाबतचे पुरावे आम्ही सादर करणार आहे. त्यांचे प्रभागात १३ लक्ष खर्च करून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार उभारले आहे तरी मात्र त्यांनी लोकसभा निवडणुकीत खा.बळवंत वानखडे व विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री ॲड यशोमती ठाकूर यांचे विरोधात जाऊन अपप्रचार करून प्रत्यक्षपणे विरोधकांना सहकार्य केल्याचा आरोप या पत्रकार परिषदेमध्ये नगरसेविका सीमा खाकसे यांच्यावर केला आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे देयक खोट्या तक्रारी करून प्रशासन व कंत्राटधारास वेठीस धरल्याने पाच महिन्याचे देयक अदा करण्यात आले नाही पर्यायाने शहरातील स्वच्छतेचे काम बंद केल्यास नागरिकांचे आरोग्य धोक्यात येईल हे काम बंद पाडण्याचा घाट नगर सेविका करीत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत उपस्थित नगर पंचायत पदाधिकारी यांनी केला. या पत्रकार परिषदे ला नगर पंचायत अध्यक्ष सौ प्रतिभा वसंतराव गौरखेडे, उपाध्यक्ष सौ प्रिया नरेंद्र विघ्ने, पाणी पुरवठा सभापती किसन मुंदाने, आरोग्य सभापती अमर वानखडे, माजी नगराध्यक्ष तथा स्वीकृत नगर सेवक वैभव वानखडे, माजी नगर सेवक नरेंद्र विघ्ने, शेतु देशमुख आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### मनोज सोळंके यांना लक्षवेध शिक्षक पुरस्कार



**चांदूरबाजार :** नगरपरिषद विद्यालय चांदूर बाजारचे शिक्षक मनोज सोळंके यांना राज्यस्तरीय ''उत्कृष्ट लक्षवेध शिक्षक पुरस्कारा ने सन्मानीत करण्यात आले. नगरपरिषद विद्यालय चांदूर बाजार येथील मनोज महादेवराव सोळंके यांना किल्ले पर्यटन महोत्सव सेवा संस्था, महाराष्ट्र यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लक्षवेध सामाजिक संमेलन २०२५ कोल्हापूर येथे या कार्यक्रमात ''उत्कृष्ट लक्षवेध शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र राज्य'' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेते माननीय स्वप्निल राजशेखर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन मनोज महादेवराव सोळंके यांना प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला चित्रपट सृष्टीतील अनेक दिग्गज आणि राज्यातील विविध भागांतून आलेले समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, व विचारवंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनोज सोळंके सरांचा हा सन्मान शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचा सातत्यपूर्ण उत्कृष्ट कार्य, विद्यार्थ्यांमधील सामाजिक भान जागृत करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि नवकल्पनांवर आधारित शिक्षणपद्धती याचे फलित आहे. त्यांच्या या गौरवामुळे चांदूर बाजार परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

### जनसुरक्षा विधेयकाविरोधात निवेदन



**तिवसा :** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वतीने आज तिवसा तहसिलदार कार्यालय येथे निदर्शने करून मुख्यमंत्री महाराष्ट्र यांना जनसुरक्षा विधेयकाचे विरोधात निवेदन सादर करण्यात आले. तहसिलदार कचेरीवर भर दुपारी ३वाजता जनसुरक्षा विधेयकाचे विरोधात जोरदार नारेबाजी करून निषेध नोंदवीण्यात आला. आज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वतीने संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन सुरू असतांना तिवसा तहसिल कचेरीवरील आंदोलनाचा हा एक भाग होता या आंदोलनाचे नेतृत्व माकपचे तालुका सेक्रटरी दिलीप शापामोहन, महादेव गारपवार यांनी केले. मोहीनी शापामोहन, अजय गारपवार ,या आंदोलनाचा मुख्य प्रश्न जनसुरक्षा विधेयक काय आहे त्याचे विपरीत होणारे सामान्य जनतेवर परीणाम याची माहीती आपल्या भाषणातून दिलीप शापामोहन व महादेव गारपवार यांनी उपस्थीत आंदोलन कर्त्यांना दिली. सुभाष खांडेकर, लता पापणकर, पुंडलीक पापणकर, अशोक राऊत, बेबी सुरजुसे, सिद्धार्थ धोटे, शोभा गोंडाने, प्रफुल निकाळजे, कैलास डोफे अशा अनेकांचा सहभाग होतो. शेवटी लालबावटा जिंदाबादचे घोषनेत आंदोलन संपवीण्यात आले.

### महात्मा फुले महामंडळात तक्रार निवारण दिन

**अमरावती :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कार्यालयात तक्रार निवारण दिन घेण्यात येणार आहे. नागरिकांसाठी महिन्यांच्या पहिल्या सोमवारी सकाळी ११ ते १२.३० आणि दुपारी १ ते २.३० वाजेपर्यंत तक्रारी ऐकूण घेण्यात येणार आहे. नागरिकांना त्यांच्या प्रलंबित कामाच्या तक्रारी मांडावयाच्या असल्यास तक्रार अर्जासह महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय, अमरावती येथे स्वत: उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक माधुरी अवघाते यांनी केले आहे.

## नर्सरी, गुणवत्ता आणि मार्केटिंगमधून संत्रा उत्पादकांचा उत्कर्ष

### संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या कार्यशाळेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा विश्वास

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**चांदूरबाजार, दि. २४ :** उत्तम नर्सरी, संत्र्याची गुणवत्ता आणि मार्केटिंग या त्रिसूत्रीतून विदर्भातील शेतकऱ्यांना उत्पादन आणि उत्पन्न वाढविणे शक्य आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. ॲग्रोव्हिजन फाउंडेशनच्या वतीने वनामती सभागृह येथे आयोजित संत्रा उत्पादकांच्या कार्यशाळेत त्यांनी शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, आमदार डॉ. आशीष देशमुख, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार दादाराव केचे, आमदार सुमित वानखेडे, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार प्रताप अडसड, आमदार श्याम खोडे, आमदार उमेश यावलकर, सीआरआरआयचे संचालक डॉ. घोष, ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ. सी.डी. मायी, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर, आनंदराव राऊत, सुधीर दिवे महा ऑरेंज व्यवस्थापक श्रीधर ठाकरे ,मनोज जंवजाळ, राकेश मानकर, पुष्पक खापरे, विशाल लंगोटे आदींची याप्रसंगी उपस्थिती होती. या कार्यशाळेत विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमधून संत्रा उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते.

श्री.गडकरी म्हणाले, 'स्पेनच्या व्हॅलेन्शियामध्ये टँगो संत्र्याचे एकरी उत्पन्न २५ ते ३० टन आहे. विदर्भातील संत्र्याचे एकरी उत्पन्न चार ते सहा टन आहे. हे उत्पन्न २० टनच्या वर जाईल, असा निर्धार केला पाहिजे. त्याचा विदर्भावर मोठा सकारात्मक आर्थिक प्रभाव पडेल.' 'शेतकऱ्यांपुढे अडचणी आणि समस्या खूप आहेत. त्यातून बाहेर पडण्यासाठी सारेच लोक प्रयत्न करत आहेत. आपण अपयशातून शिकले पाहिजे. जेवढे खोलात जाऊन अभ्यास करू, तेवढ्या नव्या गोष्टी शिकायला मिळतील. हे सारे प्रयत्न करण्यामागे शेतकरी समृद्ध झाला पाहिजे, उत्पन्न आणि उत्पादन वाढले पाहिजे हा उद्देश आहे. विदर्भातील शेतकरी जिज्ञासू आहेत. अभ्यासू आहेत. त्यांची परिस्थिती नक्की बदलेल. फक्त शेतकऱ्याला योग्य मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे, असही ते म्हणाले. 'शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी' असं आपण म्हणतो. पण बीज उत्तम नसेल तर फळ कसे गोड येणार? उत्तम नर्सरी आणि रोगमुक्त रोपे अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यासाठी नर्सरी अपग्रेड करण्याची आवश्यकता आहे. स्पेनमध्ये एका हेक्टरमध्ये संत्र्याची ८२० झाडं असतात आणि आपल्याकडे ३४० झाडं असतात. त्यांनी झाडे वाढवलीच. पण उत्पादन वाढवताना पॅकेजिंग आणि मार्केटिंगचाही विचार केला. त्याच आधारावर व्हॅलेन्शियाचा संत्रा जगभर पोहोचला. व्यावसायिक दृष्टिकोन, गुणवत्ता, उत्तम नर्सरी, मार्केटिंग त्यातून आपल्यालाही हे शक्य आहे. पण आपल्यापुढे असलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रयोगांमधूनच मिळतील,' असेही ना. श्री. गडकरी म्हणाले. ऑरगॅनिक खतांचा वापर वाढविण्याची आवश्यकता आहे. शेतात गांडुळ खत, ऑरगॅनिक खत, कंपोस्ट खत तयार केले पाहिजे. जमिनीतील ऑरगॅनिक कार्बन ०.७५ किंवा ०.८० झाला तर विदर्भातील शेतकरी समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास ना. श्री. गडकरी यांनी व्यक्त केला. पाण्याचा नियोजनबद्ध वापर करण्यावर भर द्यावा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला. दोन किंवा पाच एकर शेती असलेले शेतकरी मोठे प्रयोग करू शकत नाही. फार्मर प्रोड्युस कंपनी सुरू केली तर तेथून कमी खर्चात भाड्याने यंत्र-सामग्री उपलब्ध होऊ शकते, असा उपाय देखील त्यांनी सूचवला.

## खोलापूर परिसरात ४५ डिग्री सेल्सिअस तापमानाचा लोकांनी घेतला धसका

### बाजारपेठेत शुकशुकाट तर शेतीची कामे ठप्प

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**खोलापूर, दि. २४ :** सूर्याच्या तडपत्या तापमानामुळे ४५ डिग्री सेल्सिअस तापमानात वाढ झाल्याने वाढत्या तापमानाचा धक्का नागरिकांमध्ये दिसून येते सकाळी नऊ वाजल्यापासूनच उन्हाचा करंट शरीराला बाधित करीत असून दुपार १२ नंतर लोकांचे ये जा थांबले आहे कडक उन्हाचा व उष्ण उखाड्यापासून पंखा, कुलर च्या साह्याने नागरिक बचाव करत आहे. वाढते तापमान व उष्ण उखाड्यामुळे खोलापुर बाजारपेठेत लोकांचा शुकशुकाट असून व्यवसाय ठप्प झाले आहे झाले. आरोग्याची खबरदारी म्हणून नागरिक घरी थांबणे पसंत करीत आहेत. सध्या लग्नसराईचे दिवस असून लग्न समारंभात व विविध छोटे-मोठे समारंभांना जाण्यास लोकांनी वाढत्या तापमानामुळे ब्रेक लावला आहे. तर ग्रामीण भागातील शेतमजुर व शेतकऱ्यांचे शेती कामे थांबले आहे.

## पूर्णानगरमध्ये पुन्हा पाच वर्षे महिलाराज

अजिंक्य भारत । संजय सरवटकर



**पूर्णानगर, दि. २४ :** भातकुली तालुक्यात राजकीयदृष्ट्या अतिशय महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या पूर्णानगर मधे पुन्हा सन २०२५ - २०३० या कालावधी करिता नागरिकांचा मागास प्रवर्ग ( महिला ) करिता राखीव झाल्याने नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत.मागील टर्म मधे ही अनुसूचित जाती महिला वर्गा करिता राखीव असल्याने सध्या महिलाराज च्या रूपात सरपंच पदावर स. जोत्सनाताई गहरवाल हया कार्यरत आहेत. त्या जनतेतून निवडून आल्या होत्या हे विशेष उल्लेखनीय आहे. त्यांचा आणखी अडीच वर्षाचा कालावधी बाकी आहे. काल भातकुली तालुक्याचे आरक्षणाचे रोस्टर उघडणार असल्याने तालुक्यातील सर्व राजकीय पुढऱ्यांचे याकडे लक्ष लागले होते. तालुक्यात एकूण ग्रामपंचायतची संख्या ४८ असून यात अनुसूचित जाती ११, अनुसूचित जमाती ३, मागासवर्गीय प्रवर्ग ९ तर सर्वसाधारण प्रवर्गकारिता २५ अशाप्रकारे आरक्षित करण्यात आले आहे. पूर्णानगरात मात्र यावर्षी मागासवर्गीय महिला वर्गा करिता सरपंच पद आरक्षित झाल्याने येथील ओबीसी वर्गात चर्चेला ऊत आल्याचे दिसून येत आहे. या गावात मतदारांमधे माळी, मुस्लिम व बौद्ध यांची संख्या जास्त असून प्रत्येक निवडणुकीत बौद्ध मतदार निर्णायक असल्यामुळे त्यांच्यावर अनेकांची भिस्त अवलंबून असले तरी पुढील निवडणुकीत जनते चा कल कुणाकडे जाईल याकडे आतापासूनच पुढ्यार्‍यांचे लक्ष लागले आहे.

## विद्यापीठात शासनाचा आदिवासी अध्यासन केंद्र स्थापनेचा निर्णय

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. २४ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र स्थापन करण्याचा महाराष्ट्र शासनाने नुकताच निर्णय घेऊन याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रात आदिवासी बहुल क्षेत्र मोठा प्रमाणावर आहे. या परिक्षेत्रातील आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात, उच्च शिक्षणाच्या संधीचा लाभ मिळावा, आदिवासी विद्याथ्र्यांसाठी स्वतंत्र सुविधा व त्याव्दारे आदिवासी विद्याथ्र्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, याकरिता कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठामध्ये आदिवासी अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविला होता. त्यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून या केंद्रास शासनाने मंजुरी दिली आहे. त्याबद्दल त्यांचे आदिवासी शिष्टमंडळाने भेटून अभिनंदन केले.

महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियात नमूद केलेल्या उद्दिष्टांव्यतिरिक्त मानववंशशास्त्र अभ्यास माडिया, गोंडी, बैगा, कोलम इ. आदिवासी भाषा, संस्कृती व जीवनशैली जतन, आदिवासी ज्ञान, कला, संस्कृती, परंपरा, रितिरिवाज, उपजिविका अभ्यास आणि आर्थिक सक्षमीकरण जसे, पर्यावरणीय पर्यटन, वन पर्यटन, जलमार्ग व्यवस्थापन, जंगलांशी संबंधित धातूशास्त्र, कापड आणि त्याचे उत्पादन तंत्रज्ञान, औषधी वनस्पतींचा अभ्यास, खनिजशास्त्र, आदिवासी विद्याथ्र्यांचे उच्च व तंत्र शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना दर्जे दार शिक्षणाची व्यवस्था करणे आणि त्याव्दारे त्यांना रोजगारक्षम बनविणे, याकरिता हे अध्यासन केंद्र स्थापन करण्यामागील उद्दिष्टे आहेत. या उद्दिष्टांबाबत अभ्यास व संशोधन या स्थापन होणा-या अध्यासन केंद्रात होणार आहे.

शासनाच्या विविध विभागांकडून राबविल्या जाणाऱ्या आदिवासी विकासासाठीच्या योजना व कार्यक्रमाचे मूल्यमापन, मूल्यांकन तसेच त्यासंबंधी धोरणात्मक शिफारसी करण्याची कार्यवाही संबंधित विभागाला या अध्यासन केंद्रामार्फत करावी लागणार आहे. या केंद्रासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई, जळगांव, नांदेड, अमरावती, गडचिरोली या विद्यापीठांचे कुलगुरू सदस्य असलेली समन्वय समिती गठित केली असून सदस्य सचिव उच्च व तंत्र शिक्षण संचालक असतील.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या प्रयत्नांमुळे विद्यापीठाला शासनाने आदिवासी अध्यासन केंद्र मंजूर केल्याबद्दल औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावतीचे माजी प्राचार्य श्री पुरुषोत्तम कुमरे, विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. मनिषा कोडापे, प्र-कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक श्री विठ्ठल मरापे, अभियंता श्री आकाश सोळंके, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावतीचे माजी अधीक्षक श्री भारत किनाके, विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राच्या कु. ज्योती गेडाम, महाविद्यालयीन विभागाच्या माधुरी सोळंके, परीक्षा विभागातील श्री निकेश भोसले यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्ह्यातील चौघांची 'यूपीएससी' परीक्षेत बाजी

## अदिबा अनम (रँक १४२), डॉ. जयकुमार आडे (रँक ३००), अभय देशमुख (रँक ७०४), मोहिनी खंदारे (८४४)

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ राजकुमार भीतकर

**यवतमाळ, दि. २४ :** केंद्रीय लोकसेवा आयोगाने २०२४ मध्ये घेतलेल्या सर्वोच्च नागरी परीक्षेत यवतमाळ जिल्ह्यातून चौघांनी बाजी मारली. अदिबा अनम (रँक १४२), डॉ. जयकुमार आडे (रँक ३००), अभय देशमुख (रँक ७०४) व मोहिनी खंदारे (८४४) या चौघांनी यंदा यवतमाळ जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे.


अदिबा अनम


डॉ. जयकुमार आडे


अभय देशमुख


मोहिनी खंदारे

यावर्षी केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्यांमध्ये सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी आहेत. अदिबा अनम ही ऑटोचालकाची मुलगी आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीने तिने हे यश मिळविले आहे. तर डॉ. जयकुमार आडे एका जिल्हा परिषद शिक्षकाचा मुलगा आहे. वैद्यकीय शिक्षण पूर्ण करीत असताना त्यांनी हे यश मिळविले. अभय देशमुख यवतमाळ येथील एकलव्यनगरातील रहिवासी असून तेही सामान्य परिवारातील आहेत. तर मोहिनी खंदारे हीदेखील शिक्षकाची मुलगी आहे. सध्या त्या गटशिक्षणाधिकारी म्हणून बुलडाणा जिल्ह्यात कार्यरत आहेत. त्यांचे आई-वडील दोघेही शिक्षक आहेत. त्यांचे बंधू विक्रांत खंदारे हे न्यायाधीश आहेत. त्या सर्वांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेतच झाले आहे. यशस्वी झालेले हे सर्व विद्यार्थी सामान्य कुटुंबातील, जिल्हा परिषद, नगर परिषदेच्या शाळेतूनच शिकलेले आहेत. परंतु, त्यांनी जिद्द व चिकाटी कायम ठेवत आपले ध्येय गाठले आहे. यंदाही यवतमाळ जिल्ह्यातून चार विद्यार्थी नागरी सेवेत गेले, ही अभिमानाची बाब आहे. तसा विचार केला तर यवतमाळ जिल्ह्यात स्पर्धा परीक्षेचे वातावरण नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, संघ लोकसेवा आयोगांच्या नागरी परीक्षा, जेईई, नीट आदी प्रवेश परीक्षांची तयारी करण्यासाठी यवतमाळात चांगले कोचिंग क्लासेस उपलब्ध नाहीत. अलीकडे काही कोचिंग क्लासेस यवतमाळात आले आहेत, परंतु, फॅकल्टी आणि रिझल्टची बोंब कायम आहे. त्यात यवतमाळ जिल्हा हा आदिवासीबहुल आणि शेतकरी आत्महत्येसाठी कुप्रसिद्ध आहे. शहरात स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देणाऱ्या शासकीय प्रशिक्षण संस्था नाहीत. 'यूपीएससी' आणि 'एमपीएससी'करिता विद्यार्थ्यांना शासनपुरस्कृत स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी नागपूर, अमरावती किंवा पुणे गाठावे लागते. यामागे येथील लोकप्रतिनिधींची उदासीनता हे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते. असे असले तरी स्पर्धा परीक्षेत यशाला गवसणी घालणाऱ्या विद्यार्थ्यांची गेल्या दहा वर्षांतील संख्या बघितली तर ती जिल्ह्याचा गौरव वाढविणारी आहे. या विद्यार्थ्यांनी मुंबई, पुणे, दिल्ली गाठूनच हे यश मिळविले आहे. हे सर्व विद्यार्थी श्रीमंताच्या घरचे नसून सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. कुणाचे वडील शेतकरी आहेत, शिक्षक आहेत, तर कुणाचे आटोचालक आहेत. केवळ जिद्द, अभ्यासातील सातत्य आणि ध्येयप्राप्तीचा नाद त्यांच्या यशाचे गमक आहे. गेल्या दशकात यवतमाळ जिल्ह्यात प्रत्येक वर्षी एकतरी विद्यार्थी यूपीएससी झाला आहे. अलीकडे ती संख्या प्रत्येक वर्षी तीन ते चार वर पोहोचली आहे. ही यवतमाळ जिल्ह्यासाठी फार अभिमानाची बाब आहे. जिल्हास्थळी नागरी स्पर्धा परीक्षेचे वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना यवतमाळातच अभ्यासाची सुविधा उपलब्ध झाली तर या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नक्कीच वाढेल. गेल्या दहा वर्षांत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे अनेक विद्यार्थी त्यांची प्रेरणा घेऊन नागरी सेवा परीक्षांची तयारी करताना दिसत आहे. जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब आहे.

### राज्यातील गुणवंतांचा मंत्रालयात सत्कार व्हावा!

**काँग्रेसचे नाना पटोले जेव्हा विधानसभेचे अध्यक्ष होते, त्यावर्षी यवतमाळातील चार विद्यार्थी यूपीएससी परीक्षेत यशस्वी झाले होते. याची दखल घेत काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार यांनी राज्यातील 'यूपीएससी'त यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा मंत्रालयात त्यांच्या आईवडिलांच्या उपस्थितीत सन्मान व्हावा, असा प्रस्ताव विधानसभाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे मांडला होता. त्यांची संकल्पना आवडल्याने तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधानसभा अध्यक्ष नाना पटोले व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील ७९ यूपीएससी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचा मंत्रालयात सन्मान केला. परंतु, त्यानंतर आलेल्या सरकारने ही परंपरा जपली नाही. अशा गुणवंत विद्यार्थ्यांना गौरव किमान जिल्हास्थळी जिल्हा प्रशासन व जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी करायला हवा, असे मतही देवानंद पवार यांनी व्यक्त केले.**

---

## घटना - घडामोडी




### यवतमाळ येथील नेताजी चौकात दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**यवतमाळ :** काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी येथील नेताजी चौकात नागरिक नुकतेच स्वयंस्फूर्तीने एकत्र आले. त्यांनी पाकिस्तान व दहशतवाद्यांविरोधात तीव्र संताप व्यक्त करत घोषणा दिल्या. 'भारत माता की जय', 'ईंट का जवाब पत्थर से' अशा घोषणा देत हल्ल्याचा निषेध करण्यात आला. निष्पाप पर्यटकांच्या मृत्यूबद्दल संवेदना व्यक्त करत, दहशतवाद्यांना धडा शिकवण्याची मागणी भारत सरकारकडे करण्यात आली. यावेळी माजी आमदार विजया धोटे, प्रतिभा फाउंडेशनच्या अध्यक्ष इंजि. प्रतिभा पवार, उपाध्यक्ष सुधा खडके, गणेश कोसळकर, गोलू कटारिया, अनुप तेलानी, वहीद खवानी, नेताजी चौक दुकानदार संघ व अनेक नागरिक उपस्थित होते.



### आर्णी येथे शिवसेना शिंदे गटाचा पहलगाम हल्ल्याविरोधात निषेध

**आर्णी :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे नागरिकांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा शिवसेना (शिंदे गट) आर्णी तालुका व शहराच्यावतीने येथील शिवनेरी चौकात तीव्र निषेध करण्यात आला. हल्लेखोरांवर कठोर कारवाईची मागणी यावेळी झाली. उपजिल्हा प्रमुख डॉ. विष्णू उकंडे यांनी पाकिस्तानकडून होत असलेल्या हल्ल्याचा निषेध केला. आंदोलनात शिवसैनिकांनी 'पाकिस्तान मुर्दाबाद'च्या घोषणा देत हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहिली. हल्ल्याच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली. यावेळी तालुका संघटक आश्विन जाधव, शहरप्रमुख श्याम ठाकरे, किसन राठोड, राजेश महेश्वरी, विनय राठोड, मारुती राठोड, राजू राठोड, सुनील ठाकूर यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.




### बाभूळगाव येथे पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ तहसीलदारांना निवेदन

**बाभूळगाव :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा शिवसेना (शिंदे गट) आर्णी तालुका व शहर शाखेतर्फे निषेध करण्यात आला. याबाबतचे निवेदन गुरुवारी (दि. २४) नायब तहसीलदारांना देण्यात आले. मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या या निवेदनात हल्लेखोर व सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत, हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली व नागरिकांना संरक्षण देण्याची मागणी केली. निवेदन नायब तहसीलदार यामीन सय्यद यांनी स्वीकारले. यावेळी उपजिल्हाप्रमुख सचिन महल्ले, प्रभारी तालुकाप्रमुख राजेंद्र पांडे, शहरप्रमुख प्रवीण लांजेकर, शेखर अर्जुने, नितीन महाल्गावे, विजय भेंडे, गजानन वानखडे, अपर्णा वानोडे, हेमलता काळे, विक्रम बऱ्हाणपूरे, शंतनू फुसे, आशिष गुप्ता आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

---

## पांढरकवडा येथे स्नेहमीलन सोहळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २३ :** येथील माजी शासकीय बहुउद्देशीय शाळेच्या ७९-८० मधील बारावीच्या बॅचचे तब्बल ४५ वर्षांनंतर 'क्षण आठवणींचे' स्नेहसंमेलन उत्साहात झाले. राहुल भवन येथे आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील जुने वर्गमित्र-मैत्रिणी मोठ्या आनंदाने सहभागी झाले होते.




कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवर बॅरिस्टर विनोद तिवारी, माजी उपसभापती विजय पाटील, कृषी शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद यादगिरवार, आणि डॉ. मंजुषा कुलकर्णी यांच्याहस्ते मा जगदंबेच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. सुरुवातीला दिवंगत शिक्षक प्रा. गुलाखे, प्रा. हरिश्चंद्र बेले, प्रा. लुतडे, प्रा. ठमके तसेच दिवंगत वर्गमित्र डॉ. संजय हिवरकर, मीरा देवी मुंजेकर, राजू चौधरी, चंद्राच नगराळे, तिरोडा सिडाम यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर परिचयाचा कार्यक्रम झाला. दुपारच्या सत्रात सेवानिवृत्तीनंतरच्या समस्यांवर जसे आरोग्य, मुलांचे प्लेसमेंट व विवाह, कृषी समस्यांवर गटचर्चा झाली. यात बॅरिस्टर विनोद तिवारी, डॉ. रमेश लिंगनवार, डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ. प्रमोद यादगिरवार, वनसंरक्षक सुनील पाटील, अरुण डोंगशनवार यांनी सक्रिय भाग घेत विचार मांडले. समाजाचे देणे लागतो या भावनेतून सत्कार्य करण्याचा संकल्प यावेळी सर्व उपस्थित ३० मित्रांनी केला.

---

## शिरपूरच्या माजी ठाणेदाराची चौकशी करा

### अमोल मांढरे यांचे आमरण उपोषण, असभ्य वर्तणुकीचा आरोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. २४ :** शिरपूरचे माजी ठाणेदार गजानन करेवाड यांच्या असभ्य वर्तणुकीच्या चौकशीसाठी नायगाव (बू) येथील अमोल मांढरे यांनी बुधवारपासून (दि. २३) शिरपूर पोलिस ठाण्यात आमरण उपोषण सुरू केले आहे. धमकीच्या तक्रारीवर चौकशीऐवजी करेवाड यांनी शिवीगाळ केल्याचा आरोप करीत, कारवाई होईपर्यंत उपोषणाचा इशारा मांढरे यांनी दिला आहे.

जिल्ह्यातील वणी तालुक्यातील नायगाव (बू) येथील रहिवासी अमोल नथ्थू मांढरे यांनी ही उपोषणाची घोषणा केली आहे. गावातील रामदास झित्रू नागपूरे आणि त्यांचे कुटुंबीय अनिल नागपूरे, मनोज नागपूरे, सुनील नागपूरे, संतोष नागपूरे, सीता नागपूरे, प्रिया बावणे, ज्योती नागपूरे व मंगला नागपूरे यांनी त्यांना फोनवरून तसेच गावातील तंटामुक्ती अध्यक्ष व इतर प्रतिष्ठित नागरिकांमार्फत जीवे मारण्याची धमकी दिली होती. या गंभीर प्रकाराबाबत उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या चौकशीकरिता मांढरे यांना शिरपूर पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले होते. मात्र, तेथे तत्कालीन ठाणेदार गजानन करेवाड यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी, त्यांनाच अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि अत्यंत असभ्य वर्तन केले, असा स्पष्ट आरोप अमोल मांढरे यांनी केला आहे. एका तक्रारदाराला पोलिस अधिकाऱ्यकडून मिळालेल्या या वागणुकीमुळे ते व्यथित झाले. या घटनेनंतर, मांढरे यांनी तत्कालीन ठाणेदार करेवाड यांच्यावर कारवाई व्हावी, यासाठी आपल्या वकिलामार्फत तसेच स्वतः अनेकदा राज्याच्या गृह मंत्रालयापर्यंत पत्रव्यवहार केला. मात्र, या घटनेला जवळपास दोन वर्षे उलटून गेली तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर त्यांनी गुरुवार (दि. २४) पासून शिरपूर पोलिस ठाण्यासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत गजानन करेवाड यांच्या वर्तणुकीची चौकशी होऊन योग्य कारवाई होत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, असे मांढरे यांनी म्हटले आहे. या उपोषणादरम्यान आपल्या जीवाला काही बरेवाईट झाल्या वणी तालुका व जिल्हा पोलिस प्रशासन पूर्णपणे जबाबदार असेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

---

## बाभूळगाव बाजार समिती 'स्मार्ट' रँकिंगमध्ये अव्वल!

### शेतकरी हिताच्या कार्यालयाला राज्यस्तरीय पोचपावती, राज्यात २७ व्या क्रमांकावर झेप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. २४ :** बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे बाभूळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने यवतमाळ जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. २०२३-२४ वर्षाच्या या राज्यस्तरीय वार्षिक क्रमवारीत बाभूळगाव बाजार समिती राज्यात २७ व्या स्थानी चमकली असून, सभापती दिनेश गुल्हाणे यांनी हे यश सर्वांच्या सहकार्याचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे.

पणन संचालनालयामार्फत २०२१-२२ पासून 'स्मार्ट' प्रकल्पांतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्याचे विविध निकषांवर मूल्यांकन केले जाते. बाभूळगाव बाजार समितीने शेतकरी हितासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांची आणि उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची तपशीलवार नोंद घेत २०० पैकी १५३ गुणांचा प्रस्ताव तालुकास्तरीय समितीला सादर केला होता. तालुका आणि जिल्हा स्तरावरील पडताळणीनंतर अंतिम मूल्यांकनात समितीला १३४ गुण प्राप्त झाले. हे गुण बाजार समितीच्या प्रभावी आणि पारदर्शक कारभाराचे द्योतक आहेत. समितीच्या या यशामागे मागील तीन दशकांपासून शेतकरी, अडते, व्यापारी, हमाल आणि कर्मचाऱ्यांसाठी सातत्याने उभारलेल्या पायाभूत सुविधांचा मोठा वाटा आहे. बाजार समितीने शेतकऱ्यांच्या गरजा ओळखून त्यांना केंद्रस्थानी ठेवूनच कामकाज केल्याचे सभापती दिनेश गुल्हाणे यांनी आवर्जून सांगितले. भविष्यातील आव्हाने आणि स्पर्धा लक्षात घेता, बाजार समितीच्या कामकाजात आणखी सुधारणा करून अव्वल स्थान टिकवून ठेवण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या यशाबद्दल चर्चा करण्यासाठी आणि पुढील दिशा ठरवण्यासाठी आयोजित बैठकीत उपसभापती डॉ. रमेश महानूर, संचालक नरेंद्र कॉबे, राजेंद्र पांडे, सतीश मानलवार, अमोल कापसे, ॲड. गजेंद्र कडुकार, बबनराव बोंबले, आशा ठाकरे, ज्योती गावंडे, अतुल राऊत, आशिष सोळंके, प्रवीण वाईकर, विवेक परडखे, प्रज्वल राऊत, रमेश बहाड, शेख अयुब शेख गुलाब, शेख फिरोज शेख छोटे आणि सचिव विलास गायकवाड उपस्थित होते.

### 'स्मार्ट' क्रमवारीत अव्वल

**बाळासाहेब ठाकरे (स्मार्ट) प्रकल्पाच्या सन २०२३-२४ क्रमवारीत बाभूळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने जिल्ह्यात पहिला, विभागात अकरावा, तर राज्यात ३०५ बाजार समित्यांमध्ये २७ वा क्रमांक मिळविला. पणन संचालनालयाने केलेल्या मूल्यांकनात समितीला एकूण १३४ गुण मिळाले. यात पायाभूत सुविधा (५३/८०), आर्थिक निकष (३४/३५), वैधानिक कामकाज (३५/५५) आणि इतर निकष (१२/३०) अशा विविध बाबींमधील कामगिरीचा समावेश आहे. हे गुण समितीच्या उत्कृष्ट कार्याची साक्ष देतात.**

---

## दारव्हा तालुक्यातील सरपंच पदांचे आरक्षण जाहीर

### अनेकांचा हिरमोड, तर काहींना संधी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बोरीअरब, दि. २४ :** दारव्हा तालुक्यातील ८६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी २० २५ ते २०३० या कालावधीचे आरक्षण बुधवारी (दि. २३) जाहीर झाले. उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी व तहसीलदार रवी काळे यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात ही सोडत काढण्यात आली.

आरक्षण सोडतीनुसार, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १२ जागा, तर अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ७ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) एकूण २३ जागा असून, त्यापैकी १२ जागा महिलांसाठी राखीव आहेत. खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या एकूण ४४ जागांपैकी निम्म्या म्हणजे २२ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या असून, उर्वरित २२ जागा सर्वसाधारण खुल्या राहतील. ही महत्वपूर्ण आरक्षण सोडत प्रक्रिया उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी आणि तहसीलदार रवी काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शांततेत पार पडली. या आरक्षणामुळे अनेक मातब्बर नेत्यांचा हिरमोड झाला, तर काही इच्छुकांना अनपेक्षित संधी मिळाल्याने त्यांचे स्वप्न रंगले आहे. सोडतीच्या वेळी विविध गावांतील सरपंच पदाचे इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे सत्याग्रह आंदोलन

### काँग्रेस कमिटीचा सत्याग्रह, प्रशासक राजवटीविरोधात तीव्र संताप; लोकशाही हक्कांचे हनन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** महाराष्ट्रामध्ये गेल्या तीन ते पाच वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सातत्याने पुढे ढकलल्या जात असल्याने जनतेच्या लोकशाही अधिकारांवर गदा येत असल्याची संतप्त भावना जोर धरू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत कार्यरत असलेल्या राजीव गांधी पंचायत राज संघटनेने यवतमाळ येथे राष्ट्रीय पंचायत राज दिनी सत्याग्रह आंदोलन करत सरकारवर जोरदार हल्ला चढवला.




राज्य सरकारने घटनाबाह्य पद्धतीने प्रशासकांची नियुक्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार हाती घेतला आहे. यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होत असून सामान्य नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग संपुष्टात येत आहे, असा गंभीर आरोप संघटनेने राष्ट्रपतींना दिलेल्या निवेदनात केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेवर घेणे संविधानाने बंधनकारक केले असतानाही, ओबीसी आरक्षणासंबंधीच्या न्यायालयीन प्रकरणांचा गैरवापर करून या निवडणुका हेतुपुरस्सर लांबवल्या जात आहेत, असेही संघटनेचे म्हणणे आहे. राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून यवतमाळात महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर हे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, तसेच माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनाही श्रद्धांजली वाहण्यात आली. या आंदोलनात माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी मंत्री वसंतराव पुरके, यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर आणि राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय ठाकरे यांनी पंचायत राज व्यवस्थेच्या महत्वावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष (अनु. जा.) संजय वानखडे, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख, उत्तमराव खंडारे, जिल्हाध्यक्ष राजू चांदेकर, संतोष बोरले, उषा दिवटे, विकी राऊत, पल्लवी रामटेके, ओम तिवारी, पंढरी पाटे, कॉम्रेड सचिन मनवर आणि सोशल मीडिया प्रमुख कृष्णा पूसनाके यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रशासक राज अमान्य!

**राज्य सरकारने प्रशासक नेमून स्थानिक संस्था चालवणे हे असंवैधानिक आहे. यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होऊन नागरिकांचा लोकशाहीतील सहभाग संपवला जात आहे. संविधानानुसार निवडणुका वेळेवर घेणे बंधनकारक असताना, ओबीसी आरक्षणाच्या न्यायालयीन प्रकरणांचा आधार घेत निवडणुका पुढे ढकलणे हा लोकशाही अधिकारांवर घाला आहे, असा स्पष्ट आरोप राजीव गांधी पंचायत राज संघटनेने राष्ट्रपतींना दिलेल्या निवेदनात केला आहे. प्रशासक राजवट तात्काळ संपुष्टात आणण्याची मागणी करण्यात आली आहे.**

# जिल्ह्यात पारा 44 अंशांवर

## उकाड्यात विजेचाही लपंडाव, उन्हाच्या तीव्रतेने नागरिक हैराण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** शहरात गुरुवारी, (दि. २४) उन्हाळ्यातील उच्चांकी ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. गेल्या २४ तासांत पाऱ्यात ५ अंशांची मोठी वाढ झाली असून, उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत गुरुवारी दुपारी ३.३० वाजता गेलेली वीज रात्री ८.१५ पर्यंत न आल्याने शहरातील नागरिक त्रस्त झाल्याचे दिसून आले.

शहरातील तापमानात सातत्याने वाढ होत असून, बुधवारी पाऱ्याने ४४ अंशांचा टप्पा गाठला. मंगळवारच्या तुलनेत (जेव्हा तापमान ३९ अंश सेल्सिअस असण्याची शक्यता आहे) कमाल तापमानात तब्बल ५ अंशांची वाढ झाली आहे. हे या हंगामातील आतापर्यंतचे सर्वाधिक तापमान ठरले आहे. किमान तापमानही २३.० अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच पारा ३८ ते ३९ अंशांच्या आसपास होता. मात्र, गेल्या चार दिवसांपासून त्यात सातत्याने वाढ होऊन तो ४० ते ४४ अंशांच्या घरात पोहोचला आहे. सोमवारी (दि. २१) कमाल तापमान ४२ अंश नोंदवले गेले होते. मार्च महिन्यातही उन्हाची तीव्रता जाणवत होती आणि सरासरी तापमान ३९ अंशांपर्यंत होते, तर महिन्याच्या अखेरीस ४० अंशांची नोंदही झाली होती. मधल्या काळात उत्तरेकडील थंड वाऱ्यांमुळे काहीसा दिलासा मिळाला होता. गुरुवारी (दि. २४) जिल्ह्याचे तापमान ४५.८ अंशांवर पोहोचले होते. पण कमाल तापमान ३५ अंशांच्या खाली आले नव्हते. एप्रिलमध्ये झालेल्या अवकाळी तुरळक पावसानेही कमाल तापमानावर विशेष परिणाम केला नाही आणि ते ३९ अंशांच्या आसपासच राहिले होते. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे दुपारच्या वेळी शहरातील रस्त्यांवर अघोषित संचारबंदीसदृश परिस्थिती निर्माण होत असून, सर्वत्र शुकशुकाट पसरलेला दिसतो. गतवर्षी (२०२४) एप्रिलच्या पहिल्या आठवड्यातच ४० ते ४१ अंश तापमानाची नोंद झाली होती, यंदा मात्र एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात पारा ४४ अंशांवर पोहोचला आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, दक्षिणेकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे तापमानात वाढ होत असून, पुढील आठवड्यातही पारा ४४ अंश किंवा त्यापुढे जाण्याची शक्यता आहे. त्यात शहरातील लाईन गुल्ल झाल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागला. ३.३० वाजता खंडीत झालेला वीजपुरवठा ८.३० वाजेपर्यंत सुरळीत झाला नाही.



### शाळा भरणार सकाळच्या सत्रात

- **जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे नर्सरी ते सातवीपर्यंतच्या सर्व शासकीय व निमशासकीय शाळा पुढील आठ दिवस सकाळच्या सत्रात भरविण्याचे आदेश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत. शाळा सकाळी ७ ते १० या वेळेत भरतील. वाढत्या तापमानाचा लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये, यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश काढले. नियोजित परीक्षा वगळता हा बदल लागू राहील. सर्व संबंधित शाळांनी या वेळेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आदेशात नमूद आहे.**

# हिरामण नगरातील महिलांचा पंचायत समितीवर घागर मोर्चा!

## पाण्यासाठी भर उन्हात मांडला ठिय्या



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २४:** एप्रिल महिन्याच्या वाढत्या उन्हाच्या तडाख्याने उमरखेड तालुक्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे. निंगनूर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या हिरामणनगरात तर परिस्थिती अधिकच बिकट झाली असून, संतप्त महिलांनी आज, गुरुवारी हातात रिकाम्या घागरी घेऊन थेट पंचायत समिती कार्यालय गाठले आणि गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनासमोर ठिय्या मांडला.

हिरामणनगरातील गावाबाहेरील सर्व विहिरी आटल्याने पिण्याच्या पाण्याचे अक्षरशः दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. व्याकूळ झालेल्या नागरिकांना, विशेषतः महिलांना, पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हाल होत असल्याचा आरोप करत महिलांनी आक्रमक पवित्रा घेतला. भर उन्हात रिकाम्या घागरी वाजवत त्यांनी पंचायत समितीमध्ये प्रवेश केला आणि गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोरच ठिय्या आंदोलन सुरू केले. 'पाणी आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे,' अशा घोषणा देत महिलांनी परिसर दणाणून सोडला. प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन पाण्याची पर्यायी व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी त्यांनी केली. महिलांच्या या आक्रमक आंदोलनाची तत्काळ दखल घेण्यात आली. गटविकास अधिकारी किरण कोळपे यांनी आंदोलनस्थळी येऊन महिलांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जलजीवन मिशनचे अभियंता सौरभ सोनी यांना तातडीने बोलावून घेतले आणि हिरामण नगरातील पाणीटंचाईवर तत्काळ काय पर्यायी व्यवस्था करता येईल, यावर सविस्तर चर्चा केली. लवकरच पाणीपुरवठ्याची समस्या सोडवण्यात येईल, असे आश्वासन गटविकास अधिकारी कोळपे यांनी महिलांना दिले. त्यानंतर ठिय्या आंदोलन मागे घेतले.

### जलजिवन'चे काम रखडले

- **निंगनूरचे सरपंच सुरेश बर्डे यांनी गावातील भीषण टंचाईला दुजोरा दिला. 'ग्रामपंचायतीची अधिग्रहीत विहीर कोरडी पडली आहे. जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेले पाइपलाइनचे कामही अर्धवट स्थितीत रखडले आहे. शासनाकडून ही कामे रमतगमत होत असल्याने ऐन उन्हाळ्यात गावकऱ्यांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. आम्ही पर्यायी व्यवस्थेसाठी प्रशासनाकडे सतत पाठपुरावा करत आहोत,' असे त्यांनी स्पष्ट केले. कामातील दिरंगाईमुळेलोकांचे हाल होत आहेत.**

# थोडक्यात

## घरफोडीत मुद्देमाल लंपास

**यवतमाळ :** येथील सहस्त्रबुध्दे ले-आऊटमध्ये घरफोडी केल्याची घटना घडली. याप्रकरणी घराचे समोरील दोन दरवाज्याचे कुलुप कोंडा तोडुन तसेच गेटचे कुलुप फोडुन आत प्रवेश करून एच. पी. कंपनीचे सिलेंडर व नगदी २०,००० असा एकुण २०५०० रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना २३ एप्रिलला घडली. याप्रकरणी सौ. शोभा बाळासाहेब मुंदे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

## चार हजारांचा मुद्देमाल लंपास

**नेर :** प्रगती ले-आऊटमध्ये चोरी केल्याची घटना घडली. याप्रकरणी घरातील किचन रूमच्या दरवाज्याचे कुलुप कोंडा तोडुन अज्ञात चोरट्याने कपाटातील पर्समधील नगदी ३ हजार रूपये व ४ ग्रॅमची चांदीची अंगठी किंमत १ हजार रूपये असा एकुण ४ हजाराचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी गजेंद्र मारोतराव धर्माळे (४५) यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

## अपघातात एक जखमी

**पुसद:** दारूच्या नशेत, चुकीच्या बाजूने (रॉंग साईड) भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे कार चालवून फिर्यादीच्या चारचाकी वाहनाला समोरून धडक देऊन अपघात केला. यात फिर्यादी आणि त्यांच्या परिवारातील सदस्य जखमी झाले, तसेच वाहनाचे नुकसान झाले. समीर शेख रज्जाक शेख (वय २७, रा. सुदर्शन नगर) यांच्या फिर्यादीवरून वसंतनगर पोलिसांनी मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच १४ डीटी ३६६९) चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## केंद्रामधील साहित्य लंपास

**पुसद :** आधार केंद्रामधील साहित्य लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी आधार सेवा केंद्राचे मागील बाजुस असलेली खिडकी तोडुन आत प्रवेश करून इन्व्हटर बॅटरी, सिसिटीव्ही वायफाय कॅमेरा, मेमरी चीप असा एकुण ३४६०० रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी अहेमद खान इब्राहीम खान पठाण यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

# दारव्हा कृषी सहायकांचा आंदोलनाचा एल्गार!

## प्रभारी तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या मनमानीविरोधात संघटना आक्रमक!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.२४:** दारव्हा येथील प्रभारी तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे यांच्या कथित मनमानी आणि बेशिस्त कारभाराविरोधात महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन अन्यायकारकपणे रोखणे आणि एकतर्फी चौकशी करणे यासारखे गंभीर आरोप करत, संघटनेने प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास धरणे आंदोलन सुरू करणार असल्याचे म्हटले आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, २१ मार्च २०२५ रोजी अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष भेटून चर्चा करत कृषी सहाय्यकांच्या समस्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यावेळी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी दि. २५ ते ३१ मार्च या कालावधीतील कर्मचाऱ्यांचे वेतन काढण्याचे निर्देश दिले होते. मात्र, प्रभारी तालुका कृषी अधिकारी शिंदे यांनी हे वेतन अद्याप रोखून धरल्याचा आरोप संघटनेने केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांनी २४ मार्च २०२५ रोजीच लक्ष्मण खांदारे यांच्याकडे तालुका कृषी अधिकारी पदाचा अतिरिक्त प्रभार सोपविण्याचे पत्र जारी केले असतानाही, अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, ज्यामुळे संभ्रम वाढला आहे. राजाराम शिंदे यांच्या विरोधात चौकशीचे आदेश असतानाही, संबंधित कृषी सहाय्यकांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देताच एकतर्फी चौकशी केली जात असल्याचा दावाही संघटनेने केला आहे. या मनमानी कारभारामुळे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांवर प्रचंड मानसिक आणि आर्थिक दबाव येत असून, त्याचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक जीवनावर होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या आंदोलनाला संघटनेचे राज्य प्रतिनिधी दिनकर चव्हाण, जिल्हाध्यक्ष विजय इंगळे, सचिव संदीप महाजन, किशोर हटवार, अतुल राठोड, प्रवीण कुंटटवार, सुयोग लकडे यांच्यासह जिल्ह्यातील हरीश रामटेके, सुदर्शन रामेलवार, देवेंद्र पाचभाई, जयवंत सावरकर, ज्ञानेश्वर गाडगे, राजा ठाकरे, राजेश राठोड, प्रल्हाद बोईंड, प्रवीण गोळे, सचिन भाग्यवंत, गणेश राठोड, प्रफुल्ल धुमाळ, राकेश अप्पलवार, विजय बढे आदींनी पाठिंबा दर्शविला आहे.

## भगवान बिरसा मुंडा महानाट्याचे आयोजन

**यवतमाळ, दि.२४:** क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसदतर्फे आज, २४ एप्रिलपासून आर्णी तालुक्यात पाळोदी येथे यास प्रारंभ होत आहे. कलावैभव नाट्य व सांस्कृतिक संस्था, यवतमाळ हे दोन अंकी महानाट्य सादर करेल. २४ एप्रिलला पाळोदी (आर्णी) नंतर २५ एप्रिलला स्व. जेठमल माहेश्वरी नाट्यगृह (उमरखेड), २६ एप्रिलला स्व. सुधाकर नाईक प्रेक्षागृह (पुसद), आणि २७ एप्रिलला माऊली सागर सभागृह, धामणगाव देव (दारव्हा) येथे सायंकाळी ७ वाजता प्रयोग होतील. हे महानाट्य पाहण्यासाठी जास्तीत जास्त आदिवासी बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांनी केले आहे.

# आईच्या तेरवीच्या दिवशीच मुलाचा मृत्यू

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि.२४ :** नियतीचा खेळ किती क्रूर असतो कल्पना करवत नाही! आईच्या तेरवीच्या दिवशीच, गुरुवारी, (दि. २४) येथे मुलाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. नारायण निवास परिसरातील उमेश पुरुषोत्तम राजूरकर (वय ४२) हे घरात मृतावस्थेत आढळले. या घटनेने शहरात शोककळा पसरली आहे.

दहा दिवसांपूर्वीच उमेश पुरुषोत्तम राजूरकर यांच्या आईचे निधन झाले होते. आज, गुरुवारी सुकणेगाव येथे आईची तेरवी असल्याने त्यांची बहीण कार्यक्रमासाठी गावी गेली होती. उमेश यांनाही तेथे पोहोचायचे होते. मात्र, दिवसभर वाट पाहूनही ते पोहोचले नाहीत व त्यांचा फोनही बंद होता. त्यामुळे त्यांच्या भावाने धास्तीने घरी जाऊन पाहिले असता, उमेश बेडवर मृतावस्थेत आढळले. पाच वर्षांपूर्वी पत्नीच्या निधनानंतर ते एकटे पडले होते आणि आईच्या मृत्यूने ते अधिकच खचले होते. वडिलांचेही यापूर्वीच निधन झाले होते. मुकुटबन रोडवरील एका रेस्टॉरंटमध्ये ते काम करत. त्यांचा मृदू, शांत व मनमिळाऊ स्वभाव सर्वांना परिचित होता. त्यांच्या अशा अचानक जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात दोन अल्पवयीन मुली, भाऊ, बहीण, भाचे-पुतणे असा मोठा आप्तपरिवार आहे.

## वनिता इंगोले नेर तालुकाध्यक्षपदी



**नेर, दि.२४:** कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय बैठकीत वनिता इंगोले यांची नेर तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यवतमाळ येथील विश्राम भवनात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य सरचिटणीस प्रभाकर सोनडबले होते. यावेळी नायब तहसीलदार राजकुमार रंगारी (नागपूर), नागपूर सचिव संजय खंडोडे, वन विभाग कार्याध्यक्ष उमेश बावणे, जिल्हाध्यक्ष आनंद भगत, विभागीय अध्यक्ष नामदेवराव थुल आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रफुल्ल मनवर यांनी संचालन केले, तर भारत भितकर (अध्यक्ष, महासंघ जि.प.) यांनी आभार मानले.

# उमरखेड बाजार समिती निवडणुकीचा बिगुल वाजला!

## वर्षभराच्या प्रशासक राजवटीनंतर रणधुमाळी; १८ संचालक पदांसाठी ३१ मे रोजी मतदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संभाजी भोयर



**उमरखेड, दि.२४:** उमरखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत वर्षभरापूर्वी संपल्याने लागू असलेली प्रशासक राजवट आता संपुष्टात येणार आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने १८ संचालक पदांसाठी निवडणूक कार्यक्रम नुकताच जाहीर केला असून, ३१ मे रोजी मतदान होणार आहे. या घोषणेमुळे थंडावलेले राजकीय वातावरण पुन्हा तापणार आहे.

शेतकरी आणि व्यापारी यांच्यातील महत्त्वाचा दुवा मानल्या जाणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक सहकार क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेची समजली जाते. उमरखेड बाजार समितीवर वर्षाहून अधिक काळ प्रशासक नियुक्त असल्याने अनेक धोरणात्मक आणि शेतकरी हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय घेणे शक्य होत नव्हते, ज्यामुळे कामकाजात अडचणी येत होत्या. आता निवडणूक जाहीर झाल्याने नवीन लोकनियुक्त संचालक मंडळ अस्तित्वात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एकूण १८ संचालक पदांसाठी ही निवडणूक होत आहे. यामध्ये सहकारी संस्था मतदार संघातून सर्वाधिक ११ जागा (सर्वसाधारण ७, महिला राखीव २, इतर मागासवर्गीय १, वि.जा.भ.ज. १), ग्रामपंचायत मतदारसंघातून ४ जागा (सर्वसाधारण २, अनु. जाती/जमाती १, आर्थिक दुर्बळ घटक १), व्यापारी अडते मतदारसंघातून २ जागा आणि हमाल मापारी व तोलणार मतदारसंघातून १ जागेचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीनंतर शांत झालेल्या उमरखेड तालुक्यातील राजकीय घडामोडींना या निवडणुकीमुळे पुन्हा वेग आला आहे. विविध राजकीय पक्षांच्या आणि गटांच्या बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. पॅनेल निर्मितीसाठी जोरदार हालचाली अपेक्षित आहेत. ही निवडणूक आगामी काळातील राजकीय समीकरणांची नांदी ठरू शकते, त्यामुळे सर्वच प्रमुख राजकीय गट आपली प्रतिष्ठा पणाला लावणार आहेत.

### सविस्तर वेळापत्रक जाहीर!

- **राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, नामनिर्देशन पत्र २५ एप्रिल ते ५ मे दरम्यान दाखल करता येतील. अर्जांची छाननी ६ मे रोजी, तर वैध अर्जांची यादी ७ मे रोजी प्रसिद्ध होईल. अर्ज मागे घेण्यासाठी ७ मे ते २१ मे पर्यंत मुदत आहे. अंतिम उमेदवार यादी व चिन्ह वाटप २२ मे रोजी होईल. मतदान ३१ मे रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार असून मतमोजणी व निकाल त्याच दिवशी जाहीर केला जाईल.**

# निधन

## प्रभाबाई उनरकर



**यवतमाळ :** जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संस्थेचे सदस्य ललित उनरकर यांच्या मातोश्री प्रभाबाई जयंतीलाल उनरकर (वय 70, रा. गौरक्षण परीसर, लोखंडी पूल, यवतमाळ) यांचे गुरुवारी (दि. 24) दुपारी निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, एक मुलगी, जावई, सुन, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पांढरकवडा रोडवरील मोक्षधामात अंत्यसंस्कार पार पडले.

## सोन्याने आणला दुष्काळ; एका तोळ्यासाठी विकावा लागतो १५क्विंटल कापूस

# लेकीचं लग्न की शेतकरी बापाची अग्निपरीक्षा!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ उमेश इंगोले

**नेर (परसोपंत) दि. २४ :** ऐन लग्नसराईत सोन्याच्या दराने गाठलेली उच्चांकी पातळी शेतकरी कुटुंबांसाठी कर्दनकाळ ठरत आहे. दहा ग्रॅम सोन्यासाठी तब्बल पंधरा क्विंटल कापसाची रक्कम मोजावी लागत आहे. यामुळे शेतकरी असलेल्या वधू पित्याची अक्षरशः दमछाक होत आहे. एकीकडे शेतमालाला कवडीमोल भाव मिळत असताना सोन्याच्या झळाळीने लग्नाचा खर्च आवाक्याबाहेर गेला आहे. शेतकरी आणखी कर्जबाजारी होत आहे. नव्हेतर लेकीच लग्न करण्यासाठी अग्निपरीक्षा देण्याची वेळच आता जगाच्या पोशिंद्यावर आली आहे.

सध्या जागतिक बाजारातील घडामोडी आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या घसरणीमुळे सोन्याचे भाव एक लाख रुपये प्रती दहा ग्रॅमच्या दिशेने झेपावत आहेत. लग्नसमारंभात सोन्याची खरेदी ही अनिवार्य बाब मानली जाते. वधूपित्याला वरासाठी किमान दहा ते पंधरा ग्रॅम, तर वरपित्याला वधूसाठी पन्नास ते शंभर ग्रॅम सोने खरेदी करावे लागते. याशिवाय बँडबाजा, कपडे आणि इतर खर्च वेगळाच असतो. मात्र, गेल्या दोन दशकांपासून शेतमालाचे भाव 'जैसे थे'आहेत किंवा अनेकदा हमीभावापेक्षाही कमी दराने माल विकला जातो. इतर वस्तूंचे भाव उत्पादक ठरवतात, पण शेतकऱ्याच्या मालाचा भाव मात्र खरेदीदार ठरवतो. इथेच शेतकऱ्याचे मोठे आर्थिक शोषण होत आहे. सध्या कापसाला फक्त सात हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. या दराने हिशोब केल्यास दहा ग्रॅम सोने घेण्यासाठी शेतकऱ्याला आपला १५क्विंटल कापूस विकावा लागतो. ही परिस्थिती अत्यंत विदारक आहे. शेतमालाला भाव नाही आणि दुसरीकडे सोन्याचे दर गगनाला भिडलेले, यामुळे शेतकरी वधू-वर पित्यांच्या लग्नाचे संपूर्ण बजेट कोलमडले आहे. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी केवळ कर्जमाफी पुरेशी नसून, डॉ. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसी लागू कराव्यात, जेणेकरून शेतमालाला योग्य भाव मिळेल आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल, अशी जोरदार मागणी आता शेतकरी वर्गातून होत आहे.

अजिंक्य भारत ▶ स्पेशल

### शेतमालाला भाव नाही; स्वामिनाथन आयोग हवा!

- **शेतकरी मालाचा भाव स्वतः ठरवू शकत नाही, तो खरेदीदार ठरवतो, हेच शेतकऱ्यांच्या शोषणाचे मूळ आहे. इतर सर्व वस्तू महाग होत असताना शेतमालाचे दर मात्र स्थिर किंवा हमीभावापेक्षाही कमी आहेत. या विषम परिस्थितीतून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी केवळ कर्जमाफी तात्पुरता उपाय आहे. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा, यासाठी डॉ. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसी लागू करणे हाच खरा मार्ग आहे.**



# उमरी येथील खूनप्रकरणातील आणखी दोन संशयितांना अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि.२४:** तालुक्यातील उमरी (स्मारक) येथे दि. १९ एप्रिल रोजी अनैतिक संबंधातून झालेल्या खुनातील दोन आरोपींना बाभूळगाव पोलिसांनी वर्धा जिल्ह्यातून ताब्यात घेतले आहे. प्रवीण प्रदीप झाडे (वय १९ वर्षे), विकास अंकुश झाडे (वय २५ वर्षे), दोघेही रा. उमरी (स्मारक) अशी आरोपींची नावे आहेत.

उमरी (स्मारक) येथे शनिवार, दि. १९ एप्रिल रोजी अनैतिक संबंधातून रूपेश संतोष झाडे याने भावसुनेचा प्रियकर प्रवीण चंपत नैताम याचा लोखंडी सब्बल डोक्यावर मारून खून केला होता. त्यानंतर त्याने स्वतः पोलिसांत आत्मसमर्पण केले होते. या प्रकरणी मृताच्या पत्नीने पोलिसांत फिर्याद नोंदविली होती. यानंतर पोलिस तपासातून अनेक पैलू समोर येत असल्याचे दिसून येत आहे. स्थानिकांच्या माहितीवरून या खूनप्रकरणात एकापेक्षा जास्त व्यक्तीचा सहभाग असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यामुळे त्यांनी आणखी दोघांबाबत विचारपूस केली, मात्र घटनेच्या दिवसापासून प्रवीण झाडे व विकास झाडे गावात नव्हते. त्या दोघांना पोलिसांनी देवळी येथून अटक केली आहे. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक लहुजी तावरे, सहायक पोलिस निरीक्षक हेमंत चौधरी, जमादार सचिन हुमने यांनी केली.